स. ठाणे

# संयुक्त महाराष्ट्राची समस्या



REFBK-0009275

ह. रा. महाजनी

संग्रहालय

अवाप्ति १९८३ वि: ........

क्रमांक ...७०८५... नों: दि: ........

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २९८६३ वि: निबंध
क्रमांक ९०८६ नों: दि: २५/५/५८

# संयुक्त महाराष्ट्राची समस्या

ह. रा. महाजनी

REFBK-0009275

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

किंमत तीन रुपये

पहिली
आवृत्ति
१, जून
१९५७

मुद्रक
श्रीनिकेतन ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक
केशव भिकाजी ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार
मुंबई २

सर्व
हक्क
स्वाधीन

कै. मानवेंद्रनाथ रॉय

ह्यांच्या पुण्य स्मृतीस ....

# अनुक्रम


१. भाषिक राज्य व राष्ट्रवाद १

२. कांहीं संभाव्य आपत्ति ११

३. द्विभाषिकाला विरोध कां झाला ? २२

४. अन्याय नि अपमान ह्यांचें शल्य ३२

५. बिकट झालेला मुंबईचा प्रश्न ४०

६. महाराष्ट्र-निष्ठा म्हणजे काय ? ५२

७. एकजुटीचें वास्तव स्वरूप ६२

८. राष्ट्रीय-आघाड्यांचीं लाल कारस्थानें ७२

९. उपसंहार : ध्येय-सिद्धीचा मार्ग ८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २९८८३ वि: ...
क्रमांक ...९०८४... नों: दि: ...
२५।५

प्रकरण पहिलें

# भाषिक राज्य व राष्ट्रवाद

निवडणुकांचा मोसम आतां संपलेला आहे. रा. पु. मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्या दिवसापासून सुरू झालेलें वाटाघाटीचें, मोर्चाचें, चळवळीचें व सत्याग्रही आंदोलनाचें पर्व संपलें. घटकराज्यांच्या ह्या महाभारताचें आतां दुसरें कोणतें पर्व सुरू होतें हें पाहावयाचें आहे. पण निवडणुकीच्या निकालानें ह्या द्विभाषिकापुरतें बोलावयाचें तर एका वेगळ्या पर्वाला प्रारंभ होईल एवढें निश्चित सांगतां येईल. तत्पूर्वी भाषावार राज्यरचना व तदनुषंगानें येणारा संयुक्त महाराष्ट्र ह्या प्रश्नांचा सांगोपांग विचार होण्याची गरज आहे. गेलें वर्ष सव्वा वर्ष उफाळलेल्या भावनांचा भर आतां ओसरला असेल आणि त्या भावनाप्रक्षोभाचा फायदा उठविणारे गट व पक्ष क्षणभर विसावा घेण्याच्या मनःस्थितींत असतील असें धरून चालावयास हरकत नाहीं. ह्या निवडणुकीनें दोन्ही बाजूंना आश्चर्याचे धक्के दिले आहेत. एकाला सुखद तर दुसऱ्याला दुःखद एवढाच काय तो त्यांत फरक. आपणांस एवढा मोठा पराभव सोसावा लागेल अशी कॉंग्रेसधुरीणांची कल्पना नव्हती; आणि एवढा मोठा विजय पदरांत पडेल अशी समितीच्या नेत्यांची अपेक्षा नव्हती. अशी अनपेक्षित घटना घडते तेव्हां तिच्या प्रतिक्रियाही तितक्याच जोरदार उमटतात. त्यामुळें कॉंग्रेसजन हताश झालेले आणि समितीचे लोक आनंदाच्या लाटेवर आरूढ झालेले आज आपण पाहात आहोंत. अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करण्याच्या मनःस्थितींत कॉंग्रेसजन आहेत; तर आगामी पांच वर्षांत वऱ्हाड व मराठवाडा विभागांत मुलुखगिरी करण्याचे मनसुबे समितीचे लोक रचीत आहेत. पण ह्या प्रतिक्रिया विवेकाधीन नाहींत. काय घडलें ह्याचें पृथक्करण व काय घडणार ह्याचा अंदाज ह्या दोन्ही गोष्टी ह्या भावनावेगांत आढळून येत नाहींत. पण ह्या दोन्ही गोष्टींची आज अत्यंत आवश्यकता आहे. अखिल भारतीय राजकारणामध्यें महाराष्ट्राला कांहीं मानाचें स्थान मिळावयाचें असेल आणि महाराष्ट्राच्या आशाआकांक्षा दिल्लीपतींच्या कानांपर्यंत जाव्यात असें वाटत असेल, तर महाराष्ट्रांतील राजकीय जीवन विवेकप्रधान बनण्याची अतिशय निकडीची गरज आहे.

**माझी भूमिका कायमच आहे.**

महाराष्ट्रांत कॉंग्रेसला फार मोठा पराभव सहन करावा लागेल, कॉंग्रेसची एवढ्या मोठ्या प्रमाणावर पीछेहाट होईल अशी माझी तरी कल्पना नव्हती.

ना. यशवंतराव चव्हाण ह्यांना निवडणुकींत विजय मिळाल्यानंतर कॉंग्रेसला बरेच विजय संपादन करतां येतील असें मला वाटलें. परंतु ह्यावेळीं महाराष्ट्रांतील मतदारांनीं समितीला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला हें सत्य आपण मान्य केलें पाहिजे. ह्याच दृष्टीनें महाराष्ट्र कॉंग्रेसनें हा पराभव मान्य करून पुढील मार्ग आंखला पाहिजे, अशा आशयाचे मीं दोन अग्रलेख लिहिले होते. त्यामुळें मीं आपली भूमिका बदलली असा कांहीं लोकांना साक्षात्कार झाला आणि समितीच्या विजयानें समितीचे विरोधक कसे हादरले हा प्रचार करण्यास कांहीं लोकांना संधि मिळाली. पण ह्या दोन्ही महाभागांना अत्यंत नम्रतेनें मला इतकेंच विदित करावयाचें आहे कीं, रा. पु. कमिशन नेमल्यानंतर समिति, भाषिक राज्यें व कॉंग्रेसची भूमिका ह्याविषयींच्या माझ्या मतांत काडीमात्र फरक पडलेला नाहीं; आणि फरक करावा अशी परिस्थितीही निर्माण झालेली नाहीं. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या धरसोडीच्या धोरणावर सुमारें आठदहा महिन्यांपूर्वी मीं जी टीका केली तीच ह्या दोन अग्रलेखांत मांडलेली होती. कॉंग्रेसच्या धोरणाविषयीं तींच माझीं मतें अद्यापि कायम आहेत आणि समितीच्या राजकारणाविषयींदेखील माझीं मतें बदललेलीं नाहींत. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर मुंबईत व महाराष्ट्रांत काय घडेल ह्याचा अंदाज रा. पु. कमिशनचा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वी जवळजवळ एक वर्ष अगोदर मीं बांधला होता ( लोकसत्ता–दिवाळी अंक १९५४ ). त्यावेळचे माझे अंदाज आज स्थूलमानानें खरे ठरले आहेत आणि ह्यामुळेंच समितीला प्रचंड विजय प्राप्त झाले म्हणून मतांत बदल करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. अर्थात् समितीचें तत्त्वज्ञान व राजकारण हें जसें मला मान्य नव्हतें, तशींच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचीं धोरणेंही मला मान्य नव्हतीं. ह्या दोघांवरही मला सडेतोड टीका करावी लागली आणि त्यामुळें दोघेही नाखुष झाले. पण ज्याला कोणत्याही प्रश्नाची निःपक्षपाती व शास्त्रीय मीमांसा करावयाची असेल त्याला सर्वांना किंवा कांहीं लोकांना खुष करण्याचें धोरण सांभाळतां येणार नाहीं.

## उपराष्ट्रवाद

घटकराज्यांची फेरविभागणी करण्याचा प्रश्न मुळांत घटनात्मक स्वरूपाचा आहे असें माझें आरंभापासून मत होतें. ह्या मतांत फरक करावा असें मला मुळींच वाटत नाहीं. घटकराज्य हें कांहीं स्वतंत्र राष्ट्र नव्हे. त्यामुळें एका राष्ट्राकडून दुसऱ्या राष्ट्रानें आपलें स्वातंत्र्य हिसकावून घेणें अथवा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला स्वातंत्र्य बहाल करणें, असें वास्तविक ह्या प्रश्नाला स्वरूप येऊं नये. पण दुर्दैवानें ह्या राज्यविभागणीच्या व विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाला तसें स्वरूप प्राप्त झालेलें आहे; आणि त्यामुळेंच ह्या प्रश्नावर महाराष्ट्रीय जनतेच्या भावना इतक्या तीव्र झाल्या. समितीचे नेते ही गोष्ट मान्य करणार नाहींत. पण त्यांनीं मान्य केलें नाहीं म्हणून

वस्तुस्थिति दडत नाहीं. संयुक्त महाराष्ट्राची कैफियत सादर करतांनाच ही '**उपराष्ट्र-वादाची**' भूमिका मांडण्यांत आली होती. ही भूमिका फिरून एकवार जाणकार व सुविचारी लोकांच्या नजरेस आणून देणें अगत्याचें आहे. म्हणून संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें रा. पु. कमिशनला जें निवेदन सादर केलें होतें त्यांतील एक विस्तृत उतारा मुद्दाम येथें देत आहें. तो उतारा असा–

"We have thus argued that, whereas the basis of a common society with a common history and a common cultural and literary tradition and with a sentiment of oneness forms the basis for the important primary units, the states in the Indian Union, no other factors such as that of financial viability, administrative convenience or economic geography are able to yield important tests in themselves for a basis of reorganisation or even to modify in any significant manner the operation of the proper political and social principal laid down by us. At the most, these other considerations point to certain extreme limits for sizes of States within which the basic principles may be allowed to operate."

(Memorandum submitted by S. M. Parishad.; Page 22.)

ह्या विस्तृत उताऱ्यांतील किचकट व आडवळणी भाषा दृष्टीआड केली तर ह्यामध्यें उघडपणें 'सांस्कृतिक राष्ट्रवादा'ची (Cultural Nationalism) भूमिका स्वीकारल्याचें स्पष्टपणें दिसून येतें. घटकराज्यांची विभागणी करतांना आर्थिक व शासनतंत्राची सोय किंवा आर्थिक भूगोल ह्यांपैकीं कोणतेंही कारण महत्त्वाचें नसून, भाषा, संस्कृति व वाङ्मय, समान इतिहास ह्याच गोष्टी महत्त्वाच्या मानल्या पाहिजेत अशी परिषदेनें भूमिका घेतली. म्हणजे, महाराष्ट्र हा एक सांस्कृतिक घटक आणि म्हणून त्याचें स्वतंत्र घटकराज्य हवें, असा ह्याचा अर्थ आहे. आतां राजकीय घटकांची सांस्कृतिक ऐक्याशीं व प्राचीन ऐतिहासिक परंपरेशीं जेव्हां सांगड घातली जाते, तेव्हां त्यांतून 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' निर्माण होत असतो, असा आधुनिक जगाचा अनुभव आहे. सांस्कृतिक राष्ट्रवादाची कल्पना लोकशाहीला मारक ठरलेली आहे. कारण सांस्कृतिक राष्ट्रवाद वेगळेपणाच्या भावनेवर आधारित झालेला असतो. इतरांपेक्षां आपण वेगळे आहोंत आणि परके आहोंत ही भावना सांस्कृतिक राष्ट्रवादाचा प्रमुख आधार. त्यामध्यें समानत्वाची व सहकार्याची भावना बळ धरूं शकत नाहीं. कारण, ही भावना ज्या प्रमाणांत बलवान् ठरेल, त्या प्रमाणांत सांस्कृतिक राष्ट्रवादाची धार बोथट होत जाते. तेव्हां संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनीं जी तात्त्विक भूमिका स्वीकारली होती ती ह्या देशांत घटकराज्यें निर्माण करण्याला पोषक अशी भूमिका नव्हती; '**घटकराष्ट्रें**' निर्माण करा, अशी ती भूमिका होती.

## त्याचाच परिणाम असहिष्णुता

गेलें वर्ष सव्वा वर्ष संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जें आंदोलन चालू होतें त्या आंदोलनाचा सूक्ष्म विचार केला, त्यांतील प्रचाराचें स्वरूप तपासलें, त्यामध्यें कोणत्या भावनांना आवाहन केलें जात होतें ह्याची छाननी केली, तर हें सारें आंदोलन उपराष्ट्र-वादाच्या तात्त्विक भूमिकेवरून चालविलें जात होतें, असाच कौल द्यावा लागतो. ह्या सर्व आंदोलनांत महाराष्ट्रावर अन्याय झाला व महाराष्ट्राचा अपमान झाला, ह्या दोन मुख्य भावना आढळून येतात. महाराष्ट्राला खची करण्याचा हा एक कट आहे, असें नेहमीं बोललें जात असे. आणि महाराष्ट्राच्या इतिहासाला आवाहन करून, महाराष्ट्र हा अन्याय व अपमान कधींही सहन करणार नाहीं, जिंजीचा लढा महाराष्ट्र परत लढवील, असा आवेश प्रकट होत होता. साहजिकच, ह्या विचारसरणींत परमतसहिष्णुता व सौहार्द हीं लोकशाही मूल्यें टिकूं शकत नाहींत; आणि ह्या आंदोलनांत तशीं तीं टिकलीं नाहींत. जे कोणी सांस्कृतिक राष्ट्रवादाशीं सहमत होऊं शकत नव्हते ते केवळ विरोधक झाले नाहींत; त्यांना महाराष्ट्रद्रोही ठरविण्यांत आलें. मतभेद हा विरोध मानला जात नव्हता; त्याला गुन्ह्याचें स्वरूप देण्यांत आलें होतें. समितीचे नेते व पुरस्कर्ते ही गोष्ट मान्य करोत अथवा न करोत, पण ही वस्तुस्थिति सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. निवडणुकीपूर्वी, निवडणुकीमध्यें व निवडणुकीनंतर सार्वजनिक जीवनांत कमालीची असहिष्णुता व द्वेष पसरलेला आहे, हें दृश्य समितीच्या नेत्यांना अपरिचित आहे असें मला वाटत नाहीं. मतभेद व्यक्त करणाऱ्या लोकांवर अप्रामाणिक हेतूंचा आरोप करणें, ‘महाराष्ट्रद्रोही’, ‘सूर्याजी पिसाळ’ अशा शेलक्या सुमनांचा अहेर करून विरोधकाला बदनाम करणें, त्यांच्या सभा मोडणें, हे जे प्रकार गेले वर्षभर झाले, त्या प्रकारांमागें असहिष्णुतेची भावना होती. आणि ही भावना समितीनें घेतलेल्या तात्त्विक भूमिकेंतून स्वाभाविकपणें निर्माण झालेली होती.

ह्या निवडणुकीमध्यें सामितीला मिळालेला विजय हा राष्ट्रवादी भावनेचा विजय आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या राजकारणाचा हा विजय नाहीं. निवडणुकींत मतदारांनीं काँग्रेसविरोधी मत नोंदवितांना व्यक्त केलेली भावना आणि समितीचें राजकारण ह्या दोन गोष्टी एक नाहींत. लायकीनें, गुणानें अथवा तपश्चर्येनें समितीचे उमेदवार श्रेष्ठ होते, समितीजवळ कांहीं वेगळा विधायक कार्यक्रम होता, आणि म्हणून समितीला एवढा मोठा विजय मिळाला, असा प्रकार घडलेला नाहीं. उमेदवार कोणताही असो, कसाही असो, कोणत्याही पक्षाचा असो, ह्या खेपेस संयुक्त महाराष्ट्रावर झालेल्या अन्यायाचा निषेध नोंदविण्यासाठीं काँग्रेसविरोधकाला आपण मत देणार, ही एकच भावना ह्या निवडणुकीमध्यें प्रबळ ठरली. ही भावना म्हणजे उपराष्ट्रवादाचा आविष्कार होय. ‘महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें’ अशा प्रकारची ही भावना आहे. महाराष्ट्रावर

अन्याय झाला व महाराष्ट्राचा अपमान झाला अशा प्रकारें ह्या उपराष्ट्रवादाचा आविष्कार होत होता. तेव्हां ह्या निवडणुकीची यथायोग्य मीमांसा करावयाची असेल, तर भारतीय लोकशाही, उपराष्ट्रवाद व अन्याय-भावना ह्यांची फोड होणें जरूर आहे.

## मतदानाचे निष्कर्ष

ही मीमांसा करण्यापूर्वी निवडणुकींत झालेल्या मतदानाविषयीं एक महत्त्वाची गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. समितीला फार मोठ्या प्रमाणावर मतें मिळालीं ही गोष्ट कोणीही नाकबूल करणार नाहीं. पण १९५२ सालच्या निवडणुकींतील मतदानाचें प्रमाण आणि ह्या निवडणुकींतील मतदानाचें प्रमाण ह्यांची तुलना केली असतां, कॉंग्रेसला ह्या खेपेस अधिक मतदान झालेलें आहे असें आढळून येतें. गेल्या निवडणुकींतही एकूण मतदानाच्या ५० टक्क्यांपेक्षां कमी मतें मिळालीं; आणि तरीदेखील कॉंग्रेसला प्रचंड बहुमत मिळून विरोधकांचा धुव्वा उडाला. ह्या खेपेसही कॉंग्रेसला निम्म्यापेक्षां कमी मतें पडलीं; पण कॉंग्रेसचा धुव्वा उडाला. हा जो चमत्कार घडून आला त्याचें कारण, ह्या खेपेस कॉंग्रेस व समिति असा सरळ सामना होता, हेंच होय. म्हणजे कॉंग्रेसचें मतदान घटलें आणि विरोधकांचें वाढलें असा प्रकार झालेला नाहीं. उलट, कॉंग्रेसला मिळालेल्या मतांचें प्रमाण वाढलें, असेंच आढळून येईल. विशेष कांहीं घडलें असेल तर तें हेंच कीं, ह्या खेपेस विरोधकांमध्यें मतविभागणी होऊन मतें वायां गेलीं नाहींत. ह्यावरून समितीनें बोध घ्यावयाचा तो हा कीं, कॉंग्रेसची शक्ति खची झाली असे मनांत मांडे खाऊं नयेत. आणि कॉंग्रेसनें ओळखावयाचें तें हें कीं, ह्यापुढें एकूण मतदानापैकीं पन्नास टक्क्यांहून अधिक मतें मिळविण्याची तयारी आपण केली पाहिजे. मुंबईच्या प्रश्नावरही ह्या निवडणुकीमधून असेच विपर्यस्त निष्कर्ष निघत आहेत. समितीला एकूण मतदान कॉंग्रेसपेक्षां अधिक झालें ह्या एकाच गोष्टीवरून संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूनें ह्या शहरांत सार्वमतच पडलें, असा सिद्धान्त समितीचे पुरस्कर्ते ठोकून देत आहेत. हा ठोकळ सिद्धान्त वस्तुस्थितीला धरून नाहीं. समितीच्या नेत्यांनाही ही गोष्ट आढळून आली असेल कीं, ह्या शहरांतील महाराष्ट्रीयेतर समाजाचें मत समितीला मिळालेलें नाहीं. समितीला मतें अधिक पडलीं ह्याचें कारण महाराष्ट्रीय मतदारांनीं ह्या खेपेस फार मोठ्या प्रमाणावर मतदान केलें. त्या मानानें महाराष्ट्रीयेतर समाज उत्साही नव्हता. तेव्हां, मुंबई शहरांतील मतदानावरून निष्कर्षच काढावयाचा असेल तर ह्या शहराची फाळणी करावी, एवढाच निष्कर्ष काढतां येईल. संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांना हा निष्कर्ष मानवेल असें वाटत नाहीं. तेव्हां, स्थूलमानानें समितीला फार मोठ्या प्रमाणावर विजय मिळाला हें मान्य केलें तरी त्यावरून समितीचे नेते व प्रवक्ते आपणांस अनुकूल असे जे आडाखे बांधीत आहेत त्यांना वास्तवतेचा आधार नाहीं.

आपणांस विचाराअंतीं असें आढळून येईल कीं, ही जी उपराष्ट्रीयत्वाची भावना संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत आढळून आली ती कांहीं एकट्या महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाहीं. उत्तर भारत वि. दक्षिण भारत, द्राविडस्थान, बंगाल नि बिहार असा नाना प्रकारांनीं तिचा आविष्कार झालेला आढळून येतो. डॉ. आंबेडकर ह्यांनीं आपल्या 'थॉट्स ऑन् लिंग्विस्टिक् स्टेट्स्' ह्या ग्रंथांत दाक्षिणात्य विरुद्ध उत्तरभारतीय ह्या सुप्त भावनेचा मोठा प्रक्षोभक आविष्कार केलेला आहे. त्यांच्या ग्रंथांतील एक उतारा येथें मुद्दाम उद्धृत करीत आहें. ते लिहितात :—

" The North is Hindi speaking. The South is non-Hindi speaking. Most people do not know what is the size of the Hindi speaking population of India. It is as much as 48 % of the total population of India. Fixing one's eye on this fact one cannot fail to say that the Commission's efforts will result in the consolidation of the North and the balkanization of the South."

( Thoughts on the Linguistic States; page 14. )

उत्तर वि. दक्षिण ही जी भावना त्यांनीं आपल्या ग्रंथांत नमूद केलेली आहे ती केवळ कपोलकल्पित नाहीं. त्यांनीं राजगोपालाचारीसारख्या मुरब्बी व्यक्तीचे उल्लेखिलेले उद्‌गार ह्या दृष्टीनें विचारांत घेण्यासारखे आहेत. कॉंग्रेस पार्लमेंटरी पक्षांत हिंदी भाषेचा ठराव अवघ्या एक अधिक मतानें सम्मत झाला, ही त्यांनीं नमूद केलेली घटनाही या संदर्भात विचारार्ह वाटते. सांगण्याचें तात्पर्य, केवळ संयुक्त महाराष्ट्रापुरतेंच हें उपराष्ट्रीयत्व मर्यादित राहिलेलें नसून त्याचा प्रसार सबंध दक्षिण भारतांत झालेला आहे.

## चमत्कारिक विरोधाभास

साहजिकच, राष्ट्रीय ऐक्याचे कट्टर पुरस्कर्ते त्यामुळें अस्वस्थ झाले असल्यास नवल नाहीं. पण केवळ अस्वस्थ होऊन काय उपयोग? जों जों आमचे श्रेष्ठ नेते व कनिष्ठ कार्यकर्ते राष्ट्रीय ऐक्याचे पुरस्कार करीत जातील तों तों ही उपराष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागण्याचा संभव वाढेल, असा चमत्कारिक विरोधाभास ह्या ठिकाणीं पाहावयास सांपडतो. मी तर असें म्हणेन कीं, राष्ट्रीय ऐक्य व राष्ट्रीय सुरक्षितता ह्यांचें तुणतुणें वाजवून ह्या भाषावार राज्यरचनेला आमच्या नेत्यांनीं विरोध केला नसता, तर संयुक्त महाराष्ट्राचें आंदोलन इतक्या तीव्र स्वरूपांत झालेंही नसतें. दार कमिशन, जे. व्ही. पी. अहवाल, 'लिंग्विझम' ह्या नांवाचा कपोलकल्पित वाद कल्पून भाषिक राज्यांवर केलेला हल्ला, ह्या सर्व घटनांनीं संबंधित घटकांच्या मनांत राष्ट्रीय ऐक्याची भावना रुजली तर नाहींच, पण उलटी प्रतिक्रिया मात्र बळावली. राष्ट्रीय ऐक्याच्या नांवाखालीं आपणांवर कांहींतरी आक्रमण होत आहे, आपल्या न्याय्य आकांक्षा पूर्ण न करण्याचा

हा एक डाव आहे, आणि त्यासाठीं 'भाषावाद' अशी एक नवी शिवी हांसडून आम्हांस बदनाम करण्याचा प्रयत्न चालू आहे, ही ऐक्याला न जुमानणारी भावना मात्र राष्ट्रीय ऐक्याच्या वेळीं अवेळीं होणाऱ्या प्रचारामुळें वळावत गेली; आणि त्यांतून प्रतिकारभावना पोसली गेली. ऐक्यभावना ही समाजांत इतकी रुजली पाहिजे कीं, "हां खबरदार, राष्ट्रीय ऐक्यभावना धोक्यांत येईल!" अशी वारंवार जाणीव देण्याची गरज पडतां कामा नये. शरीरावर हवेचा दाब किती तरी असतो, पण त्याची जशी जाणीव आपणांस कोणी करून देत नाहीं, तशी ऐक्यभावनेची जाणीव करून देण्याची गरज भासतां कामा नये. तेव्हां राज्यपुनर्रचना करण्याचा प्रश्न उपस्थित होतांक्षणीं इतके दिवस जोपासलेली राष्ट्रीय ऐक्याची भावना संपुष्टांत येते कीं काय, अशी भीति आमच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना वाटावी ह्यावरून ती भावना खोलवर रुजलेली नाहीं, एवढें तरी त्यांना मान्य झालें पाहिजे. आणि मग प्रश्न असा उपस्थित होतो कीं, गेलीं पाऊणशें वर्षें ही ऐक्यभावना बद्धमूल करण्याचा प्रयत्न करूनही ती बळ कां धरूं शकली नाहीं? तिच्यांत कांहीं मूलभूत दोष आहेत काय? असल्यास ते कसे काढून टाकतां येतील? आणि तिचें स्वरूप कसें पालटतां येईल?

## विरोधात्मक राष्ट्रवाद

ह्या प्रश्नाचें एकच उत्तर आहे; आणि तें म्हणजे आपला राष्ट्रवाद. एका परकीय सत्तेला विरोध करण्याच्या मनोवृत्तीमधून भारतीय राष्ट्रवादाचा जन्म झालेला आहे. त्या राष्ट्रवादामध्यें विधायक विचार नाहीं, आणि अशा विरोधात्मक वातावरणांतून निर्माण झालेला राष्ट्रवाद विधायक विचार ग्रहण करूं शकत नाहीं. परकीयांनीं ह्या देशांतून चालतें व्हावें येथपर्यंत ह्या राष्ट्रवादाला ऐक्याची भावना जतन करतां आली. परकीय ह्या देशांतून निघून गेल्यानंतर, ह्या देशांत सत्तास्वीकार कोणीं करावा, असा प्रश्न निर्माण झाला आणि राष्ट्रवादानें निर्माण केलेली ऐक्यभावना दुभंगली. ह्या देशाची झालेली फाळणी हा ह्या राष्ट्रीय ऐक्यभावनेला पहिला तडाखा होता. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, एवढी जबर किंमत द्यावी लागली असतांना, आमचे नेते, आमचे तत्त्ववेत्ते, आमचे इतिहासकार राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाची फेरतपासणी करावयास अद्यापि तयार नाहींत. जणूं, फाळणी ही एक दैवी आपत्ति होती आणि जातां जातां इंग्रजांनीं कावेबाजपणा करून ह्या देशाचे दोन तुकडे केले आणि ते निघून गेले, असेंच आमचे पुढारी समजूं लागले. ज्या राजकीय तत्त्वज्ञानाचा आपण पुरस्कार करतों तें तत्त्वज्ञान शास्त्रपूत व ऐक्यभावनेला पोषक असतें, तर इंग्रजांनीं कितीही कारवाया केल्या असत्या तरी त्या फलद्रूप झाल्या नसत्या, हा साधा विचार अद्यापि ह्या महाभागांच्या मनाला शिवला नाहीं! पण इतिहासाशीं अशी दांडगाई करून निभाव लागत नसतो. राज्यपुनर्रचनेच्या ताज्या इतिहासानें फिरून एकवार त्याच विचाराला बळकटी आणलेली

आहे. ज्या विरोधात्मक, पोकळ व प्रतिगामी राष्ट्रवादाची कास धरल्यामुळें ह्या देशाची फाळणी झालेली पाहाण्याचें आपल्या नशिबीं आलें, त्याच राष्ट्रवादानें राज्यपुनर्रचनेच्या भावनेवर हा गदारोळ निर्माण झालेला आपणांस पाहावा लागत आहे. आतां तरी आपण आपल्या तत्त्वज्ञानाची फेरतपासणी करणार आहोंत काय ? कीं ह्या भारताचीं दोन शकलें पडलीं हें जणूं कांहींच झालें नाहीं, असें मानून ह्या देशाचे आणखी तुकडे कसे पडतात ह्याची वाट पाहाण्याचें आम्हीं ठरविलें आहे ?

## वेगळी प्रेरणा हवी

इतकें निक्षून बोलण्याचें कारण, प्रसंगच तसा बांका आहे. गेल्या सव्वा वर्षांत जें कांहीं घडलें तें 'केवळ भावनावेग' असें म्हणून झिडकारण्याइतकें क्षुल्लक स्वरूपाचें आहे असें मला वाटत नाहीं. आमचे श्रेष्ठ नेते ह्याबाबत कांहींही म्हणोत, मला असें ठाम वाटतें – आणि हें मीं पूर्वीच बोलून दाखविलें आहे – कीं, आपली ऐक्याची कल्पना आपण बदलून घ्यावयास हवी. विविध भाषा, वाङ्मय, तत्त्वज्ञान, कला आणि जाति, धर्म, पंथ ह्यांनीं भरलेल्या ह्या भारतीय समाजाचें ऐक्य ह्यापुढें राष्ट्रवादाची भूमिका पत्करून चिरस्थायी होणार नाहीं. तें ऐक्य लोकशाहीवरच अधिष्ठित झालें पाहिजे. राष्ट्रीय ऐक्य ( National Unity ) आणि लोकशाही ऐक्य ह्या दोन कल्पना भिन्न आहेत. राष्ट्रीय ऐक्याच्या कल्पनेंत, राष्ट्रवादाचे जे जे दोष आहेत ते ते सारे दोष समाविष्ट झालेले आहेत. राष्ट्रीयत्व हीच कल्पना मुळांत पोकळ आहे. ह्या देशांत पूर्वी ऐक्यभावना नव्हती. काशीपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेला भारत देश एक आहे, ही भावना इंग्रज अमदानींत प्रथम उदयास आली. आणि तीदेखील त्यांनीं ह्या देशावर एकछत्री राजकीय अंमल सुरू केला म्हणून उदयास आली. गुलामगिरीच्या समान बंधनांतून ह्या एकतेचा उदय झालेला आहे; आणि तें बंधन तुटेपर्यंत त्या एकतेंत जिवंतपणा होता. परंतु ही एकता जिवंत ठेवण्यासाठीं राष्ट्रवादाचा उपयोग करण्यांत आला तो ह्या सामाजिक-पुनर्घटनेच्या काळांत पूर्णपणें टाकाऊ ठरलेला आहे. भारतीग राष्ट्रवाद परकीय सत्तेच्या विरोधावर पोसला गेला. परकीयापेक्षां आपलें सांस्कृतिक श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठीं ह्या राष्ट्रवादानें भूतकाळाला आवाहन केलें. ह्या राष्ट्रवादानें रामराज्याचा आदर्श निर्माण केला; लोकराज्याचा आदर्श त्यानें मानला नाहीं. आणि मग ह्या राष्ट्रवादाच्या हातांत सत्ता येण्याचीं चिन्हें प्रकट होतांच, रामराज्याला विरोधी रहीमराज्य पुढें सरसावलें. भूतकाळांत अथवा स्वर्गांत राम व रहीम एकमेकांशीं भांडले कीं नाहीं ह्याचा इतिहासांत दाखला सांपडणें कठिण. पण त्यांचे अनुयायी मात्र ह्या विसाव्या शतकांत भांडले. आणि इतके भांडले कीं त्या भांडणांत ह्या भारताचीं दोन शकलें पडलीं. आतां परत तोच आदर्श मानावयाचा असेल तर त्याच इतिहासाची

पुनरावृत्ति होण्याचा संभव आहे. हें टाळावयाचें असेल तर ऐक्यभावनेच्या मागें कांहीं वेगळी प्रेरणा हवी.

## लोकशाही ऐक्य

ती वेगळी प्रेरणा लोकशाहीची होय. राष्ट्रवादाचा प्रारंभ राष्ट्र ह्या कल्पनेपासून होतो. लोकशाहीचा प्रारंभ लोकांपासून होतो. राष्ट्र ही एक अव्यक्त व अमूर्त कल्पना आहे. लोक ही मूर्त कल्पना आहे. ह्या राष्ट्राचें भलें करावयाचें म्हणजे ह्या राष्ट्रांतील लोकांचें भलें करावयाचें. ह्या राष्ट्राचा अभ्युदय म्हणजे ह्या राष्ट्रांतील लोकांचा अभ्युदय. ह्या राष्ट्राचें ऐक्य म्हणजे ह्या लोकांचें ऐक्य. एकदां हा विचार पक्का झाला, कीं भारतीय जनतेमध्यें ऐक्यभावना किती प्रमाणांत आहे ह्या तपासणीला प्रारंभ होतो. राष्ट्रवादाला ह्या तपासणीची गरज वाटत नाहीं. राष्ट्र हें एक आहेच असें धरूनच तो चालतो. त्यामुळें, राष्ट्रवादानें गृहीत धरलेलें ऐक्य लोकभावनांची कदर राखीत नाहीं. तें ऐक्य तो राष्ट्रवाद लोकांवर लादण्याचा प्रयत्न करतो. आणि ह्यांतून विरुद्ध प्रतिक्रिया व संघर्ष निर्माण होतात. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर निर्माण झालेला संघर्ष हा अशांपैकीं एक संघर्ष आहे. तेव्हां ह्या समाजांत ऐक्यभावना दृढमूल करण्यासाठीं जर कोणता महत्त्वाचा विचार सतत दृष्टीसमोर ठेवण्याची गरज असेल तर तो हाच कीं, ऐक्याची भावना कोणावर सक्तीनें लादतां येणार नाहीं, लोकांच्या मनांत त्याची उत्स्फूर्त निर्मिति झाली पाहिजे. लोकशाहीच्या तत्त्वज्ञानांतच हा विचार संभवूं शकतो. कारण, लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाचा प्रारंभच ऐक्य निर्माण करावयाचें आहे ह्या विचारापासून होत असतो. ऐक्य निर्माण करावयाचें आहे म्हणजे सध्यां ऐक्यभावना नाहीं, अथवा असली तर ती पक्की रुजलेली नाहीं.

## भय वाटतें हें सत्य आहे

आपल्या समाजाची सद्यःस्थिति लक्षांत घेतली तर ह्या समाजांत एकता अद्यापि दृढ झालेली नाहीं हें कोणाही निरीक्षकास मान्य करावें लागेल. ह्या देशांत एकछत्री राजकीय अंमल राहावा येथपर्यंत ह्या समाजांत ऐक्यभावना आहे. पण एवढी ऐक्यभावना आपल्या सर्वांगीण अभ्युदयास पुरेशी नाहीं. ह्या राजकीय चौकटींतून फुटून बाहेर पडावें अशी कोणत्याही घटकाला इच्छा नाहीं हें खरें; पण ऐक्य ह्याचा अर्थ राजकीय सत्तेचें केंद्रीकरण असा होऊं लागला अथवा आपली भाषा, जीवनपद्धति, वाङ्मय, आराध्यदैवतें व निष्ठा ह्यांचा विध्वंस असा केला गेला, तर हें ऐक्य कितपत टिकेल ह्याची मात्र शंका वाटते. आज दोन्ही प्रवाह सुरू आहेत. इंग्रजांनीं सत्तादान केलें तें मध्यवर्ती सत्तेला. त्या मध्यवर्ती सत्तेकडून घटकराज्यांना सत्तेचें दान मिळत गेलें. तेव्हां, मध्यवर्ति सत्ताकेंद्रांत जे भाषिक वा पक्षीय गट प्रबल असतील त्यांच्याकडून न्याय मिळणार नाहीं अशी त्या गटाखेरीज इतरांना भीति किंवा

शंका वाटणें स्वाभाविक आहे. राज्यांच्या फेरवांटणीची मागणी ह्या भीतीमधून निर्माण झालेली आहे. आणि ही भावना जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत ऐक्यभावना दृढ होणार नाहीं. श्रेष्ठी ज्या ज्या प्रमाणांत राष्ट्रीय ऐक्याच्या नांवाखालीं आपले निर्णय अशा भयग्रस्त समाजावर लादतील, त्या त्या प्रमाणांत विरोध वाढत जाईल. म्हणून माझें पहिल्यापासून म्हणणें असें होतें आणि आजही तेंच कायम आहे कीं, राष्ट्रीय पुढाऱ्यांना स्वतःचे निर्णय देशहिताचे आहेत असें कितीही वाटलें तरी इतरांवर त्यांना त्यांची सक्ती करतां येणार नाहीं; किंवा भाषिकवादी, संकुचित दृष्टीचे, फुटीर मनोवृत्तीचे, असा त्या समाजाचा अधिक्षेप करतां येणार नाहीं.

## स्वाभाविक आकांक्षा पूर्ण करा

कारण निर्मळ सत्य असें आहे कीं, भारत राजकीय दृष्ट्या एक झाला असला तरी भाषा, धर्म, सामाजिक चालीरीति, वाङ्मय, कला ह्या सर्व दृष्टींनीं तो एक झालेला नाहीं. त्यांत भेद आहेत; इतकेंच नव्हे, तर विरोधही आहेत. ‘ पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, बंग ’ हें म्हणावयास गोड वाटत असलें तरी वस्तुस्थिति तशी नाहीं. इतर प्रांतीयांशीं केवळ महाराष्ट्रीयच फटकून वागतात असें नाहीं; तर सारेच सर्वांशीं फटकून वागतात. हें सत्य आपण ओळखलें पाहिजे. प्रांताभिमान नाहीं कोठें ? दिल्लींत सरकारी नोकरीमध्यें मद्रासी लोकांचा भरणा जास्त झालेला पाहून उत्तर प्रदेशांतील लोकांना बरें वाटत नाहीं. बंगालमध्यें अबंगाली लोकांना स्थान मिळणार नाहीं किंवा कर्नाटकांत महाराष्ट्रीयांना स्थिरता लाभणार नाहीं. ही स्थिति ओळखून ह्या विविध समाजांचें ऐक्य कसें होईल ह्याचा विचार आपण केला पाहिजे. आणि ही ऐक्य-भावना निर्माण करण्याचा एकच उपाय आहे. तो म्हणजे, त्या त्या भाषिक गटांच्या स्वाभाविक आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणें हाच होय. भाषिक घटकराज्याची कल्पना लोकशाहीशीं विसंगत आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. ह्याचा अर्थ, द्विभाषिक अथवा बहुभाषिक घटकराज्य निर्माण झालें तर लोकशाहीशीं तें विसंगत ठरेल, असा नाहीं. पण अनेक भाषिकांना सक्तीनें एकत्र आणण्यापेक्षां त्यांना खुषीनें वेगळे होऊं देण्यांतच लोकशाही बळकट होऊं शकेल. “Give a dog bad name and beat it” ह्या न्यायानें भाषिकवाद असा नवा वाद कल्पून हा जो विरोध होत आला त्यामुळें भाषिक राज्याची भावना अधिक बळकट झाली. आपल्यावर आक्रमण होत आहे ह्या संशयानें प्रतिकार बळावला; आणि राष्ट्रीय ऐक्य किती प्रमाणांत साधलें हें सांगतां आलें नाहीं तरी लोकशाहीला मात्र जबर तडाखा बसला.

अनुक्रमांक २९८४३ वि: ...
क्रमांक ९०८५ नों: दि: ...

## प्रकरण दुसरें

# कांहीं संभाव्य आपत्ति

घटकराज्यांची फेरविभागणी करतांना राष्ट्रवाद व भाषिक राज्य ह्यांमध्यें इतका आत्यंतिक विरोध कां निर्माण झाला, ह्याचें थोडें विवेचन गेल्या प्रकरणांत मीं केलें. त्यावरून, हा प्रश्न राष्ट्रवादाच्या भूमिकेवरून सोडवितां येणार नाहीं, आणि तसा सोडविण्याचा प्रयत्न केल्यास संघर्ष अटळ आहे, ही गोष्ट स्पष्ट होईल.

ह्यावरून, भाषिक राज्याची मागणी करतांना त्यांत लोकशाहीला कांहींच धोका नाहीं, असें मला म्हणावयाचें नाहीं. एकभाषिक राज्याचा हिरीरीनें पुरस्कार करणारे डॉ. आंबेडकरही हा धोका मान्य करतात. घटकराज्याची मागणी करतांना त्या मागणीचें घटकराष्ट्राच्या मागणींत रूपांतर होण्यास वेळ लागत नाहीं, हा धोका तेही मान्य करतात.

"A linguistic state, with its regional language as its official language, may easily develope into an independent nationality. The road between an independent Nationality and an independent State is very narrow. If this happens, India will cease to be Modern India; we have and will become the mediaeval India, consisting of a variety of States indulging in rivalry and warfare."

(Thoughts on Linguistic States; Page 21.)

### उपराष्ट्रवादी भूमिका

प्रचाराच्या शिष्टसंमत मर्यादा सोडून संयुक्त महाराष्ट्राचा कांहीं लोकांनीं केलेला प्रचार मी सोडून देतों. जो प्रचार जबाबदार पुढारी करीत होते, आणि संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमागील तात्त्विक भूमिका म्हणून जें तत्त्वज्ञान पुढें येत होतें त्या सर्वांचा विचार केल्यास, त्यामध्यें उपराष्ट्रवादाचीं सारीं लक्षणें आढळून येतात. राष्ट्रवादाप्रमाणेंच ह्या उपराष्ट्रवादामध्यें महाराष्ट्राच्या गत इतिहासाला आवाहन केलें जात होतें. महाराष्ट्राची परंपरा, इतिहास व त्याचें कर्तृत्व ह्यांची आठवण करून, महाराष्ट्रावर आक्रमण होत आहे, महाराष्ट्राला नामोहरम करण्याचें कारस्थान शिजत आहे, आणि हें कारस्थान व हा कट हाणून पाडण्यासाठीं महाराष्ट्रानें प्रतिकारास सिद्ध झालें पाहिजे, अशा प्रकारचा प्रचार होत होता. ह्या उपराष्ट्रवादानें 'प्रामाणिक मतभेद' ह्या नांवाची चीजच नष्ट करून टाकली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत काय घडलें ह्याची कल्पना

येण्यासाठीं मी १९४२ च्या 'चले जाव'च्या चळवळीची आठवण करून देतों. त्यावेळींही प्रामाणिक मतभेदाला थारा नव्हता. जे कोणी त्या चळवळीच्या स्वरूपाबद्दल व परिणामकारकतेविषयीं शंका प्रकट करण्याचें धाडस करीत, त्यांच्यावर 'राष्ट्रद्रोही', 'साम्राज्यशाहीचे हस्तक', असा तावडतोब शिक्कामोर्तब होत असे. ह्या चळवळींतही हीच आक्रमक वृत्ति प्रकर्षानें प्रकट झाली. तेच शब्द थोड्याफार फरकानें वापरण्यांत आले. तोच अप्रामाणिक हेतूंचा आरोप वारंवार उच्चारला जात होता. ह्या सर्वांचा निष्कर्ष असाच काढावा लागेल कीं, संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला एका घटकराष्ट्राच्या मागणीचें स्वरूप येऊं लागलें होतें. डॉ. आंबेडकर ह्यांनीं सांगितलेला धोका अशा रीतीनें मूर्त स्वरूपांत आलेला होता.

## धोका काल्पनिक नाहीं

भाषिक राज्याची मागणी करतांना तिला भाषिक राष्ट्राच्या मागणीचें स्वरूप येण्याचा संभव असतो, ह्याविषयीं रा. पु. कमिशननेंही एक सबळ पुरावा दिलेला आहे. तो म्हणजे, परभाषी मुलखांत स्थायिक झालेल्या इतर भाषिकांची सवतासुभा करून राहाण्याची वृत्ति. तामीळ, तेलगू, हिंदी, राजस्थानी इत्यादि वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक परभाषी मुलुखांत नोकरीधंद्यानिमित्त गेले व तेथें स्थायिक झाले, तर पिढ्यान् पिढ्या गेल्या तरी त्या भाषिकाशीं सात्म्य पावूं शकत नाहींत. महाराष्ट्रीयांमध्यें ही प्रवृत्ति फारच मोठ्या प्रमाणावर आढळून येते. दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, लखनौ, कलकत्ता, ग्वाल्हेर, इंदूर इत्यादि परभाषी मुलखांत महाराष्ट्रीयांच्या कित्येक पिढ्या गेल्या असल्या तरी स्वतःचा सवतासुभा करून खड्याप्रमाणें वेगळे राहाण्याची महाराष्ट्रीयांची वृत्ति अद्यापि बळ धरूनच आहे. ह्यालाच कमिशननें "Homeland Concept" असें नांव दिलें आहे.

"The most important of these is the doctrine of an area claiming to be the "Homeland" of all the people speaking a particular language. Its implication is that a Bengali, an Andhra or a Malyali, wherever he is settled, has his homeland in Bengal, Andhra, or Kerala; that he has a loyalty to that homeland, overriding the loyalty to the area of his domicile; and that in the same way, the homeland state has claims on him, wherever he may be."

(S. R. C. Report; page 44.)

एक भाषा बोलणाऱ्यांचें एक घटकराज्य असावें, ह्या मागणीनें त्या राज्यांतील अन्यभाषिक गट त्या घटकराज्याशीं तादात्म्य पावत नाहींत, आपल्या भाषेचें जें घटकराज्य असेल तें राज्य आपल्या हक्काचें संरक्षण करील, अशी भावना त्यांच्या मनांत असते, आणि अशा रीतीनें अन्यभाषिक अल्पसंख्याकांना परराष्ट्रीय अल्पसंख्याकांचें

स्वरूप येऊं लागतें. ह्या कमिशननें दाखविलेला धोका काल्पनिक स्वरूपाचा नाहीं. त्याला वास्तवतेचा बराच आधार आहे. आज ह्या केवळ शंकाकुशंका वाटतील. परंतु ह्या सर्व सामाजिक गटांना एकत्र आणणारीं बंधनें शिथिल झालीं—आणि तीं शिथिल होणारच नाहींत अशी सध्यां तरी कोणतीच हमी नाहीं–तर त्यांत लोकशाहीला निश्चित धोका आहे.

## ह्या तोडगा नव्हे

पण भाषिक राज्याच्या मागणीमध्यें ह्या ज्या संभाव्य आपत्ति आहेत, त्या भारतीय राष्ट्रवादाच्या प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेल्या आहेत; आणि लोकशाहीच्या भूमिकेवरून आपण ह्या भाषिक राज्यांना योग्य वळण लावण्याचा प्रयत्न केला तर त्या आपणांस टाळतां येतील. उपराष्ट्रवादाच्या फुटीर प्रवृत्तीवर सक्तीचें राष्ट्रीय ऐक्य हा तोडगा नव्हे. कारण, राज्यघटनेनें जी राजकीय यंत्रणा ह्या देशांत सुरू झालेली आहे, त्या यंत्रणेमुळें राष्ट्रीय ऐक्य म्हणजे ह्या देशांतील कांहीं ठराविक भाषिक गटांचें वर्चस्व, असें त्या राष्ट्रीय ऐक्याला स्वरूप आलेलें आहे. आपलें राज्य हें एक संघराज्य आहे, असें आपण मानतों आणि राज्यघटनेंतही तीच मध्यवर्ती कल्पना आहे. पण अमेरिकन फेडरेशन-प्रमाणें भारतीय संघराज्याचें स्वरूप नाहीं. अमेरिकन फेडरेशनमध्यें प्रत्येक घटकराज्याला फेडरल संस्थेमध्यें ( सीनेटमध्यें ) समान प्रतिनिधित्व आहे. श्री. पणीक्कर ह्यांनीं आपल्या भिन्नमतपत्रिकेंत हा फरक स्पष्ट करून दाखविला आहे. ते म्हणतात :–

"In most federal constitutions, though wide variations exist in respect of the populations and resources of the unit, care is taken to limit the influence and authority of the larger states. Thus in the United States of America, for example, though the States are of varying population and resources and the State of New York has many times the population, say of Nevada, the constitution provides for equal representation of every State in the Senate."

(S.R.C. Report; page 244.)

भारतीय फेडरेशनमध्यें अशी कोणतीही तरतूद नाहीं. त्यांतच सर्व सत्ता प्रथम केंद्राच्या हातीं संक्रमित झाली. सत्तादान झालें तें प्रथम संघराज्याच्या मध्यवर्ती सत्तेला झालें. ही घटना लक्षांत घेतल्यास, आपणांवर अन्याय होतां कामा नये आणि सत्तेचें विकेंद्रीकरण जास्तींत जास्त प्रमाणावर व समबुद्धीनें व्हावें, अशी घटकराज्यांना साशंकता वाटली तर त्या राज्यांतील लोकमताला ह्याबाबत दोषी धरतां येणार नाहीं किंवा फुटीर प्रवृत्ति असा त्या लोकमताचा अधिक्षेपही करतां येणार नाहीं.

## बोलकें कोष्टक

राष्ट्रीय ऐक्याच्या कल्पनेंत समानतेच्या कल्पनेला अवश्यमेव स्थान असलें पाहिजे. कोणत्याही एका अथवा अनेक घटकांना असें वाटतां कामा नये कीं, फेडरल सभागृहा-

मध्यें कांहीं विशिष्ट गट एकत्र आल्यास, आपल्या न्याय्य आशा-आकांक्षांना कधींही योग्य संधि मिळणार नाहीं. असें घटकराज्यांना वाटण्याची शक्यता हाच राष्ट्रीय ऐक्याला लागलेला सुरुंग होय. अमेरिकन फेडरेशनमध्यें प्रत्येक घटकराज्याला, मग तें लहान असो वा मोठें असो, समान प्रतिनिधित्व बहाल करून आणि घटनेनें दोन्ही सभागृहांना सारखे अधिकार देऊन, हा धोका टाळलेला आहे. आमच्या राज्यघटनेंत अशी कोणतीही तरतूद नाहीं. उलट, रा. पु. मंडळानें भारताचा जो नकाशा तयार केला आहे त्याचें संकलित चित्र आपण पाहिलें, तर राष्ट्रीय ऐक्याचा पाया किती डळमळीत आहे ह्याची स्पष्ट कल्पना येऊं शकते. त्या नकाशाची ढोबळ कल्पना खालील कोष्टकावरून येईल.

## दक्षिणी घटकराज्यें

| घटकाचें नांव | लोकसंख्या (आंकडे कोटि) |
|---|---|
| मद्रास | ३.०० |
| केरळ | १.३६ |
| कर्नाटक | १.९० |
| आंध्र | २.०९ |
| हैद्राबाद | १.१३ |
| एकूण | ९.४८ |

## मध्य राज्यें

| घटकाचें नांव | लोकसंख्या (आंकडे कोटि) |
|---|---|
| महाराष्ट्र | ३.३१ |
| गुजरात | १.१३ |
| सौराष्ट्र | ०.०४ |
| कच्छ | ०.०५ |
| एकूण | ४.५३ |

## उत्तर भारत

| घटकाचें नांव | लोकसंख्या (आंकडे कोटि) |
| --- | --- |
| उत्तर प्रदेश | ६.३२ |
| बिहार | ३.८५ |
| मध्यप्रदेश | २.६१ |
| राजस्थान | १.६० |
| पंजाब | १.७२ |
| एकूण | १६.१० |

हें एक अतिशय बोलकें असें कोष्टक आहे. दक्षिणेकडचीं घटकराज्यें आणि मध्यविभागांतील घटकराज्यें ह्या दोहोंची लोकसंख्या एकत्र केली तरी ती १४ कोटी १ लक्ष इतकी भरते. ह्याच्या उलट, उत्तर भारतांतील सर्व घटकराज्यांची लोकसंख्या १६ कोटी १० लक्ष इतकी आहे. ह्या आंकड्यांचा बोध अगदीं स्पष्ट आहे. आपल्या राज्यघटनेमध्यें लोकसभेंत लोकसंख्येच्या प्रमाणावर प्रतिनिधित्व ठरविलेलं आहे. उत्तर भारताला त्या दृष्टीनें लोकसभेंत प्रतिनिधित्व केव्हांही जास्त मिळणार. गेल्या निवडणुकीच्या वेळींच ही गोष्ट स्पष्ट झाली होती. उत्तर प्रदेश, बिहार, मध्यभारत, हिंदी मध्यप्रदेश ( महाकोसल ), राजस्थान ह्या घटकराज्यांतील प्रतिनिधींची संख्या २२५ वर जाते; आणि एवढ्या मोठ्या संख्येशीं मुकाबला करून कोणत्याही एका घटकराज्याला अथवा अनेक घटकराज्यांना आपल्या दुःखांना वाचा फोडण्याची संधि कधींही मिळणार नाहीं. राज्यसभेंतही घटकराज्यवार प्रतिनिधित्व नाहीं. आणि राज्यसभेला अमेरिकन सीनेटप्रमाणें समान अधिकार नसून इंग्लंडांतील लॉर्डांच्या सभेप्रमाणेंच राज्यसभेचा दर्जा कमी प्रतीचा ठेवण्यांत आलेला आहे.

## मध्यवर्ती सत्ता व घटकराज्यें

त्याचबरोबर, भारतीय संघराज्यामध्यें मध्यवर्ती सत्तेला जे अधिकार आहेत त्यांचाही विचार केला पाहिजे. आपल्या संघराज्यांतील लोकसभेला नवीं घटकराज्यें निर्माण करण्याचा, जुनीं बदलण्याचा, अथवा त्यांच्या सरहद्दी ठरविण्याचा अधिकार आहे. इतर फेडरेशनमधील मध्यवर्ती सत्तेप्रमाणें परराष्ट्रीय धोरण, संरक्षण व चलन एवढे तीनच विषय संघराज्याच्या मध्यवर्ती सत्तेकडे नाहींत, त्यापेक्षां कितीतरी विषय मध्यवर्ती सत्तेच्या ताब्यांत असून कांहीं विषय मध्यवर्ती सत्ता आणि घटकराज्यें ह्यांना समान आहेत. मध्यवर्ती सत्तेचें एवढें व्यापक स्वरूप आणि लोकसभेंतील प्रतिनिधित्वा-बाबत निर्माण झालेली ही विषमता लक्षांत घेतली, तर घटकराज्यांच्या फेरविभागणीच्या

प्रश्नानें लोकभावना इतक्या कां प्रक्षुब्ध झाल्या ह्यावर विदारक प्रकाश पडेल. ऐक्याचें तत्त्व निरपवाद आहे. मध्ययुगीन भारताप्रमाणें ह्या देशाचीं शकलें पडावींत, आणि शिंद्यांनीं होळकरांवर स्वारी करावी व होळकरांनीं पुणें लुटावें अशा स्वरूपाचें अराजक माजावें, असें कोणाही नागरिकाला वाटत नाहीं आणि वाटणार नाहीं. दीडशें वर्षांच्या पारतंत्र्यानें आपलीं मनें ह्याबाबत चांगलींच भाजलेलीं आहेत. पण त्याचबरोबर, वेगवेगळ्या सामाजिक घटकांमधील परकेपणा व क्वचित् प्रसंगीं दिसून येणारी तेढ अद्यापि मावळलेली नाहीं. नोकरी, व्यापार, उद्योग, सामाजिक रीतिभाती इत्यादि अनेक क्षेत्रांमध्यें तीं जाणवतात. ह्या बहुरंगी समाजाला राष्ट्रीय ऐक्याचा पाठ देतांना, तें ऐक्य तत्त्वतः कसें आहे ह्यापेक्षां तें ऐक्य व्यवहारांत, सत्तेच्या परिभाषेंत किती उतरतें ह्याला जास्त महत्त्व आहे. अतिप्रबल अशा मध्यवर्ती सत्तेमध्यें कांहीं विशिष्ट घटकांचें हुकुमी बहुमत ज्या ऐक्यामध्यें होऊं शकतें, त्या ऐक्याचा वास्तव अर्थ काय होऊं शकतो ? किमान पक्षीं, ह्या राज्ययंत्रणेंत आपलें कांहीं चालणार नाहीं, आणि आपणांस कांहीं मिळवावयाचें असेल तर ज्या घटकांचें हुकुमी बहुमत आहे अशा घटकांच्या प्रतिनिधींची मर्जी संपादन करूनच आपणांस तें मिळवतां येईल, असें इतर घटकांना वाटलें तर अशी भावना निर्माण करूं शकणारें राष्ट्रीय ऐक्य कसें बद्धमूल होऊं शकेल ?

## अटळ पर्यवसान

लोकसभेंत सम्मत झालेलें महाद्विभाषिक पश्चिम महाराष्ट्रांतील लोकांना सम्मत झालें नाहीं, त्याचें एक कारण राष्ट्रीय ऐक्यांत दडलेली ही व्यावहारिक विषमता, असें देतां येईल. आतां परकीय सत्तेशीं संग्राम चालू नाहीं. आपण नवा समाज निर्माण करण्याच्या कार्यांत गुंतलेलों आहोंत. ह्या परिस्थितींत राष्ट्रवादाला सत्तावादाचें स्वरूप आलेलें आहे. विधायक प्रेरणा नसलेल्या कोणत्याही वादाचें पर्यवसान अखेर सत्तावादांतच होतें. राष्ट्रवादाचें पर्यवसान तसेंच झालें आहे. सत्तावाद म्हणजे सत्तेच्या वांटपाचा वाद. त्यांत ज्यांना स्थान मिळत नाहीं, संधि लाभत नाहीं व हक्क उरत नाहीं, ते असंतुष्ट राहातात. असंतोष तसाच धुमसत राहिला तर अगतिकत्वाची, वैफल्याची भावना निर्माण होते. महाराष्ट्रांतील लोकमताची स्थिति अशी झालेली आहे. लोकसभेंत द्विभाषिक मंजूर झालें, लोकसभेचा कायदा सर्वांनीं मानला पाहिजे, हें सारें खरें आहे; पण हा कायदा करण्याचें कर्तृत्व आमच्याजवळ आहे काय ? हा कायदा बदलून घेण्याची शक्यता आहे काय ? आमच्या सम्मतीला हा कायदा मंजूर करतांना कांहीं स्थान होतें काय ? नाहीं, हें एकच ह्या सर्व प्रश्नांचें उत्तर. पांचशें सभासदांत महाराष्ट्राचे वीसबावीस सभासद असणार. इतरांना त्याची आंच असणार नाहीं आणि असणें शक्य नाहीं. म्हणजे, महाराष्ट्रांतील लोकमताला ह्या राष्ट्रीय ऐक्यांत स्थान नाहीं, ह्या जाणिवेनें महाराष्ट्रांत आज विरोध बळावला. ह्या विरोधाला फल लाभलें नाहीं तर

लोकांची लोकशाहीवरील श्रद्धा डळमळीत होणार हें ठरलेलें आहे. ह्या अश्रद्धेंतून संयुक्त आघाडी व संयुक्त आघाडींतून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर लालताऱ्याचा उदय, ह्या घटना अटळ दिसतात. त्या टाळावयाच्या असतील तर भाषिक प्रश्नावर एवढा प्रक्षोभ कां माजला ह्याची अधिक सूक्ष्म तपासणी झाली पाहिजे. गेल्या पांच पंचवीस वर्षांतील, किंबहुना त्यामागच्या इतिहासाची निःपक्षपाती व निर्भीड छाननी झाली पाहिजे. वास्तवता म्हणून मान्य करण्याइतकें धैर्य आपण दाखविलें पाहिजे.

## मुख्यतः राज्यघटनेचा प्रश्न

घटकराज्यांच्या फेरविभागणीचा प्रश्न हा प्रामुख्यानें राज्यघटनेचा प्रश्न आहे. म्हणजे असें कीं, नवीं घटकराज्यें निर्माण करणें, जुन्या घटकराज्यांत बदल करणें, राज्यांच्या सरहद्दी ठरविणें, हे सारे घटनात्मक बदल आहेत. असे घटनात्मक बदल करण्याचा अंतिम हक्क राज्यघटनेनें लोकसभेला दिलेला आहे.

घटकराज्यांच्या विधानसभांचें प्रथम मत अजमावलें जावें अशी घटनेंत फक्त तरतूद आहे. हें मत लोकसभेवर बंधनकारक नाहीं. घटकराज्याच्या विधानसभेनें प्रकट केलेल्या मताला किती मान द्यावा हें लोकसभेंतील बहुमताच्या मर्जीवर अवलंबून आहे. ही राज्यघटना तयार करणाऱ्यांच्या मनांत कदाचित् अशी कल्पना असेल कीं, घटक-राज्याच्या प्रतिनिधींनीं व्यक्त केलेल्या मताला योग्य मान देण्याची लोकशाही परंपरा आपोआपच बंद पडेल. पण घटनेंत तसें लिखित बंधन नाहीं. वास्तविक, घटकराज्यांच्या फेरविभागणीचा प्रश्न त्या त्या घटकराज्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होय. जो जोडा वापरतो त्यालाच तो कुठें खुपतो हें कळणार. त्या दृष्टीनें घटकराज्यांच्या मताला अधिक महत्त्व येणें जरूर होतें. परंतु राज्यघटना एकदां होऊन चुकली. शिवाय, सर्वच घटकराज्यांच्या फेरविभागणीचा व्यापक प्रश्न मध्यवर्ति सरकारनें हातीं घेतला आणि त्यासाठीं एका त्रयस्थ कमिशनची नेमणूक केली. येथपर्यंत राज्यघटनेंत जी उणीव होती ती ह्या लोकशाही प्रथेनें भरून काढली असें म्हणावयास हरकत नाहीं. कमिशन नेमल्याची लोकसभेंत घोषणा होतांच त्या कमिशनचें सर्व देशभर स्वागत झालें तेंदेखील ह्याच दृष्टीनें. खुद्द महाराष्ट्रांतही कमिशनच्या नेमणुकीबद्दल सार्वत्रिक समाधान व्यक्त झालेलें होतें. पण कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि असंतोषाची वावटळ पसरली. असंतोष कां निर्माण व्हावा ह्याचें कारण सहज समजण्यासारखें होतें. त्रयस्थ अशा कमिशनला, जेथें दोन भाषिक गटांमध्यें तीव्र विरोध होता तेथें दोघांचेंही समाधान करणें शक्य नव्हतें. पण कमिशनच्या अहवालानें केवळ असमाधान निर्माण केलें नाहीं; त्या अहवालानें झंझावाती आंदोलनें निर्माण केलीं. कमिशनचा अहवाल लक्षपूर्वक पाहिल्यास ह्याचें कारण आपणांस सापडूं शकेल. ह्या अहवालामध्यें स्वीकारलेली भूमिका तात्त्विक दृष्ट्या सदोष होती; एवढेंच नव्हे, तर कमिशननें केलेल्या शिफारसी परस्परविसंगत होत्या.

ह्या विसंगतीची छाननी पुढें येणारच आहे. येथें एकच उदाहरण देतों. घटकराज्यें विस्तारानें लहान असूं नयेत असें कमिशननें अहवालांत प्रारंभीं म्हटलें आहे; आणि शिफारस करतांना मात्र विदर्भासारखीं कांहीं छोटीं घटकराज्यें निर्माण करण्याची शिफारस केलेली आहे! ह्या विसंगति इतक्या ढोवळ स्वरूपाच्या होत्या कीं, त्यामध्यें बदल करणें भारतसरकारला भाग पडलें.

## सरकारची प्रतिष्ठा भंग पावली

राज्यपुनर्रचना कमिशनचा अहवाल अशा रीतीनें दूषित व्हावा हा राज्यांच्या पुनर्घटनेच्या कार्यातील पहिला अपशकुन मानावा लागेल. ह्या दूषित व विसंगत अहवालाचा परिणाम असा झाला कीं, कमिशनच्या निःपक्षपातीपणाबद्दलच लोकमत साशंक बनलें. आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण झाल्या नाहींत म्हणून सामान्य लोकांत असमाधान फैलावणें, ह्या अर्थानें मी हें विधान करीत नाहीं; तर राज्यकारभारांतील मंत्रिपदावर असलेले जबाबदार लोक, समाजांतील प्रतिष्ठित विचारवंत, आणि कॉंग्रेसमधील जबाबदार पुढारी उघड उघड आपली शंका प्रकट करूं लागले. इतकेंच नव्हे, तर ह्याचे पडसाद लोकसभा व राज्यसभा ह्यामध्येंही उमटले. सरकारच्या प्रतिष्ठेला व लोकशाही परंपरेला हा सर्वांत मोठा धक्का होता. राज्यांची फेरवांटणी करण्याचा प्रश्न हा अनेकांच्या जिव्हाळ्याचा व तीव्र संघर्ष निर्माण करणारा प्रश्न आहे, ह्याची जाणीव सरकारला होती आणि तीन वेळां हा प्रश्न लांबणीवर टाकून ही गोष्ट स्पष्ट झाली होती. ह्या साशंक व तंग वातावरणांत कमिशन नेमलें गेलें. कमिशन नेमल्यानंतर हें एक निःपक्षपाती कमिशन आहे अशी द्वाही फिरविण्यांत आली आणि लोकांनींही ती मानली. अशा वेळीं कमिशनचा अहवाल दृढ तात्त्विक भूमिकेला धरून तयार झाला असता आणि त्यांतील शिफारशी त्या भूमिकेला धरून केल्या गेल्या असत्या तर, ज्या गटांना त्या शिफारशी पसंत पडणार नव्हत्या त्या गटांनीं फार तर असमाधान व्यक्त केलें असतें, पण इतका तीव्र भावनाप्रक्षोभ खचित झाला नसता. त्यांतच ह्या शिफारशींमध्यें सरकारनें अशा पद्धतीनें फिरवाफिरव चालू केली कीं सरकारच्या त्या फिरवाफिरवीमुळेंच कमिशनच्या निःपक्षपाती भूमिकेवरील लोकांचा विश्वास नष्ट करण्यास मदत केली. अखेरीस गृहमंत्री व कमिशनचे एक मान्यवर सभासद ह्या दोघांमध्यें राज्यसभेत जी बाचाबाची झाली, एकमेकांनीं एकमेकांवर जे आरोप केले त्यामुळें कमिशनच्या प्रतिष्ठेला व लोकशाही प्रथेला जबर धक्का बसला असाच कौल द्यावा लागेल. जें कमिशन आपण नेमतों त्याची बदनामी आपणच करावी हें दृश्य खरोखरीच अगदीं किळसवाणें असें आहे.

## परिणाम दोघांनाही भोंवला

कमिशनच्या शिफारशींमध्यें फरक करण्याचा अथवा त्या तहकूब ठेवण्याचा किंवा त्या जशाच्या तशा स्वीकारण्याचा कोणत्याही सरकारला :संपूर्ण अधिकार आहे. पण

त्याबरोबर आपणच नेमलेल्या कमिशनची प्रतिष्ठा ज्यायोगें कमी होईल असें कोणतेंही कृत्य न करण्याविषयीं लोकशाही सरकार नेहमीं दक्षता बाळगीत असतें. ह्या प्रकरणामध्यें सरकारनें ही दक्षता बाळगली नाहीं हें तर झालेंच; पण शिफारशींत जो कांहीं बदल करावयाचा होता तो सरकारी पातळीवरून न होतां, कॉंग्रेसपक्षाच्या बैठकींतून झाला ही त्यानंतरची दुसरी अनिष्ट प्रथा म्हणावी लागते. पक्ष अधिकारारूढ असला तरी पक्ष व सरकार ह्यांमध्यें फरक असतो आणि हा फरक कटाक्षानें पाळला गेला पाहिजे. कमिशन भारत सरकारनें नेमलें होतें. कॉंग्रेस पक्षानें नव्हे. त्या कमिशननें केलेल्या शिफारशी हा सरकारच्या कक्षेंतील विषय आहे, पक्षाच्या कक्षेंतील नाहीं. त्या शिफारशींत कांहीं बदल करावयाचा असल्यास सरकारनें सरकारी पातळीवरून करणेंच उचित ठरलें असतें. लोकसभा, घटकराज्यांच्या विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाही संस्थांचा दुवा मध्यवर्ति सत्तेशीं लागतो. लोकमतच अजमावयाचें होतें तर एका विशिष्ट पक्षाचें न अजमावतां, सर्वांचें अजमावणें जास्त सुसंगत ठरलें असतें. किंवा सर्व राजकीय पक्ष वगळून त्या त्या घटकराज्यांतील अराजकीय संस्था व व्यक्ति ह्यांचें मत विचारांत घेण्याचा मार्ग मोकळा होता. त्याऐवजीं ह्या प्रश्नावर पक्षाच्या बैठकींत खलबतें झालीं, निर्णय प्रथम तेथें घेण्यांत आले, त्या व्यासपीठावरून वक्तव्यें झालीं व घोषणा केल्या गेल्या. त्याचा परिणाम एवढाच झाला कीं कॉंग्रेसही बदनाम झाली आणि सरकारी निर्णयही सर्वसम्मत होऊं शकला नाहीं.

## हें अंतर कायम असलें पाहिजे

पक्ष व सरकार ह्यांमध्यें असलेली लक्ष्मणरेषा पुसट होत आहे ही भारतीय लोकशाहीला पोषक अशी घटना नाहीं. कमिशन नेमल्यानंतर महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या नेत्यांना व अधिकारी व्यक्तींना सर्वपक्षीय मेळाव्यांत शिरतांना मी असाच धोक्याचा इशारा दिला होता. पण ते लोक पडले थोर! रस्त्यावरच्या माणसाचें मत त्यांना कवडीमोलाचें वाटल्यास नवल नाहीं. आतांही पक्ष व सरकार ह्यांतील अंतर कायम राखण्याविषयीं असाच इशारा देत आहे. कॉंग्रेसजनांनीं ही एक पक्की खूणगांठ मनाशीं बाळगली पाहिजे कीं स्वातंत्र्यपूर्व कालांतील कॉंग्रेस व अधिकारारूढ कॉंग्रेस ह्या एक नव्हत. त्या वेळीं कॉंग्रेस ही एक राष्ट्रीय संघटना होती. आतां कॉंग्रेस हा एक राजकीय पक्ष बनलेला आहे. तो पक्ष मोठा असेल, फार सुसंघटित असेल. पण अनेक राजकीय पक्षांपैकीं तो एक राजकीय पक्ष आहे ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाहीं. राष्ट्रवादाच्या भूमिकेवरून ह्या पक्षाला काम करतां येणार नाहीं. लोकशाहीच्या भूमिकेवरून काम करावें लागेल आणि लोकशाहीच्या भूमिकेवरून काम करावयाचें ह्याचा अर्थ अधिकारारूढ पक्ष व सरकार ह्यांत फरक करावयाचा असा आहे. ज्या पक्षाला बहुमत मिळतें, त्या पक्षाचें

सरकार बनतें हें खरें. पण एकदा सरकार बनलें कीं तें केवळ त्या पक्षाचें सरकार राहत नाहीं. पक्षव्याप्तिपेक्षां सरकारची व्याप्ति फार मोठी असते. एक तर ज्या कार्यक्रमावर एखाद्या पक्षानें बहुमत मिळविलेलें असतें तो कार्यक्रम अमलांत आला तर सबंध समाजाचें कल्याण होईल असा त्या पक्षाचा दावा असतो. एका विशिष्ट पक्षाच्या सभासदांना उद्देशून तें आवाहन नसतें. दुसरें असें कीं, ह्या कार्यक्रमाला धरून जे कायदे केले जातात व जीं धोरणें बांधलीं जातात ते कायदे व तीं धोरणें सर्व समाजाला लागूं असतात. ह्यासाठीं पक्ष व सरकार ह्यांत अंतर असणें लोकशाहीच्या स्थैर्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे.

## लोकक्षोभाचें कारण

राज्यपुनर्घटनेच्या प्रश्नावर हा भेद पाळला गेला नाहीं. परिणाम काय झाला? कॉंग्रेसनें हा प्रश्न घरगुती स्वरूपाचा केला आहे अशी भावना लोकांमध्यें पसरली. पक्ष म्हटला कीं शिस्त आली. त्यांत वरिष्ठ पुढाऱ्यांचा आदेश पाळणें आलें. कनिष्ठ शाखांना कुरबुर करण्यापलीकडे कांहीं राहिलें नाहीं. आणि त्यामुळें जेथें संघर्ष वाढला तेथील स्थानिक शाखा बदनाम झाल्या. लोकांच्या मनांतून उतरल्या आणि लोकही चिडले. आपल्या आशा-आकांक्षा व भावभावनांचा साधा विचारही होऊं शकत नाहीं. स्थानिक नेत्यांच्या कमजोरीमुळें आणि वरिष्ठांच्या दराऱ्यामुळें ह्या प्रश्नावर आपल्या मताचा प्रभावही पाडणें अशक्य झालें आणि दिल्लींत जो निर्णय होईल तो चुंबीत अंमलांत आणणें भाग पाडलें ह्या जाणिवेनें लोकभावना अतिशय प्रक्षुब्ध झाल्या. सरकारी पातळीवरून हा प्रश्न हाताळला गेला असता तर विरोधकांना आपलें मत सरकारला ऐकविण्याची संधि मिळाली असती. ती संधीही हिरावून घेतली गेली. हेंच लोकक्षोभाचें एक महत्त्वाचें कारण आहे.

## द्विविध दोष

जेव्हां केव्हांपासून कॉंग्रेस सत्तारूढ झाली तेव्हांपासून कॉंग्रेसच्या संघटनेंत हा महान् दोष शिरला आहे. हा दोष द्विविध आहे. कॉंग्रेसच्या आंत कनिष्ठ लोकमताला असावें तितकें महत्त्व राहिलें नाहीं. सत्तेच्या आमिषानें आलेले लोक फार. राजकीय तत्त्वज्ञान, कार्यक्रम, धोरण, लोकशाही ह्या कल्पना त्यांना अपरिचित आणि त्यांना त्यांत स्वारस्यही नाहीं. सत्ता मिळविणें हेंच त्यांचें राजकारण. आमदारकी, नामदारकी, लोकल बोर्ड, नगरपालिका, सरकारी कमेट्या इत्यादिकांवर आपली वर्णी कशी लावावी, हीच ह्यांची मुख्य विवंचना. साहजिकच श्रेष्ठ नेते जें सांगतील त्याला मान डोलावणें आणि आपलें आसन कायम टिकविणें एवढाच कार्यक्रम ह्या लोकांसमोर आहे. विचारांची गति वरून खालीं अशी झाली. खालून त्याला प्रतिसाद मिळत नाहीं, किंवा प्रतिक्रियाही होत नाहीं हा एक दोष. सरकारी यंत्रणेचा कॉंग्रेस-संघटना हा एक पूरक

भाग बनलेला आहे हा दुसरा दोष. सरकारच्या कार्याची प्रशंसा व सरकारी धोरणाचा प्रचार ह्यापलीकडे पक्षशाखांना अन्य कार्यक्रम राहिला नाहीं. अनेक जुन्या व जाणित्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं अशी प्रांजल कबुली दिलेली आहे. पक्ष सरकारपेक्षां वेगळा राहूं शकत नाहीं. तो सरकारोपजीवी झाला आहे. त्यामुळें सरकारनें जें कांहीं चांगलें काम केलें असेल, त्याचें श्रेय सरकारला मिळतें. सरकारच्या चुकांबद्दल मात्र कॉंग्रेसजनांना लोकांचे शिव्याशाप सहन करावे लागतात. ह्यामध्यें लोकशाहीला धोका आहेच. पण कॉंग्रेसलाही धोका आहे. सत्तेपासून दूर राहणें व चिकित्सक दृष्टि बाळगणें हीच कोणत्याही पक्षाच्या जिवंतपणाचीं लक्षणें आहेत.

## स्वतंत्र विचार हवा

कम्युनिस्ट हुकुमशाहींत पक्ष व सरकार जसे एक होतात तसा अभेद येथें झालेला आहे, असें मला म्हणावयाचें नाहीं. आणि लोकशाहीला तेंच काय तें आशास्थान आहे. परंतु कम्युनिस्ट राजवटींत पक्ष व सरकार ह्यांचा अभेद होत असला तरी खरी सत्ता पक्षाच्या हातीं असते आणि सरकार त्या पक्षाच्या हातांतील बाहुलें बनतें. येथें त्याच्या उलटा प्रकार चालू आहे. त्यामुळें परिणामही वेगवेगळे दिसून येतात. कम्युनिस्ट हा धर्मवेड्यांचा पंथ. We have a divine mission to fulfill ह्या भावनेनें भारलेले असे हे लोक. भारतासारख्या लोकशाहीच्या परंपरा नसलेल्या व पोलादी पुरुषाबद्दल नेहमींच आकर्षण व आदरभाव असलेल्या समाजांत ह्या मिशनऱ्यांचें कौतुक झाल्यास नवल नाहीं. केरळमध्यें हेंच होणार आहे. महाराष्ट्रांत नेमकें त्याच्या उलट होत आहे. केरळमध्यें लोकशाहीच्या नाड्या जों जों कम्युनिस्ट आवळतील तों तों लोक त्यांचें कौतुक अधिक करतील. महाराष्ट्रांत दुबळे कॉंग्रेसजन सत्तेच्या आश्रयानें राहतील तसतसे ते अधिक बदनाम होत जातील. ह्याचा अर्थच मुळीं असा आहे कीं आज लोकशाहीच्या मार्गानें जावयाचें असेल तर त्या मार्गानेंच गेलें पाहिजे. त्यांत कोठेंही मधेंच थांबतां येणार नाहीं. वाटा फुटतात तेथें गोंधळ उडाला कीं अपघात घडला असें बेलाशक समजावें. महाराष्ट्रांत कॉंग्रेसला जो अपघात झाला तो ह्या वैचारिक गोंधळाचा परिणाम होय. आजची कॉंग्रेसची स्थिति अशी आहे कीं ह्या सरकारला यश आलें तर ती यशस्वी होणार. स्वतःच्या पायावर ती उभी राहूं शकत नाहीं. कारण स्वतःचा असा स्वतंत्र विचार तिच्यापाशीं नाहीं. ज्यांना सत्तेच्या आश्रयानें राजकीय जीवन कंठणें पसंत नाहीं ते लोक भूदानांत गेले आहेत. कॉंग्रेस व सर्वोदय अशी विभागणी झालेली आहे. सर्वोदयी कॉंग्रेसला अनुकूल नाहींत, त्यांची निष्ठा कॉंग्रेसवर नाहीं. सांगण्याचें तात्पर्य, कॉंग्रेसला स्वतंत्र अस्तित्व कसें टिकवावें ह्या प्रश्नाचा गंभीरपणें विचार केला पाहिजे. तसा विचार झाला नाहीं तर महाराष्ट्रांत तरी कॉंग्रेसला कोणताही मामा वा काका तारूं शकणार नाहीं.

## प्रकरण तिसरें

# द्विभाषिकाला विरोध कां झाला ?

आतां ह्या द्विभाषिकाविरुद्ध झालेल्या मतदानासंबंधीं कांहीं विचार मांडतों. कॅंग्रेसजनांना उद्देशून येथें मला कांहीं गोष्टी स्पष्ट सांगावयाच्या आहेत. पहिली गोष्ट त्यांनीं सत्याला सत्य म्हणून मान्यता द्यावी. घडलें तें घडलेंच नाहीं असें आग्रहानें सांगणें ही शुद्ध आत्मवंचना होय.

महाराष्ट्रांतील निवडणुकीच्या निकालानें महाराष्ट्रीय कॅंग्रेसनेत्यांना निवडणूकवैराग्य आलेलें दिसतें. अंतर्मुख होऊन पराभवमीमांसा करण्याची सांथ सुरू झालेली आहे. पण हे आंतले विचार जसजसें बाहेर येत आहेत तसतसें स्मशानवैराग्याप्रमाणेंच हें निवडणूकवैराग्यही हंगामी वैराग्यच ठरणार असें वाटूं लागतें. कोणी म्हणतो कीं, ह्या द्विभाषिकाचा प्रचार करावयास पुरेसा वेळच मिळाला नाहीं. कोणी सांगतात कीं, हा केवळ भावनेचा पूर आहे. लवकर ओसरेल. आणखी कांहीं सांगतात कीं, एकंदरींत परिस्थितीचा साकल्यानें विचार केल्यास लोकांचा कौल द्विभाषिकाच्या विरुद्ध गेलेला नाहीं. तेव्हां ‘ अगा जें झालेंचि नाहीं ’ अशाची वार्ता कां एवढी मनावर घेतां ? अशा प्रकारें सत्याला मिथ्या ठरविण्याचा हा उद्योग परिणामी फलदायी ठरणार नाहीं. ह्याचा अर्थ परिस्थितीचें गांभीर्य मनावर बिंबलें नाहीं. कोणतीही घटना आपोआप किंवा आकस्मिक घडत नाहीं, ह्या शास्त्रीय विचाराची बैठक ह्यामध्यें नाहीं. हें सारें विचारमंथन केवळ हातावरच्या शिदोरीप्रमाणें तात्कालिक आहे.

### टक्केवारीचा हिशेब

मराठवाडा, विदर्भ व महाराष्ट्र हे तीन मराठी भाषिक विभाग एकत्र केले तर मतदानाचा कौल आंकडेवारीनें आणि टक्केवारीनें द्विभाषिकाला अनुकूल पडला असें सिद्ध करतां येईल. पण टक्केवारीचा हिशेब हा तांत्रिक विजय झाला. एक गोष्ट त्रिवार सत्य आहे. खुद्द महाराष्ट्रांत समितीला मिळालेला विजय समितीलाही अपेक्षित नव्हता. मतदारांनींच स्वतःशीं असा पक्का निर्णय घेतलेला दिसला कीं, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जो कोणी सोम्या गोम्या उभा असेल त्याला मत द्यावयाचें. वैयक्तिक पात्रता, पक्षनिष्ठ राजकारण इत्यादि कोणत्याही गोष्टीचा विचार करावयाचा नाहीं. मी स्वतः कित्येक ठिकाणीं असें पाहिलें आहे कीं, समितीचा प्रचार जेथें पोहोंचूं शकत नव्हता तेथेंदेखील समितीच्या उमेदवाराला भरभरून मतें मिळालीं. जे कॅंग्रेसचे उमेदवार

निश्चित निवडून येणार असे खुद्द समितीचे लोक सांगत होते, ते उमेदवारदेखील पराभूत झाले, आणि दहादहा हजार मतांच्या अंतरानें पराभूत झाले. हा केवळ भावनेचा पूर नाहीं. तो क्षणिक नाहीं. कांहींतरी चिडीची किंवा निषेधाची कल्पना सामान्य लोकांच्या मनांत खोलवर रुजून बसल्याची खूण आहे. ही भावना कां निर्माण झाली, ती तात्कालिक कारणांनीं निर्माण झालेली आहे कां तिचीं पाळेंमुळें खोलवर गेलेलीं आहेत, ह्याची तपासणी होणें जरुरीचें आहे. सारांश, प्रश्न उडवून लावूं नका, उत्तर आपणांस अनुकूल नसलें तर त्याची टाळाटाळ करूं नका, एंवढेंच काँग्रेसजनांना सांगावेसें वाटतें.

## वजाबाकीची बेरीज

वास्तविक आपला पराभव होण्याची शक्यता निर्माण झाली आहे हें सत्य गेल्या निवडणुकीच्या निकालानें काँग्रेसजनांना कळावयास हवें होतें. १९४५ सालीं झालेल्या निवडणुकींत काँग्रेसला प्रचंड मतें मिळालीं. बहुसंख्येनें काँग्रेस उमेदवार निवडून आले. जवळजवळ विरोधी पक्षच उरला नाहीं अशी स्थिति झाली. मतदान व उमेदवारांच्या निवडीचें प्रमाण ह्यांत संवादित्व होतें. १९४५ ते १९५२ हीं अवघीं सात वर्षें. सात वर्षांत काय घडलें ह्याचा विचार काँग्रेसजनांनीं केला नाहीं. कारण त्यांचें लक्ष उमेदवार किती निवडून येतात ह्यावर खिळलें होतें. मागच्या मुंबई राज्यांत लोकसभेच्या ४५ जागांपैकीं काँग्रेसनें ४० जागा जिंकल्या; विधानसभेंत ३१५ पैकीं २६९ जागा हस्तगत केल्या. काँग्रेसजन ह्यावर निहायत खूष झाले. पण एकूण जें मतदान झालें, त्यांमध्यें काँग्रेसला ४९ टक्के मतदान झालें, निम्म्यापेक्षां कमी मतें मिळालीं ह्या घटनेकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं. त्यांना ह्या गोष्टीचें आकलन होऊं शकलें नाहीं कीं, विरोधकांच्या मताच्या वजाबाकीवर काँग्रेसचा विजय अवलंबून होता. ह्या वजाबाकीचें बेरजेंत जेव्हां रूपांतर होईल तेव्हां आपल्या बहुमताला सुरुंग लागेल हें ओळखण्याइतकें द्रष्टेपण त्यांच्यापाशीं नव्हतें. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानें जर कांहीं केलें असेल तर वजाबाकीची बेरीज केली आणि चमत्कार झाला. जयप्रकाश नारायण ह्यांनीं सुचविलेला तोडगा अंमलांत आला. ही बेरीज अशीच कायम टिकेल अशी हमी कोणीच देऊं शकत नाहीं. परंतु वजाबाकीचा खेळ परत खेळतां येईल अशीही हमी देतां येणार नाहीं. एकाच बिंदूपासून अनेक रेषा निघूं शकतात. कोणती रेषा निघेल हें अनेक घटकांच्या क्रियाप्रतिक्रियांवर अवलंबून राहील. काँग्रेसचे महाराष्ट्रीय नेते किती दूरदर्शीत्व दाखवितात, द्विभाषिकाचा कारभार कसा चालतो, विरोधकांची एकजूट कितपत टिकते, इत्यादि अनेक घटनांचे एकमेकावर जे परिणाम घडतील त्या परिणामांचा लघुत्तमसाधारण म्हणजेच भावी राजकारणाची दिशा होय. पण येथें जें लक्षांत घ्यावयाचें आहे तें हें कीं, काँग्रेसचा विशिष्ट भागांत जो पराभव झाला त्याचीं बीजें मागील निवडणुकीच्या वेळेपासून रुजलेलीं आहेत.

## भलता भ्रम नको

म्हणून महाराष्ट्रांत पराभव झाला तरी विदर्भ व मराठवाडा ह्यांत जय मिळाला असें समाधान आपण मानूं लागलों तर तें लटकें समाधान ठरेल. महाराष्ट्रांत मिळालेल्या विजयानें समितीचे नेते वऱ्हाड व मराठवाडा येथें मुलुखगिरी करण्याचे बेत रचूं लागले आहेत. विजयानें निर्माण झालेल्या आनंदातिरेकाचा हा परिणाम आहे कां आणखी कशाचा आहे, हें आतांच सांगतां येणार नाहीं. पण त्याबरोबर वऱ्हाड-नागपुरांत समितीला जागा मिळणार नाहीं अशा खेडकरप्रभृतींच्या गर्जनाही ऐकूं येत आहेत. ह्या गर्जनांना वल्गनांचें स्वरूप येऊं नये अशी इच्छा असेल तर वऱ्हाडांत मिळालेला विजय वजावाकीचा चमत्कार आहे कीं काय ह्याचीही तपासणी झाली पाहिजे. थोडा हिशेब येथें मांडतों. महाराष्ट्रांत वीस लाख व तीस लाख हा हिशेब सर्वांना माहीत आहे. मराठवाड्यांत १३ लाखांपैकीं ७ लक्ष कॉंग्रेसला व ६ लक्ष विरोधकांना अशी विभागणी झाली आहे आणि विदर्भांत १९ लक्ष व १७ लक्ष असें प्रमाण पडलेलें आहे. ह्यावरून कॉंग्रेस व विरोधक ह्यांमध्यें लक्ष दोन लक्ष मतांचेंच अंतर आहे हें उघड होईल. एवढ्या अल्प बहुमतावर विदर्भांतील कॉंग्रेसनेते राणा भीमदेवी गर्जना करूं लागतील तर त्यांत सावधगिरी व दूरदर्शित्व नाहीं असा इषारा देणें भाग आहे. समितीच्या मुलुखगिरीच्या भराऱ्या कदाचित् काल्पनिक ठरतील. परंतु त्याचबरोबर कॉंग्रेसचें आसनं पक्कें आहे असेंही मानतां येणार नाहीं. विदर्भांत ही भावना कधींच पेट घेणार नाहीं, लोकमत कधींच प्रक्षुब्ध होणार नाहीं. ह्या भ्रमांत कॉंग्रेसजनांनीं राहूं नये. ज्या प्रवृत्ति इतरत्र आढळून येतात त्याच विदर्भांत आहेत आणि जो बेरजेचा चमत्कार आज महाराष्ट्रांत घडून आला तोच उद्यां विदर्भांत घडून येण्याचीही शक्यता आहे.

## पूर्वींची आठवण

आत्मसंतुष्टता सोडली व ह्या पराभवाच्या मुळाशीं जाण्याचा प्रयत्न केला तर हें महाद्विभाषिक आल्यानंतर समितीला एवढा विजय कां मिळावा आणि कॉंग्रेसचा एवढा पराभव कां झाला, ह्याचें आपाततः आश्चर्य वाटूं लागतें. कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या पहिल्या बैठकींत काय घडलें ह्याची मी आठवण देतों. ह्या बैठकीला अवघें वर्ष झालें असेल. पण लोकांची स्मृति अल्पकाळ टिकते. ह्या बैठकींत ह्याच महाद्विभाषिकाची मागणी करण्यांत आली होती. आणि ह्या महाद्विभाषिकाचें त्या वेळीं सर्वत्र स्वागत करण्यांत आलें होतें. एकटे कम्युनिस्ट वगळून. देवांचे उद्गार मला पक्के आठवतात. कॉंग्रेसश्रेष्ठींना उद्देशून ते बोलले, " मराठी व गुजराती बांधव एकत्र येण्यानें देशहित साधेल असें पं. नेहरूंना वाटत असेल तर सगळे मराठी भाषिक लोक व सगळे गुजराती भाषिक लोक ज्या द्विभाषिकांत एकत्र येतील असलें द्विभाषिक

आम्हाला द्या " आणि नेहरूंच्या हस्तें ह्या विशाल द्विभाषिकाचा मंगल कलश मिळ-विण्याचें तें देवस्वप्नही आपल्या चांगलेंच लक्षांत आहे. महाराष्ट्र काँग्रेसनें ज्या द्विभाषिकाची मागणी केली होती आणि ज्या मागणीला त्या वेळीं सार्वत्रिक पाठिंबा मिळाला तेंच महाद्विभाषिक आतां आलें आहे; आणि तें देखील कोणत्याही अटी न घालतां. त्या वेळीं गुजरात प्रदेश काँग्रेसनें ह्या द्विभाषिकाला तीव्र विरोध केला होता. त्या वेळीं देवप्रभृति पुढारी मुंबईतील बिगरमहाराष्ट्रीय समाजाला मागतील तें संरक्षण, हमी द्यावयास तयार झाले होते. गुजरातचा मुख्य मंत्री असावा येथपर्यंत औदार्याची मजल गेली होती. आणि आज अशी कोणतीही अट न घालतां महाद्विभाषिक आलें आहे. महाराष्ट्रीयांची निर्भेळ बहुसंख्या आहे. महाराष्ट्रीय मुख्य मंत्री आहे. तरी देखील देवांनीं मागितलेल्या महाद्विभाषिकाला महाराष्ट्रांतील लोकमताचा अनुकूल कौल पडला नाहीं. समितीचा विरोध कृत्रिम स्वरूपाचा असतांना लोकमत विरुद्ध गेलें.

## निष्ठा कीं डाव?

हें असें कां व्हावें? ह्या चमत्काराचीं दोन कारणें उघडउघड दिसतात. ह्या महाद्विभाषिकावर महाराष्ट्रांतील काँग्रेसच्या नेत्यांची निष्ठा होती असें मुळींच घडून आलेलें नाहीं. मंगल कलशाची सोज्वळ भाषा वापरणारे देव ह्यांचीदेखील ह्या महाद्विभाषि-कावर निष्ठा नव्हती. ह्या महाद्विभाषिकांत घटनात्मक व शासनतंत्रात्मक पेंचप्रसंग वारंवार निर्माण करून ह्या महाद्विभाषिकांतून आम्हीं नजीकच्या काळांत संयुक्त महाराष्ट्र मिळवूं, असे देवांनीं माझ्याजवळ उद्गार काढलेले आहेत, हें मी येथें जाहीरपणें सांगूं इच्छितों. ह्या दुटप्पी किंवा दुहेरी मनोवृत्तीला उद्देशूनच मीं त्या वेळीं ' ही निष्ठा कीं हा डाव? ' असा देवांना उद्देशून सवाल विचारला होता. देव त्यामुळें चिडले. पण लोकांनीं मात्र, श्रेष्ठींच्या त्रिराज्य योजनेला सुरुंग लावणारा एक डाव, ह्याच भावनेनें महाद्विभाषिकाच्या मागणीचें स्वागत केलें होतें.

महाद्विभाषिकाची मागणी करणाऱ्या महाराष्ट्रांतील प्रमुख काँग्रेसनेत्यांनाही महाद्विभाषिक मनापासून नको होतें. मध्यंतरीं जवाहरलाल नेहरू मुंबईला येऊन गेले. त्यांनीं महाद्विभाषिकाची टूम हळूच सोडली. ना. मोरारजीभाई राजी झाले. देव मध्यस्थी करावयास सिद्ध झाले. पण देवांच्या अनुयायांनीं त्यांची मध्यस्थी उडवून लावली. स्वतःच्या संघटनेनें केलेली मागणी मिळण्याचा रंग दिसतांक्षणीं, डाव आपणांवर उलटणार ह्या भीतीनें, देवगणांची गाळण उडाली. हा इतिहासही ताजा आहे. महाराष्ट्र प्रदेशकाँग्रेसनेंही लोकांना, द्विभाषिकावर निष्ठा ठेवा, असें सांगितलें नाहीं. डाव खेळा व आंतून सुरुंग लावा, अशीच शिकवण दिली. असला आंतबाहेरचा डाव खेळणाऱ्या मनोवृत्तीला लोकांनीं बाहेरून सुरुंग लावला. कारण जे

श्रेष्ठींशीं आंतून एक व बाहेरून एक असें वागावयास कमी करीत नाहींत ते लोक लोकांशीं देखील असाच दुहेरी डाव कशावरून खेळणार नाहींत, असा सवाल लोकांनीं केला तर त्यांत त्यांचा काय दोष ?

## आध्यात्मिक दौर्बल्य

ह्या चमत्काराचें दुसरें कारण म्हणजे महाराष्ट्रीय लोक-मनांत निर्माण झालेला संशय किंवा अविश्वास. सत्य कितीही अप्रिय असो, तें आपण मान्य केलें पाहिजे. तें सत्य असें आहे कीं, त्रैभाषिक मुंबई राज्यांत इतकीं वर्षें राहिल्यानंतर द्वैभाषिकांत आपल्या आशाआकांक्षा पूर्ण होऊं शकतील ह्यावरला महाराष्ट्रीय मनाचा विश्वास उडालेला आहे. हा अविश्वास काल्पनिक असेल अथवा त्याला वास्तवतेचा आधार असेल. पण महाराष्ट्रांत आज अविश्वास आहे हें खरें. त्यांत महाद्विभाषिकाची प्रथम मागणी केली गेली त्या वेळीं गुजरात प्रदेशकाँग्रेसनें त्याला निकराचा विरोध केला होता. आणि आयत्या वेळीं गुजरातच्या नेत्यांनीं ह्या महाद्विभाषिकाला बिनशर्त मान्यता दिली हें पाहिल्यानंतर, ह्यांत कांहींतरी डाव असला पाहिजे असें त्या अविश्वासाचें संशयांत रूपांतर झालें. जेव्हां दोन समाजांत संशय निर्माण होतो तेव्हां तो दोघांनाही बाधतो. महाराष्ट्र व गुजरात ह्या दोघांनाही हा संशय बाधला हें आतां सिद्ध झालें आहे. महाराष्ट्राला गुजरातचा हा डाव वाटला; तर गुजराती जनतेला आपल्या नेत्यांनीं आपणांस ह्या राज्यांत अल्पसंख्य बनविलें ह्याचा राग आला.

लोक निष्ठेला मान देतात असें मला वाटतें. आपणाला निष्ठा पटली नाहीं तरी त्या निष्ठेची रेवडी उडवीत नाहींत. महाराष्ट्रांत काँग्रेसचा सपशेल पराभव झाला आणि गुजरातमध्यें काँग्रेसला शंभर जागा मिळाल्या, ह्यांतील फरक निष्ठेचा आहे. गुजरातच्या काँग्रेसचे नेते अप्रामाणिक डाव खेळले नाहींत. काँग्रेसश्रेष्ठी जो निर्णय देतील तो आम्ही मान्य करूं, असें प्रारंभापासून अखेरपर्यंत ते सांगत आले. महाराष्ट्रांत मात्र अखेरपर्यंत काँग्रेसचे नेते संयुक्त महाराष्ट्राचा डाव खेळत होते. महाराष्ट्र प्रदेशकाँग्रेसचे अध्यक्ष श्री. मामासाहेब देवगिरीकर ह्यांनीं राज्यसभेंत ह्या द्विभाषिकावर जें मासलेवाईक भाषण केलें त्याची मी मामांना व काँग्रेसजनांना फिरून आठवण करून देतों. तेच मामा आज, द्विभाषिकाचा प्रचार करावयास वेळ अपुरा पडला, असें सांगत सुटले आहेत. ही घटना अश्मयुगांतील नाहीं. कांहीं महिन्यांपूर्वीं घडलेली ही घटना आहे. कदाचित् हा षण्मासीचा वायदाही असेल. देव, हिरे, देवगिरीकर प्रभृतींची निष्ठा संयुक्त महाराष्ट्रावर असेल तर त्यांनीं आपली निष्ठा उघड करावयास हरकत कोणती ? निष्ठेला सौदा माहीत नाहीं. जर द्विभाषिकावर निष्ठा असेल तर तसें प्रारंभापासून रोखठोक सांगण्याचें धैर्य त्या निष्ठेमधूनच येतें. पण लोकमताची भीति, काँग्रेसबाहेर पडलों

तर आपलें स्थान जाईल कीं काय ही भीति, कॉंग्रेसमध्यें राहून लोकप्रियता टिकविण्याची धडपड, ह्या अनेक कारणांनीं महाराष्ट्रांतील कॉंग्रेसनेते दुबळे पडले. त्यांचा पराजय हा आध्यात्मिक दौर्बल्याचा पराजय होय.

## जुन्या त्रैभाषिकाचा कटु अनुभव

खरें म्हटलें तर मुंबई राज्य पूर्वीदेखील बहुभाषिक होतेंच. पूर्वी तें त्रैभाषिक होतें; आतां तें द्वैभाषिक झालें आहे, एवढाच काय तो फरक. पण हें राज्य एकभाषिक कधींही नव्हतें. ह्या बहुभाषिक राज्यांतून एकभाषिक राज्यें निर्माण व्हावींत अशी लोकांची मागणी होती. गुजराती जनता महागुजरातची मागणी करीत होती; महाराष्ट्रीयांना संयुक्त महाराष्ट्र हवा होता.

अशा प्रकारें एकभाषिक राज्याची मागणी होत होती ह्याचा अर्थच असा आहे कीं, जुन्या त्रैभाषिक राज्याचा अनुभव लोकांना आशादायक वाटत नव्हता. दोन भिन्न-भाषिक समाज जेव्हां एकत्र येतात तेव्हां, ते एका राज्यांत सुखानें नांदावयाचे झाल्यास, त्या दोन्ही समाजांत एकमेकांविषयीं भ्रातृभाव निर्माण झाला पाहिजे. महाराष्ट्र व गुजरात ह्यामध्यें अशा प्रकारचा भ्रातृभाव निर्माण झालेला नव्हता. उलट, एकमेकांत कुरबुरी व तक्रारी वाढत होत्या. ही गोष्ट अगदीं सत्य आहे. भारतीय समाजाची सध्यांची घडणच अशी आहे कीं, त्या समाजांत दोन भिन्नभाषिक समाज एकत्र आले कीं सांस्कृतिक तेढ वाढणें अपरिहार्य आहे. ही गोष्ट ओळखूनच पं. मोतीलाल नेहरू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या कमेटीनें आपल्या अहवालांत भाषिक राज्याचें तत्त्व मान्य केलें होतें. नेहरू रिपोर्टांतील पुढील उतारा ह्या दृष्टीनें वाचनीय आहे.

" If a province has to educate itself, and do its daily work through the medium of its own language, it must necessarily be a linguistic area. If it happens to be a polyglot area, difficulties will continually arise and the media of instruction and work will be two or even more languages. Hence, it becomes most desirable for provinces to be regrouped on a linguistic basis. Language as a rule corresponds with a special navity of culture, of traditions and literature. In a linguistic area all these factors will help in the general progress of the province. ( Report of the Nehru committee, Page 62. )

ह्या उताऱ्याचें परिशीलन केल्यानंतर असें दिसून येईल कीं, भिन्नभाषिक लोक केवळ एकत्र राहाण्यानें तेढ निर्माण होत नाहीं. महाराष्ट्रीय व गुजराती खाजगी जीवनांत शेजारधर्मानें राहूं शकतात. पण सत्तावादी राजकारणाचा प्रश्न आला कीं तेढ व असमाधान निर्माण होत असतें. एका घटकराज्याचे भागीदार असा दोन

भाषिक गटांचा संबंध आला कीं, कोणाच्या हातांत किती सत्ता असावी आणि कोणत्या विभागाला किती फायदा मिळावा, ह्यावर मतभेद आलाच. भावाभावांत बंधुप्रेम असतें किंवा असावें हें वेदान्ताच्या दृष्टीनें ठीक आहे. पण मिळकतीच्या वांटणीचा प्रश्न आल्यावर बंधुप्रेम बाजूला राहून भाऊबंदकीला सुरुवात होते, हा व्यवहार सर्वांच्या परिचयाचा आहे. जुन्या त्रैभाषिक मुंबई राज्यांत अशी परिस्थिति होती. विशेषतः महाराष्ट्रीय समाजामध्यें व त्यांतल्या त्यांत सुशिक्षित वर्गामध्यें ही भावना फार प्रबळ होती.

## महाराष्ट्रीयांची भावना

पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आमच्या वरिष्ठ नेत्यांनीं भाषिक राज्याच्या तत्त्वावर टीका करण्यास सुरुवात केली. देशाची फाळणी झाल्यानंतर त्यांना असें वाटूं लागलें कीं भाषिक राज्याचें तत्त्वही असेंच घातक आहे. कां घातक आहे ह्याचा खुलासा कोणींही केला नाहीं. जे. व्ही. पी. अहवालांत ह्यासंबंधीं पुढील गोष्टी नमूद केलेल्या आढळतात :

( १ ) कॉंग्रेसनें मागें भाषिक राज्याच्या तत्त्वाला मान्यता दिली होती त्या वेळीं ह्या तत्त्वाची अंमलबजावणी करण्याचा प्रसंग आलेला नव्हता. त्यामुळें हें तत्त्व अमलांत आणलें तर त्याचे काय परिणाम होतील हें त्या वेळीं समजलें नाहीं.

( २ ) देशाचें ऐक्य, संरक्षण व अभ्युदय ह्यांना मूलभूत महत्त्व. त्या दृष्टीनें फुटीर वृत्तीला उत्तेजन मिळतां कामा नये.

( ३ ) भाषा जशी एकता निर्माण करते तशीच फुटीर वृत्तीही निर्माण करते.

( ४ ) आणि म्हणून भाषावार राज्यरचनेचें जुनें तत्त्व अंमलांत आणतांना प्रत्येक घटकराज्याचा स्वतंत्र विचार झाला पाहिजे.

आणि मग, शासनसौकर्य, समतोल अंदाजपत्रक, साधनसंपत्ति इत्यादि अनेक घटकांचाही ह्याबरोबरच विचार होणें अगत्याचें आहे, असें सांगून भाषेच्या तत्त्वाचें प्राथमिक महत्त्व हिरावून घेण्यांत आलें.

अशा रीतीनें कॉंग्रेसनें आपल्या भूमिकेंत बदल केला. ठीक आहे. माणसांचीं मतें बदलणें शक्य असतें. विचार बदलणें हेंच मानवी मनाच्या जिवंतपणाचें लक्षण होय. मग रा. पु. कमिशनकडून अपेक्षा अशी होती कीं, ह्या बदललेल्या भूमिकेला अनुसरून राज्यपुनर्घटनेचा प्रश्न कमिशनकडून हाताळला जाईल. प्रत्यक्ष चित्र मात्र ह्याच्याविरुद्ध दिसलें. बाकी सारीं घटकराज्यें एकभाषिक आणि घोडें अडलें तें फक्त एका मुंबई राज्याच्या पुनर्घटनेच्या प्रश्नावर. आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र ह्या तीन भाषिक राज्यांचाच कमिशनसमोर खरा प्रश्न होता. ह्यांपैकीं आंध्र व कर्नाटक ह्या भाषिकराज्यांना मान्यता देण्यांत आली. पण महाराष्ट्राला मात्र द्वैभाषिक राज्यांत समाविष्ट करण्यांत आलें. तेव्हां एवढ्या एकाच राज्याबाबत कां अपवाद करण्यांत आला, असा महाराष्ट्रांतील

लोकमताचा सवाल होता. कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यापासून तो कनिष्ठ नेत्यापर्यंत एकानेंही ह्या सवालाचें समाधानकारक उत्तर दिलेलें नाहीं. त्यामुळें, महाराष्ट्राला कांहीं केल्या घटकराज्य मिळूं द्यावयाचें नाहीं अशी कॉंग्रेसची इच्छा आहे, अशी जर महाराष्ट्रांत प्रतिक्रिया उमटली तर त्याबद्दल लोकांना खचित दोषी धरतां येणार नाहीं. नियम लागू करावयाचा तर तो सर्वांना लागू करावयास पाहिजे. मध्यंतरीं बंगाल व बिहार ह्यांचें एक घटकराज्य बनविण्याचा बेत जाहीर झाला. डॉ. रॉय व श्रीकृष्ण सिन्हा ह्यांच्या सह्यांनीं करारनामे ठरले. पण बंगालमधील एका पोटनिवडणुकीचा कौल पाहून डॉ. बिधनचंद्र रॉय ह्यांनीं ती योजना मागें घेतली आणि कॉंग्रेसश्रेष्ठींनीं त्याबाबत कोणताही आक्षेप घेतला नाहीं. ह्याची प्रतिक्रिया महाराष्ट्रावर होणार नाहीं असें कॉंग्रेसच्या नेत्यांना वाटत होतें काय ? ह्या महाद्विभाषिकांत महाराष्ट्रीय बहुसंख्य असूनही महाराष्ट्रांतील लोकमत विरुद्ध गेलें ह्याचें कारण हें असें आहे. 'सर्वांच्या मागण्या पूर्ण करतां आणि आमच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता लावतां; असें कां ?' महाराष्ट्रीय लोकांना आपणांवर अन्याय झाला असें वाटतें त्या अन्यायाचें स्वरूप हें असें आहे.

## अवसानघात

महाराष्ट्रांत तरी नवें महाद्विभाषिक रुजलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याच्याविरुद्ध लोकमत झालेलें आहे, असें निवडणुकीचे निकाल सांगतात. ह्या महाद्विभाषिकाची रचना महाराष्ट्राला अनुकूल असूनही महाराष्ट्रांतील लोकमत विरुद्ध आहे. मी येथें लोकमताचा विचार करीत आहें. लोकमतावर पोसले गेलेल्या समितीच्या राजकारणाचा विचार करीत नाहीं. तो विचाराचा स्वतंत्र विषय असून त्याची मीमांसा पुढें यावयाचीच आहे. लोकांचा विरोध कां, ह्याचीं कांहीं कारणें ह्या दोन प्रकरणांत सांगितलीं. ह्याखेरीज वाटाघाटीचें पर्व हें आणखी एक कारण देतां येईल. महाराष्ट्र कॉंग्रेसनें महाद्विभाषिकाची मागणी प्रथम केली. त्यानंतर श्रेष्ठींनीं त्रिराज्ययोजना सुचविली. ह्याचा अर्थ, महाराष्ट्र कॉंग्रेसनें एक डाव टाकला असा श्रेष्ठींचा समज झाला, असा होतो. कॉंग्रेसश्रेष्ठी ज्या वेळीं त्रिराज्ययोजनाच पक्की धरून बसले, तेव्हां महाराष्ट्रांतील कॉंग्रेसनेते हतबल व हतबुद्ध झाले. कॉंग्रेसची शिस्त व स्वतःची भावना ह्या द्वंद्वामध्यें कॉंग्रेसचे दोन गट होऊन एक मोठा गट दोलायमान मनःस्थितींत राहिला. संयुक्त महाराष्ट्र हवा व त्यासाठीं आम्ही अधिकारपदाचा त्याग करूं, असें एक पंथ म्हणत होता. पण त्यावर तरी त्यांची आत्यंतिक निष्ठा होती काय ? श्रेष्ठींच्या परवानगीनें हे लोक राजिनामे देणार होते म्हणे ! परवानगी मिळाली नाहीं आणि राजिनामे दिले नाहींत ! परत त्रिराज्य योजना जाऊन त्रिघटकयोजना संमत झाली. त्याप्रमाणें शासनयंत्राच्या कारवाईला सुरुवात झाली आणि ना. देशमुख ह्यांच्या राजिनाम्यानंतर लोकसभेंत एक दिवस

अचानक हें महाद्विभाषिक अवतरलें. वाटाघाटींच्या ह्या इतिहासावरून लोकांना काय आढळून आलें ? फार सखोल विचार करून हें महाद्विभाषिक लोकसभेंत मंजूर झालें, असें घडलें होतें काय ? नाहीं. महाराष्ट्रांतील कॉंग्रेसनेत्यांची तरी ह्या महाद्विभाषिकावर निष्ठा होती काय ? नाहीं. संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेवर तरी महाराष्ट्रांतील नेते ठाम उभे होते काय ? नाहीं. महाद्विभाषिकासाठीं लोकप्रियतेचा त्याग केला पाहिजे, किंवा संयुक्त महाराष्ट्रासाठीं सत्ता व संघटना ह्यांचा त्याग केला पाहिजे, हे दोन मार्ग सरळ सरळ दिसत असतांना ह्यांपैकीं कोणत्या तरी एका मार्गानें जाण्याचा त्यांनीं निश्चय केला असें दिसलें काय ? नाहीं. त्यांना लोकप्रियताही हवी होती आणि सत्ताही हवी होती. अशा धरसोडीच्या धोरणाला लोकांनीं नापसंति दर्शविली, असा ह्या निवडणुकीच्या निकालाचा अर्थ आहे. आणि ह्यामध्यें स्वतःचे दोष उघडे होतात, म्हणून वेळ मिळाला नाहीं अशी आतां हे लोक सारवासारव करीत आहेत. महाराष्ट्र प्रदेशकॉंग्रेसनें लोकांना संयुक्त-महाराष्ट्र-निष्ठा शिकविली; द्विभाषिकनिष्ठा शिकविली नाहीं. आपण हतबल झालों आहोंत असें लोकांना दाखवून, हें द्विभाषिक वरून आमच्यावर लादलें आहे असा ग्रह त्यांनींच लोकांमध्यें निर्माण केला. अशा निष्ठा नसलेल्या व दुबळ्या लोकांना लोक कसें मत देणार ? दुर्बलांचा देवदेखील जेथें घात करतो–तसा देवांनीं अवसानघात केलाच–तेथें सामान्य माणसाची काय कथा ?

प्रकरण चौथें

# अन्याय नि अपमान ह्यांचें शल्य

द्विभाषिकांत कालांतरानें महाराष्ट्रीय लोक नांदावयास राजी होतील अथवा न होतील. आज तरी महाराष्ट्रीय मन द्विभाषिकाविरुद्ध आहे. राजकीय सत्ता राबविण्यासाठीं जेव्हां दोन भाषिक गट एकत्र येतात तेव्हां, त्या दोन गटांमध्यें सख्य निर्माण होईलच, असें निश्चयानें सांगतां येणार नाहीं. महाराष्ट्र आणि गुजरात ह्यापुरतें बोलावयाचें झाल्यास, सत्तावादी राजकारणांत दोघांचें गेलीं पंचवीसतीस वर्षें पटत नाहीं, असा इतिहास आहे. विविध भाषिक गट ज्या समाजांत आहेत अशा भारतासारख्या देशांत, एका विशिष्ट भाषिक गटामध्यें अखिल भारतीय कीर्तीची मातबर व्यक्ति निपजणें, हा त्या गटाला वर आहे कीं शाप आहे, असा केव्हां केव्हां संभ्रम पडतो. महाराष्ट्र व गुजरात ह्या दोन भाषिक समाजांतील संबंध दुरावण्यास व त्यांत हितविरोध निर्माण होण्यास ह्या दोन प्रांतांत होऊन गेलेल्या मातबर व्यक्तींचें स्मरण बऱ्याच अंशानें कारणीभूत झालेलें आहे. महाराष्ट्रांत लोकमान्य होऊन गेले; गुजरातेंत महात्माजी नंतर आले. लोकमान्य व महात्मा गांधी ह्यांमध्यें विरोध निर्माण झाला असता काय, ह्या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. पण लोकमान्य गेल्यानंतर महात्माजी व त्यांची प्रभावळ महाराष्ट्राला अखिल भारतीय राजकारणांत पद्धतशीरपणें खची करण्याचा प्रयत्न करीत आहे, असा महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्गामध्यें पक्का समज झालेला आहे. युगकर्ता पुरुष होऊन गेल्यानंतर, त्याच्या स्मृति समाजांत दीर्घ काळ मागें रेंगाळत राहातात. आपल्या देवतेला मागें टाकणारी दुसऱ्या लोकांची दुसरी देवता पुढें आलेली त्या देवतेच्या भक्तांना खपत नाहीं. लोकमान्यांच्या पश्चात् महाराष्ट्रामध्यें गुजरातविरोधी प्रतिक्रिया ह्यामुळें निर्माण झाली. आणि नंतरच्या राजकारणांत महाराष्ट्राला असेंही आढळून आलें कीं, भारतीय कीर्तीचे पुढारी जीं राजकीय धोरणें ठरवितात त्यांमध्यें महाराष्ट्राला स्थान नाहीं. महाराष्ट्राला दुय्यम दर्जा प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्राची पीछेहाट होत आहे. महाराष्ट्रांतील शंकरराव देव ह्यासारख्या तृतीय श्रेणीच्या व्यक्तीला महाराष्ट्राचें नेतृत्व बहाल करून, महाराष्ट्रांतील शक्तीबुद्धीची अक्षम्य उपेक्षा होत आहे. आणि आतां मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य निर्माण झालें तर, न जाणों, महात्माजी नसलेल्या गुजरातला महाराष्ट्र परत एकदा मागें टाकील, ह्या भावनेनें संयुक्त महाराष्ट्राला गुजरात विरोध

करीत आहे. आणि त्यांतून हें महाद्विभाषिक आमच्यावर आलें आहे. महाराष्ट्राचा विरोध इतका खोलवर रुजला आहे, असें मला वाटतें.

## दुखावलेला मध्यमवर्ग

गेल्या पंचवीस वर्षांच्या राजकारणांत महाराष्ट्राची पीछेहाट झाली हें एक ऐतिहासिक सत्य आहे. ह्याचीं कारणें कांहींही असतील. गुजरातच्या नेत्यांचा हा एक हेतु होता, हा जो महाराष्ट्रांतील सुशिक्षितांचा समज आहे, तो खरा असेल अथवा खोटा असेल. परंतु महाराष्ट्रांतील अव्वल दर्जाची बुद्धिमत्ता कॉंग्रेसपासून दोन हात दूर होती हें सत्य कोणासच नाकारतां यावयाचें नाहीं. गांधीवादी महाराष्ट्र व बुद्धिवादी महाराष्ट्र ह्यांची कायमची फारकत झालेली आहे. कॉंग्रेसची महाराष्ट्रांत ताकद वाढली ती कॉंग्रेसनें सत्ताग्रहण केलें तेव्हांपासून. आणि सत्ताग्रहण केल्यानंतर अथवा करावयाच्या सुमारास कॉंग्रेसमध्यें सत्तावाद्यांचा भरणा झाला. जुना सत्यशोधक समाज पुढाऱ्याअभावीं कॉंग्रेसमध्यें आला. कॉंग्रेसही सत्ताशोधक बनली व हे सत्यशोधकही सत्ताशोधकच होते. कॉंग्रेसचें संख्याबळ वाढलें. ह्या संख्याबळावर बुद्धीची व विचाराची हेटाळणी सुरू झाली. त्यामुळें मध्यमवर्ग दुरावला. हा दुरावलेला व दुखावलेला मध्यमवर्ग हाच ह्या द्विभाषिकाचा खरा विरोधक आहे. कामगार व किसान ह्यांच्या प्रेमाचें भरतें आमच्या पुढाऱ्यांना कितीही येवो, भारतीय राजकारणाचा खरा मध्यबिंदु हा मध्यमवर्गच आहे. अगदीं लहान खेडेगांवांतील प्राथमिक शिक्षकापासून पुणें-मुंबई येथील देव, देवगिरीकर, चव्हाण, हिरे, एस्. एम्., डांगे, येथपर्यंत सारे पुढारी मध्यमवर्गीय आहेत. हेच राजकारणांत रान पेटवतात आणि विझवतात. लोक त्यांच्या मागोमाग जात असतात. ह्या मध्यमवर्गाचा गुजरातशीं सत्तावांटप करण्यास विरोध आहे. अगदीं निकराचा विरोध आहे. आणि म्हणून महाद्विभाषिकालाही विरोध आहे.

महाराष्ट्रांतील सामान्य जनतेमध्यें आपणांवर अन्याय झाला ही जी भावना पसरली आहे त्या भावनेची मीमांसा थोड्या प्रमाणांत येथवर मीं केली. तिचाच आणखी विस्तार येथें करतों. ह्या मीमांसेविषयीं कॉंग्रेसजनांना एक सूचना द्यावीशी वाटते. ही मीमांसा म्हणजे वस्तुस्थितीचें मूल्यमापन करण्याचा एक प्रयत्न आहे. अमुक एका पक्षाची निंदा वा स्तुति ह्यामध्यें येत नाहीं. कॉंग्रेसनें जीं कांहीं धोरणें मागें ठरविलीं तीं तिनें सद्बुद्धीनें ठरविलीं असतील. परंतु राजकारणांत एखाद्याचा हेतु काय आहे, हें लोक त्याच्या कृतीवरून ओळखतात. आणि त्या कृतीमुळें लोकांच्या मनावर काय परिणाम होतो ह्याला अधिक महत्त्व आहे. वास्तव मूल्यमापन असें मी ज्याला म्हणतों तें हें. आपण शुद्ध बुद्धीनें कर्म केलें ह्यामुळें आपणांस आत्मसमाधान लाभेल. आणि तसें समाधान कॉंग्रेसजनांनीं खुशाल मानून घ्यावें. पण आपल्या कर्माचा लोकांच्या मनावर काय परिणाम होतो ह्याचा विचार

कर्तव्य असेल–आणि काँग्रेसला सध्यां तोच विचार कर्तव्य आहे असें मला वाटतें–तर ह्या आत्मसमाधानाचा तसा उपयोग कांहीं नाहीं. लोकांचें समाधान झालें कीं नाहीं, लोकांना आपलें धोरण व वर्तन कसें दिसतें, आणि त्यामुळें आपल्या हेतूचा विपर्यास होत असेल तर आपला हेतु व आपली कृति ह्यांत कांहीं विसंगति आहे काय, ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्याशिवाय वास्तव मीमांसा पुरी होऊं शकत नाहीं. थोडक्यांत 'त्रयस्थाचा किंवा दुसऱ्याचा दृष्टिकोण' (Other man's point of view) असें ज्याला म्हणतात तो आपण स्वीकारला पाहिजे. हा एक प्रकारें वैचारिक परकायाप्रवेशच आहे; आणि आपल्या मनांतील पूर्वग्रह, स्वपक्षप्रेम, श्रद्धा ह्यांना क्षणभर बाजूस सारल्याखेरीज ही विद्या साध्य होणार नाहीं. ह्या भूमिकेवरून मी अन्यायमीमांसा करण्याचा प्रयत्न करणार आहें.

## निराशाजनक अनुभव

ह्या महाद्विभाषिकाचा स्वीकार करावा का त्याला विरोध करावा हें ठरविण्यापूर्वी मागील त्रैभाषिकाचा अनुभव लोकांनीं विचारांत घेतल्यास त्यामध्यें लोकांना दोषी धरतां येणार नाहीं. अखिल भारतीय काँग्रेसच्या संघटनेंत महाराष्ट्राला किती प्रमाणांत स्थान मिळालें, हा पक्षनिष्ठ राजकारणांतील भाग आपण येथें सोडून देऊं. परंतु १९३६, १९४७ व १९५२ अशीं तीन मंत्रिमंडळें ह्या राज्यांत होऊन गेलीं. ह्यांपैकीं १९३६ सालचें मंत्रिमंडळ राष्ट्रवादाच्या आंदोलनांतून निर्माण झालेलें मंत्रिमंडळ होय. लोकांच्या मनांत महाराष्ट्रावर अन्याय झाला ही भावना प्रबळ नव्हती. जेथें साऱ्या देशावरच अन्याय झाला असून त्या अन्यायाचें परिमार्जन करण्याचा प्रश्न होता, तेथें हा प्रादेशिक प्रश्न गौण ठरला असल्यास नवल नाहीं. तथापि, त्याही वेळीं असें दिसलें कीं, ह्या राज्याच्या मंत्रिमंडळांत महाराष्ट्राला दुय्यम स्थान आहे आणि महाराष्ट्रीय मुख्य मंत्री असून लोकांना हें जाणवलें ही गोष्ट विशेष होय. तथापि, राष्ट्रवादाच्या महापुरांत हें सारें वाहून गेलें किंवा लव्हाळ्याप्रमाणें खालीं दबलें. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, राष्ट्रवादाखालीं ज्या भावना दबल्या होत्या त्या वरती आल्या. परत एकदां खेर-मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें. आणि ह्या खेपेस महाराष्ट्राविरुद्ध पक्षपात होत आहे ह्या भावनेला वाचा फुटली. खुद्द काँग्रेसमध्यें ही भावना प्रकट होऊं लागली. पक्षपात, विषमता, अन्याय ह्या भावनांना त्या मंत्रिमंडळाच्या वेळीं केवळ कुरबुरीचें स्वरूप होतें. १९५२ च्या मंत्रिमंडळानंतर त्या कुरबुरीला व्यापक स्वरूप येऊं लागलें. जी भावना काँग्रेसजनांमध्यें सुप्त होती तिचे पडसाद मंत्रिमंडळांत उमटूं लागल्याचें लोकांना दिसून आलें. सारांश, मागच्या त्रैभाषिक राज्यांतील अनुभव महाराष्ट्रीय मनाला आशादायक वाटला नाहीं.

## अगा जें झालेंचि नाहीं

अन्याय झाला म्हणजे काय झालें, ह्याची छाननी करण्यापूर्वी रा. पु. कमिशननें हा प्रश्न किती उथळपणें उडवून लावला, हें पाहाण्यासारखें आहे. दोन समाजांतील तेढ,

विकासखर्चाची विषम वांटणी, नोकरवर्गामध्यें पक्षपात, अशा स्वरूपाच्या तक्रारींची दखल कमिशनलाही घ्यावी लागली. ही गोष्ट अहवालांतील पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.:—

"The demand for the separation of the Marathi-speaking areas and their consolidation into one administrative unit rests on the arguments, which are generally advanced against the continuance of composite States and in favour of the formation of linguistic states. There are internal tensions, discriminatory and unequal distribution of development expenditure and favouritism in services. (S. R. C. Report; Page 113.)

पण या उताऱ्यावरून कमिशनला या तक्रारींचें गांभीर्य कळलें नाहीं असेंही आढळून येतें. जेथें जेथें दोन भाषिक गट एकत्र येतात तेथें तेथें ज्या तक्रारी नित्य ऐकूं येतात त्यांपैकींच ह्या आहेत, त्या काय एवढ्या मनावर घ्यावयाच्या, असा ह्या उताऱ्यांतील Generally advanced ह्या शब्दप्रयोगाचा भावार्थ आहे. एका दोन कोटि भाषिक गटाच्या भावना अशा प्रकारें दुर्लक्षिल्यानें, परिणाम किती भयंकर होतात ह्याची कल्पना कमिशनला न यावी ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. पण दुर्दैव एवढ्यावर संपलें नाहीं. ह्या तक्रारींत कांहीं तथ्य नाहीं, असाहि कमिशननें आपला अभिप्राय नमूद केला असल्याचें खालील उताऱ्यावरून आढळून येतें :—

"On an unbiassed view of the relevant facts the existing State of Bombay cannot in our opinion be accused of having been partial to the interests of any particular area or group to such an extent as to justify its being broken up." (S. R. C. Report;page 120.)

कमिशनच्या मतानें ह्या तक्रारी 'अगा जें झालेंचि नाहीं' अशा स्वरूपाच्या आहेत.

## कांहीं महत्त्वाच्या तक्रारी

आपला दृष्टिकोण पूर्वग्रहविरहित आहे, आपण ह्या संदर्भांत येणाऱ्या सर्व वस्तु-स्थितीची पहाणी केली, आणि त्यावरून मागच्या त्रैभाषिक मुंबई राज्यांत एका विशिष्ट गटाला वा विभागाला पक्षपात इतक्या मोठ्या प्रमाणावर झाल्याचें आपणांस आढळून आलें नाहीं, अशीं तीन विधानें कमिशननें केलेलीं आहेत. हीं तिन्ही विधानें वास्तवतेपासून किती दूर आहेत हें स्पष्ट करण्यासाठीं कांहीं महत्त्वाच्या गोष्टींची मी येथें नोंद करतों.

| गुजरात | विषयविभागणी | महाराष्ट्र | विषय |
|---|---|---|---|
| १ ना. देसाई, मुख्यमंत्री | १०५ विषय | ना. हिरे | ४९ |
| २ " दिनकरराव देसाई | २६ | " निंबाळकर | २० |
| ३ " जीवराज मेहेता | ४३ | " तपासे | १५ |
| ४ " शांतिलाल शहा | २८ | " चव्हाण | ४ |
| एकूण | २०२ | | ८८ |

( ५ ) दरमाणशीं विकासखर्च किती पडत होता ह्याचे खालीं दिलेले आंकडेही वस्तुस्थितीवर प्रकाश पाडतील.

दरमाणशीं विकासखर्च ( रुपयामध्यें )

| | लोकसंख्या | वर्ष १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ |
|---|---|---|---|---|
| १ महाराष्ट्र | २,१७,२०,०९१ | १.७ | २.३ | १.८ |
| २ गुजराथ | १,१८,९६,७८९ | २.९ | ३.१ | ३.२ |

( १ ) मागच्या त्रैभाषिक राज्यांत कर्नाटकांतील प्रतिनिधींनीं महाराष्ट्राची कधींच साथ केली नाहीं. उलट प्रत्येक वेळीं ते महाराष्ट्राच्या विरुद्धच गेले आहेत. म्हणजे गुजरात व कर्नाटक एका बाजूला आणि महाराष्ट्र दुसऱ्या बाजूला, ही विभागणी गेल्या दहा वर्षांत कायम झालेली होती. ह्याचा अर्थ, मागचें त्रैभाषिक मुंबई राज्य द्वभाषिकच होतें. ह्या द्वैभाषिकांत महाराष्ट्राची तक्रार केवळ विकासकामाच्या खर्चासारख्या तपशिलाची नव्हती. ती प्रामुख्यानें राजकीय स्वरूपाची होती. मंत्रिमंडळ, शासनतंत्र आर्थिक विकास इत्यादि सर्व क्षेत्रांत महाराष्ट्राला त्याची संख्या व गुण लक्षांत घेऊन योग्य स्थान मिळत नाहीं, अशा स्वरूपाची ती तक्रार होती.

( २ ) गेल्या मुंबई राज्यांत गुजराथचे १०६ व महाराष्ट्राचे १४९ प्रतिनिधी होते ; आणि तरीदेखील महाराष्ट्राला ४ व गुजरातला ४ अशी मंत्रिमंडळांतील जागांची वांटणी करण्यांत आलेली होती.

( ३ ) गेल्या खेपेस काँग्रेसपक्षाच्या नेतेपदावर जी निवडणूक झाली, ती काँग्रेसश्रेष्ठींच्या आदेशानुसार झाली. महाराष्ट्राला त्यांत न्याय मिळाला नाहीं. महाराष्ट्रांतील काँग्रेसचे नेते कमजोर व दुबळे ठरले असा जनतेचा ग्रह झाला.

( ४ ) गुजरात व महाराष्ट्र ह्यांच्या प्रतिनिधिसंख्येकडे दुर्लक्ष करून दोघांना समान प्रतिनिधित्व मंत्रिमंडळांत देण्यांत आलें, ही एक विषमता. प्रत्येक मंत्र्याकडे किती विषय होते ह्याची तपासणी केली तर ही विषमता वाढतच जाते.

(५) ह्यापेक्षांही गंभीर स्वरूपाची तक्रार अशी होती कीं, मंत्रिमंडळांत महाराष्ट्राचे म्हणून जे प्रतिनिधी घेण्यांत आले होते त्यांपैकीं निम्मे तरी महाराष्ट्राचे कणखर प्रतिनिधी नव्हते, असा महाराष्ट्रीयांचा समज झालेला आहे. ना. नाईक निंबाळकर ह्यांचेकडे बांधकाम खातें होतें; पण त्या खात्याचा कारभार पाहात होते उपमंत्री श्री. बाबूभाई पटेल. एस. टी. वर परिणामकारक नियंत्रण बाबूभाईचें. नव्या बसगाड्या आणल्या कीं त्यांची रवानगी गुजरातकडे व्हावयाची, हें ठरलेलें होतें. पनवेल ते रत्नागिरी हा रस्ता कॉंक्रीटचा व्हावा हें कित्येक दिवसांपूर्वी ठरलेलें आहे. पण त्या रस्त्याला सीमेंट मिळत नाहीं आणि खेडा जिल्ह्यांतील रस्ते कॉंक्रीटचे होऊन जातात. हें असें कां व्हावें ? महाराष्ट्रीयांना असें वाटतें कीं आपले योग्य प्रतिनिधि मंत्रिमंडळांत घेतले गेलें नाहींत.

## एक इशारा

ज्या गोष्टी मीं येथें नमूद केल्या आहेत त्या पूर्वी वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या साधार असतील अथवा निराधार असतील. पण सरकारनें ह्या गोष्टींचा कधींही इन्कार केलेला नाहीं. लोकांना विश्वासांत घेऊन त्यांच्यासमोर वस्तुस्थिति मांडण्याचा प्रयत्न केला नाहीं. आणि आतां इतक्या काळानंतर सरकार खुलासा करूं लागलें तर लोकांचा त्यावर विश्वास बसणार नाहीं. ही वस्तुस्थिति महाराष्ट्रीय मनाला कशी दिसते ? ह्यामध्यें महाराष्ट्रावर अन्याय झाला ही तर भावना आहेच ; पण महाराष्ट्राचे दुबळे प्रतिनिधी हाताशीं धरून महाराष्ट्रीयांकडून महाराष्ट्रावर हा अन्याय होत आहे, अशीही भावना आहे. ह्याचे दोन परिणाम झाले. येणाऱ्या महाद्विभाषिकाला महाराष्ट्रीयांची मनःस्थिति अनुकूल राहिली नाहीं ; आणि महाराष्ट्रांतील कॉंग्रेस हा अन्याय दूर करून घेण्याइतकी कणखर राहिली नाहीं, ती वरिष्ठांच्या ताटाखालचें मांजर बनलेली आहे, ह्या जाणिवेनें महाराष्ट्रांतील लोकमत कॉंग्रेसविरोधी बनलें. द्विभाषिकविरोध आणि कॉंग्रेसविरोध अशा रीतीनें ह्या निवडणुकींत एकरूप झालेला होता.

कॉंग्रेसचे श्रेष्ठ नेते आणि गुजरातचे नेते ह्यांना एक इशारा येथें देणें भाग आ . जेथें दोन भाषिक समाज एकत्र येतात तेथें ते राजीखुषीनें एकत्र आले तरच त्यांमध्यें सलोखा, बंधुभाव व शेजारधर्म निर्माण होऊं शकतो. आधुनिक भारतामध्यें रानडे, गोखले, टिळक, आगरकर ह्या कर्तबगार व्यक्ति निर्माण करणाऱ्या महाराष्ट्राला एक विशिष्ट स्थान आहे अशी एक आठवण महाराष्ट्रीय मनांत अद्यापि जिवंत आहे. आणि आधुनिक भारतामध्यें शिक्षण, प्रागतिक विचार, सुधारणावाद, वाङ्मय, सामाजिक प्रगति ह्या सर्व दृष्टीनें महाराष्ट्र इतर घटकांच्या मागें पडलेला नाहीं. किंबहुना, उत्तर भारताच्या दृष्टीनें विचार केल्यास, महाराष्ट्र सरसच आहे असाच कोणाहि त्रयस्थाला निर्णय द्यावा

लागेल. अशा महाराष्ट्राच्या बुद्धिमत्तेला बाजूस सारून, महाराष्ट्रांतील कोणत्या तरी व्यक्ति हातार्शी धरावयाच्या आणि महाराष्ट्राला अखिल भारतीय राजकारणाच्या चौकटींत तिसऱ्या-चौथ्या दर्जाचें स्थान द्यावयाचें, हा महाराष्ट्रीय मनाला एक मोठा अन्याय वाटतो. संकुचित प्रांतीय वृत्ति असें नांव ठेवून त्याची हेटाळणी करण्यानें ही अन्यायाची भावना शमणार नाहीं. उलट ती अधिकच तीव्र बनेल.' आणि संकुचित प्रांतीयता नाहीं कोठें ? गुजरातमध्यें नाहीं का उत्तर – प्रदेशांत नाहीं ? आपल्या भिन्नमतपत्रिकेंत श्री. पणिक्कर ह्यांनीं उत्तर–प्रदेशाच्या प्रवक्त्यांनीं काढलेले प्रौढीचे उद्‌गार ह्या संकुचित प्रांतवादावर विदारक प्रकाश टाकतात. ' Uttar – Pradesh is the backbone of India ' ही भाषा संकुचित प्रांतवादाची द्योतक नसेल तर मग ती कशाची द्योतक आहे ? तेव्हां सारीं घटक राज्यें संकुचित प्रांतवादाचा अभिमान बाळगीत आहेत, त्यांत श्रेष्ठींना कांहींच गैर दिसत नाहीं, आणि महाराष्ट्राचा मात्र संकुचित प्रांताभिमानी असा अधिक्षेप होतो ! ह्यामुळें अन्यायाबरोबरच आपला उपमर्द होत आहे, ही भावनाही महाराष्ट्रांत खोलवर रुजलेली आहे. पण अपमानाच्या भावनेचा विचार करतांना मुंबईच्या प्रश्नाचाहि विचार आपोआपच येतो. तो विचार पुढील प्रकरणांत करू.

अन्यायाबरोबरच अपमानाची भावनाहि महाराष्ट्रांत पसरलेली आहे. मुंबईच्या प्रश्नानें ही भावना महाराष्ट्रीयांच्या मनांत निर्माण झाली. अगदीं स्पष्टच सांगावयाचें तर मुंबईचा कारभार चालविण्यास महाराष्ट्रीय लोक नालायक आहेत असा अप्रत्यक्ष सूर ह्या सर्व वादविवादांत स्पष्टपणें उमटलेला होता.

बोलण्याची भाषा फक्त वेगळी होती. महाराष्ट्रीय लोक नालायक आहेत असें उघडपणें बोलणें जरा अवघड होतें. म्हणून मुंबई जर एकभाषिक राज्याची राजधानी झाली तर तिचें महत्त्व कमी होईल अशी आडवळणाची भाषा वापरण्यांत आली. पण रावसाहेब घोड्यावरून पडले ह्याऐवजीं रावसाहेब घोड्यावरून खालीं आले असा शब्दप्रयोग वापरला तरी दोहोंचा अर्थ एकच होतो हें सूज्ञ जाणतात. उदाहरणार्थ, दार कमिशनचा खालील अभिप्राय लक्षांत घेण्यासारखा आहे.

" It will be incongruous to make this multi–lingual, cosmopolitan city the capital of a unilingmal province. (**Report page 13**) "

दार कमिशननें केवळ विसंगत एवढाच शेरा मारला. जे. व्ही. पी. अहवालानें त्याच्यापुढें मजल मारली आहे. त्या अहवालामध्यें मुंबई महाराष्ट्रांत गेली तर तिचें सध्यांचें महत्त्व कमी होईल असें म्हटल्याचें खालील उताऱ्यावरून आढळून येतें.

"It is quite impossible for us to entertain any idea or any proposal which might injure the many-sided life and activity of this great city, which has been built up by the labour of all kinds of people and communities. We cannot consider it as belonging to any linguistic group and attach it to a purely linguistic province. That would undoubtedly mean its rapid deterioration from its present commanding position." (J. V. P. Report, page 12)

आणि या सर्वांवर पसंतीचा शिक्कामार्तब ठोकून रा. पु. कमिशन मोकळें झालें हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होईल.

"During the course of our enquiry, a vast majority of persons who appeared before us and did many–sided life and activity of contending language groups expressed themselves strongly in favour of placing the Bombay city under a separate administration in the event of the of the disintegration State. we also noticed serious misgivings in the minds of large sections of the inhabitants of Bombay as well as persons outside about the future of the city, if it formed part of a unilingual State." (S. R. C. Report, page 116)

## हे निःपक्षपाती कोण ?

मुंबई महाराष्ट्रांत जाऊं नये आणि महाराष्ट्राची राजधानी झाल्यास त्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त करणारे जे असंख्य लोक कमिशनला भेटले आणि गंभीर मुद्रेनें जणूं काय एखाद्या महायुद्धाची ठिणगी पडणार अशी चिंता त्यांनीं कमिशनसमोर व्यक्त केली, असे हें निःपक्षपाती लोक आहेत तरी कोण, असा या ठिकाणीं प्रश्न उपस्थित होतो. कमिशनसमोर महाराष्ट्राची जशी कैफियत मांडली गेली तशीच मुंबई स्वतंत्र राहावी ह्याबद्दलची कैफियत मुंबई नागरिक समिति हें नांव घेतलेल्या एका समितीनें सादर केली. ह्याखेरीज मुंबई प्रदेश कॉंग्रेसनें कमिशनसमोर असेंच मत व्यक्त केलें असलें पाहिजे. ह्या नागरिक समितीमध्यें कोण सद्गृहस्थ सामील झाले ह्याची यादी प्रथमच देण्यांत आली आहे. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास तिचे अध्यक्ष, सर होमी मोदी, श्री. सेटलवाड, श्री. प्राणलाल नानजी, श्री. रामदास किलाचंद, इत्यादि तिचे उपाध्यक्ष आणि लाला, मिथन लाम, के. आर. पी. श्रॉफ, ए. डी. श्रॉफ, बिर्ला, रुइया, रहिमतुल्ला, चिनॉय, पोदार, खटाव, ठाकरसी, तुळशीदास किलाचंद इत्यादि तिचे सभासद आहेत. ह्या नांवावरून कांहीं बोध होत असेल तर तो हाच कीं, ह्या शहरांतील वरिष्ठ वर्ग मुंबई स्वतंत्र राहावी ह्या मताचा आहे. ह्या श्रीमंत नागरिक समितीनें सादर

केलेली कैफियत मी लक्षपूर्वक वाचली. त्या कैफियतीमध्यें मुंबई स्वतंत्र राहावी एवढेंच सांगितलेलें नाहीं. मुंबई मूळ गुजरातची होती; तिची औद्योगिक वाढ गुजरातनें केली; आणि महाराष्ट्राची ती घटक भाग नसून ती कोंकणची आहे; कोंकण व महाराष्ट्र ह्यांचा तसा संबंध नसून महाराष्ट्राचा कोंकण भाग होत नाहीं; कोंकणाचा पूर्वापार संबंध महाराष्ट्रापेक्षां गुजरातशीं अधिक आहे; ह्याही जादा गोष्टी त्यांत सांगितल्या आहेत. ह्यावरून नागरिक समिति ह्या व्यापक नांवाखालीं एका विशिष्ट भाषिक गटाची बाजू मांडण्याचें कार्य ह्या समितीनें केलें आहे, असाच कोणाहि त्रयस्थाचा ग्रह झाल्याखेरीज राहात नाहीं. ह्या शहरांत महाराष्ट्रीय व गुजराती ह्या दोन भाषिक गटांखेरीज पंजाबी, बंगाली, उत्तरभारतीय, तामीळ, तेलगू इत्यादि अनेक भाषिक गट आहेत. आणि हे भाषिक गट असे आहेत कीं आपापल्या प्रांताविषयीं त्यांना जाज्वल्य अभिमान आहे. आपापला प्रांत भाषिक असावा असें आग्रहपूर्वक सांगणारे असे हे भाषिक गट मुंबईत आल्यानंतर लगेच बहुभाषिकवादी बनतात, ह्या किमयेवर विश्वास ठेवणें कठिण आहे. सारांश, मुंबई नागरिकांतर्फें सादर केलेली आणि कमिशननें दखल घेतलेली कैफियत ही केवळ गुजराती भाषिकांची कैफियत आहे असाच निर्णय घ्यावा लागतो. त्यांतहि ह्या नागरिकांमध्यें ह्या शहरांतील धनपतींची बहुसंख्या पाहिल्यानंतर भाषिक वादामध्यें वर्गयुद्धाचा घटकहि समाविष्ट झाला. जो प्रश्न केवळ घटनात्मक स्वरूपाचा होता त्याला अशा प्रकारें वर्गयुद्धाचें स्वरूप येऊन त्याला अधिकच धार चढली. म्हणून, मुंबई केवळ गुजरातच्या संपत्तीनें निर्माण झालेली नसून महाराष्ट्राच्या श्रमानें निर्माण झालेली आहे, असा प्रचार महाराष्ट्रातर्फें चालू झाला. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, भाषिक वादाच्या चळवळींत केवळ एकाच बाजूवर दोषाचें खापर फोडतां येणार नाहीं. मुंबई महाराष्ट्रांत जातां कामा नये, असा गुजराती-भाषिकांनीं आग्रह धरला आणि महाराष्ट्रांत त्याची प्रतिक्रिया उमटली. गुजराती-भाषिक ह्या वादांत हिरीरीनें पडले नव्हते असें मुळींच घडलेलें नाहीं.

# प्र क र ण पां च वें

# विकट झालेला मुंबईचा प्रश्न

मुंबई महाराष्ट्राला कां मिळूं नये अथवा एकभाषिक राज्याची ती राजधानी होतां कामा नये ह्या बाजूनें कोणतीं कारणें पुढें केलीं जात होतीं? मुंबईवर आतांपर्यंत जी चर्चा झाली तींमध्यें सामान्यतः पुढील कारणें आढळून येतात.

( १ ) मुंबई हें शहरच मुळांत एकभाषिक राज्यांत बसणारें नाहीं. तें केवळ बहुभाषिक नाहीं; तर विविध भाषा, विविध संस्कृति ह्यांचा समन्वय होऊन मुंबईकर हा एक नवीनच नमुना तयार झाला आहे.

" There is something distinct in the mode, manner and behaviour pattern of a Bombayite, which cannot be claimed as its own by any single linguistic groups. It is a happy mingling, a union of numerous patterns living with all their richness and variety. " ( Memorandum by the Bombay Citizens' Commitee, Page 54 ).

ह्या उताऱ्यांतील राजकीय काव्य सोडून दिलें तरी मुंबईकर हा नमुना न्यारा हा त्यांतील भावार्थ शिल्लक उरतो.

( २ ) ह्या शहराचें वैभव व सौंदर्य कोणत्याही भाषिक गटानें निर्माण केलेलें नसून ते सर्व भाषिकांच्या आणि विशेषतः तीन गटांच्या परिश्रमानें तयार झालेलें आहे आणि त्यामुळें ह्या शहरावर कोणत्याही एका भाषिक गटाला हक्क सांगतां येणार नाहीं.

( ३ ) ह्या शहरावर आपला हक्क प्रस्थापित करावयाचा असेल तर महाराष्ट्रीयांची ह्या शहरांत बहुसंख्या असावयास हवी होती. महाराष्ट्रीय लोकसंख्या ह्या शहरांत अवघी ४३.६ टक्के इतकी आहे.

( ४ ) इतिहास, भूगोल व संस्कृति या तीन्ही दृष्टींनीं विचार करतां ह्या शहराचा महाराष्ट्राशीं संबध पोहोचत नाहीं. तो गुजरातशीं अधिक जवळचा आहे.

( ५ ) जर मुंबईचा समावेश महाराष्ट्रांत झाला तर मराठी भाषा व मराठी भाषिक ह्यांना महत्त्व येणार. आणि महाराष्ट्रेतर समाज बहुसंख्य असूनही त्या समाजाला

अल्पसंख्य जमातीचा दर्जा प्राप्त होणार. अल्पसंख्यांकांना योग्य संरक्षण देण्याची भाषा आज जरी महाराष्ट्रीय वापरीत असले तरी हातांत राजकीय सत्ता असल्यानंतर त्या राजकीय सत्तेच्या बळावर औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांतून अन्य भाषिकांना हुसकावून लावण्याचे प्रयत्न होणार ह्या भीतीनें आतांपासूनच कांहीं लोकांनी आपले उधोगधंदे मुंबईबाहेर नेण्याच्या योजना आंखल्या आहेत. आणि असें घडलें तर मुंबईचें औद्योगिक, व्यापारी, संस्कृतिक महत्त्व कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं.

( ६ ) मद्रास व कलकत्ता ह्या शहरांपेक्षां मुंबईचें महत्त्व कांहीं वेगळेंच आहे. ह्या शहराला औद्योगिक व व्यापारीदृष्ट्या इतर शहरांपेक्षां फार मोठें महत्त्व आहे. भारताची ही औद्योगिक राजधानीच होय. हें शहर आशियांतील उत्कृष्ट बंदर आहे. रेल्वे, विमानवाहतुक, टेलिफोन व केबल ह्या वाहतुकीच्या साधनांचें हें शहर केंद्र आहे. अशा ह्या शहरावर कोणत्याही एका भाषिक गटाचें राजकीय वर्चस्व प्रस्थापित होणें धोक्याचें ठरेल.

## ह्या शहराचा विधाता कोण ?

या सर्व कारणांमध्यें प्रथम हें शहर कोणी निर्माण केलें, त्याचें वैभव कोणी वाढविलें, त्याचें सौंदर्य कोणी निर्माण केलें ह्याचा प्रथम विचार करूं. प्राचीन कालांत व मध्य युगांत मुंबईचा संबंध कोणत्या प्रांताशीं होता हा प्रश्न गौण ठरतो. कारण आज जी मुंबई पाहात आहोंत ती त्या काळांत नव्हती. एक क्षुल्लक खेडें म्हणूनच मुंबईला त्याकाळीं लोक ओळखीत आणि म्हणूनच विचार न करतां पोर्तुगालच्या राजानें हें बेट इंग्लंडच्या राजाला आंदण देऊन टाकलें. मग आजची मुंबई वसविली कोणी ? इंग्रजांनीं, हें त्या प्रश्नाचें उत्तर आहे. त्यांच्या व्यापाराला एक सोईस्कर बंदर व सबंध देशांशीं दळणवळण राखण्यासाठीं एक वाहतुकीचें केंद्र म्हणून त्यांनीं या शहराचें वैभव वाढविलें. त्याकाळीं गुजराती, पार्शी, खिश्चन, महाराष्ट्रीय ह्या ज्या विविध जमाती ह्या शहरांत आल्या, त्या ह्या शहराच्या निर्मात्या म्हणून आलेल्या नव्हत्या. कमिशन एजंट, घाऊक व्यापारी, दलाल, ब्रोकर, सॉलिसिटर, सरकारी हुद्देदार ह्या वेगवेगळ्या नात्यांनीं ह्या जमातींचे लोक येथें आले आणि स्थायिक झाले. ह्यांमध्यें निर्मितीचा अहंकार कोणाला बाळगतां येईल ? कोणाला नाहीं. उत्कृष्ट बंदर, औद्योगिक व व्यापारी केंद्र, वाहतुकीचें केंद्र ह्या अनेक स्वरूपांनीं ह्या शहाराची वाढ करतां येईल ही दूरदृष्टि ह्यापैकीं एकाजवळ तरी होती काय ? ती होती परकीय सत्तेजवळ. आणि तिनें स्वार्थासाठीं ह्या शहराची वाढ केली. बाकी साऱ्या जमाती प्रवाहपतित बनून येथें आल्या. त्यांत जे सुदैवी होते ते लखपति बनले. सत्तेच्या आश्रयानें त्यांपैकीं कित्येकांना मानाचीं स्थानेंही मिळवितां आलीं. पण त्यांत धन्यता मानण्यासारखें अथवा फुशारकी मारण्यासारखें असें काय आहे ? स्वतःचें

असें कांहीं कर्तृत्व दिसलें असतें तर गोष्ट वेगळी होती. राजकीय स्वातंत्र्य मिळालें आणि हें शहर विनासायास आपल्या पदरांत पडलें आहे. तसाच विचार करावयाचा झाला तर ह्या शहरांत प्रागतिक विचारांची ज्योत कोणी पाजळली असेल तर ती महाराष्ट्रीयांनींच पाजळली. ही गोष्ट, रानडे, भांडारकर, तेलंग, जांभेकर, जगन्नाथ शंकरशेट हीं नांवें लक्षांत घेतलीं तर, कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखी आहे. महाराष्ट्रानें ह्या व्यक्तींच्या कर्तबगारीवर इतरांवर रुबाब मारावा ह्या हेतूनें मी हें सांगत नाहीं. कोणाहि एका जमातीकडे किंवा सर्व जमातींकडे या शहराचें निर्मातेपद देणें प्रशस्त ठरणार नाहीं, एवढेंच प्रामुख्यानें सांगावयाचें आहे. ह्या शहराचें वैभव, महत्त्व व सौंदर्य कांहीं वस्तुनिष्ठ घटकांमुळें निर्माण झालेलें आहे. आणि श्रेयच द्यावयाचें असेल तर तें पश्चिमेला द्यावें लागेल. मग प्रश्न असा निर्माण होतो कीं, ज्या वास्तव कारणांनीं ह्या शहराला एवढें मोठें वैभव प्राप्त झालें, तीं कारणें हें शहर एका भाषिक राज्याची राजधानी झाल्याबरोबर नष्ट होणार कीं काय ? येथील रेल्वे अदृश्य होणार आहे, कां विमानतळ एकदम आकाशांत विलीन होणार आहे, कां ह्या शहरांतील डॉक्स समुद्रांत आपोआप गडप होणार आहेत ? ह्या शहरांत असा कोणता उल्कापात घडणार आहे, कीं ज्यामुळें हें शहर एकभाषिक राज्याची राजधानी करणें फार धोक्याचें ठरेल ? मुंबई शहरासंबंधीं चालू असलेल्या वादंगांत ह्या प्रश्नाचें कोणीही समाधानकारक उत्तर दिलेलें नाहीं.

" ह्या शहरावर महाराष्ट्राला कां हक्क सांगतां येणार नाहीं ह्याचें कारण ह्या शहरांत महाराष्ट्रीयांची बहुसंख्या नाहीं. कलकत्ता व मद्रास शहरांची तशी स्थिति नाहीं. त्या शहरांमध्यें बंगाली व तामीळ भाषांची पाऊणशें टक्क्यापेक्षां अधिक लोकसंख्या आहे. मुम्बईत मात्र महाराष्ट्रीय अवघे ४३.६ टक्के आहेत." हा युक्तिवाद वास्तविक जे भाषावादावर टीका करतात त्यांनीं वापरूं नये.

कारण ह्यामध्यें भाषेच्या प्राधान्यानुसार शहरांची व भागांची वांटणी व्हावी ह्या तत्त्वाला अप्रत्यक्ष कबुली मिळते. कोणतें शहर कोणत्या भाषिक राज्यांत जावें ह्याचा निर्णय घेतांना त्या शहरांतील विविध भाषिकांच्या लोकसंख्येचें प्रमाण, एवढें एकच गमक प्रमाण मानतां येत नाहीं. समजा, मुंबईऐवजीं महाराष्ट्रांत मध्यवर्ति जागेच्या पुण्यासारख्या शहरांत ह्या न त्या कारणानें मराठी भाषिक अल्पसंख्य ठरले असते. तर तें शहर देखील महाराष्ट्रापासून वेगळें काढावें अशी मागणी करतां आली असती काय ? मुळींच नाहीं. कारण, त्या शहराच्या आसपास मराठी भाषिकच असल्याकारणानें त्या शहरांत राहाणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणाला महत्त्व देतां येत नाहीं. भाषिक लोकसंख्येच्या प्रमाणाबरोबरच भौगोलिक परिस्थितीचाही अवश्य विचार करावा लागतो. आणि ह्या शहराच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास हें शहर मराठी भाषिक मुलुखानें

वेढलेलें आहे, हें भौगोलिक सत्य कोणासच नाकारतां यावयाचें नाहीं. ह्या ठिकाणीं महाराष्ट्र व कोकण असा भेद करून मुम्बई कोकणचा भाग आहे अणि कोंकण महाराष्ट्रापेक्षां वेगळा आहे, असा मुत्सद्देगिरीचा युक्तिवाद कोणी लढवितात. पण हा युक्तिवादही टिकण्यासारखा नाहीं. ठाणें, कुलाबा आणि रत्नागिरी हे जिल्हे महाराष्ट्राचे जिल्हे म्हणून सध्यां सरकारदप्तरीं नोंद आहे. मुंबई वेगळी आहे असें सिद्ध करतांना कॉंग्रेसनें मुंबईसाठीं स्वतंत्र प्रदेशकॉंग्रेस स्थापन केल्याचा दाखला देणारे लोक ह्या वेळीं, त्याचकॉंग्रेसनें हे तिन्ही जिल्हे महाराष्ट्र प्रदेशकॉंग्रेसमध्यें समाविष्ट केले, ही गोष्ट सोईस्करपणें विसरतात; आणि ज्या कोंकणच्या परिसरांत मुंबई वसते तें कोंकण महाराष्ट्रापेक्षां अजिबात वेगळें असल्याचें सिद्ध करूं इच्छितात! ह्या दुटप्पी किंवा दुहेरी युक्तिवादाचें मोठें आश्चर्य वाटतें.

लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार केला तरी, महाराष्ट्रीयांच्या प्रमाणाबद्दल चालू असलेला युक्तिवाद भ्रामक स्वरूपाचा आहे, असें थोड्या विचाराअंतीं आढळून येईल. प्रथम ह्या शहरांतील लोकसंख्येचें भाषावार प्रमाण येथें देतों:—

| भाषिक गट | लोकसंख्येचें प्रमाण<br>% |
|---|---|
| महाराष्ट्रीय | ४७.११ |
| गुजराती | १८. ४ |
| उर्दू | १०.० |
| हिंदी | ७. ५ |
| तेलगू | ४. ६ |
| सिंधी | २.३ |
| तामीळ | २.० |
| कानडी | १.९ |
| कच्छी | १.६ |
| इंग्रजी भाषिक | १.२ |
| पंजाबी | १.१ |
| मल्याळी | १.१ |

ह्या कोष्टावरून महाराष्ट्रीय पन्नास टक्क्यांपेक्षां कमी आहेत असें दिसून येतें. परंतु ह्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा विचार करतांना कांहीं महत्त्वाच्या गोष्टी नजरेआड केल्या जातात. पहिली गोष्ट ही कीं, ह्या शहरांत महाराष्ट्रीयांची लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षां कमी असली आणि ते तांत्रिकदृष्ट्या अल्पसंख्य ठरत असले, तरी महाराष्ट्रीय लोक-

संख्येचें जें प्रमाण आहे त्याच्या निमपटीच्या जवळपास येईल इतकें प्रमाण कोणत्याही एका भाषिक गटाचें नाहीं. महाराष्ट्रीय पन्नास टक्क्यापेक्षां कमी असले तरी त्यांचें प्रमाण एवढें मोठें आहे कीं तें प्रमाण बहुसंख्येकडेच झुकतें आहे. सर्वांत मोठा अल्पसंख्य गट ( Largest single minority ) ह्याला कांहींच महत्त्व नाहीं काय ? दुसरें असें कीं, महाराष्ट्रीय व बिगरमहाराष्ट्रीय ही लोकसंख्येची वर्गवारी शास्त्रीय नाहीं. ह्यामध्यें, बिगरमहाराष्ट्रीय म्हणजे महाराष्ट्रीय नाहींत ते लोक, एवढाच बोध होतो. ह्यावरून जे महाराष्ट्रीय नाहींत ते महाराष्ट्राच्या विरुद्ध आहेत असें अनुमान काढणें चूक आहे. बिगरमहाराष्ट्रीय हा कांहीं एकजिनसी समाज नाहीं. त्यामुळें त्या समाजाचें मत नेहमींच एकच असेल असें मानतां येणार नाहीं. ब्राह्मण व ब्राह्मणेतर ही जशी वर्गवारी बरोबर नाहीं, तशीच महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीयेतर ही वर्गवारीहि शास्त्रशुद्ध ठरणार नाहीं. ह्यामध्यें कोणत्या तरी एका अल्पसंख्य भाषिक गटाला बाकीच्या अल्पसंख्य गटाच्या वतीनें बोलण्याचा हक्क आहे, असें जें भासविलें जातें तें चूक आहे.

तिसरी गोष्ट ह्या शहरांत महाराष्ट्रीयांना जितकें स्वारस्य आहे तितकें इतर भाषिक गटांना नाहीं. ह्याला पार्शी समाज एवढाच अपवाद करावा लागेल. हें बंदर आहे व औद्योगिक बंदर आहे ह्या दृष्टीनें देशाच्या वेगवेगळ्या भागांतून लोक येथें येतात. त्यांचे आपापल्या भाषिक प्रांतांशीं संबंध सुटलेले असतात असें नाहीं. केवळ आर्थिक हेतु मनाशीं बाळगूनच हे वेगवेगळे भाषिक गट येथें आलेले आहेत. मुंबई हा त्यापैकीं पुष्कळांचा स्थायीभाव नाही. ह्या परिस्थितींत, ह्या शहरांचा उद्योग, व्यापार, हरहुन्नर आपल्या ताब्यांत नसतांना ; हे ताब्यांत ठेवणारे भाषिक गट आपापल्या भाषिकांना ह्या शहरांत आणीत असतांना ; महाराष्ट्रीयांच्या लोकसंख्येचें प्रमाण ४८ टक्के इतकें टिकलें हेंच विशेष होय. भारताच्या वेगवेगळ्या भागांतून ह्या शहरांत गेलीं दोनशें वर्षें लोकांची आवक होत आहे. तथापि महाराष्ट्रीयांची लोकसंख्या ४८ टक्के इतकी राहिली. ह्यावरून कोणतें अनुमान निघत असेल तर महाराष्ट्रीय लोक हाच ह्या शहराचा गाभा होय हेंच निघतें.

## संख्याबळ तोटकें पडतें

ओघानें आलेंच म्हणून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारांची काय चूक झाली हेंही सांगतों. महाराष्ट्रीयांचा ह्या शहरावर नैसर्गिक हक्क असला तरी ह्या शहरांतील उद्योग, व्यापार, शिक्षण, नगरपालिका इत्यादि महत्त्वाची केंद्रें महाराष्ट्राच्या हातीं नाहींत. "The Maharashtrians must not forget, however it may hurt their pride, that they are a nation of coolies and clerks." (Thoughts on Linguistic States, Page 24) असे डॉ. आंबेडकरांनीं महाराष्ट्रीयांबाबत सडेतोड उद्गार काढले आहेत. हे उद्गार डॉ. आंबेडकरच काढूं शकतात.

ह्या स्पष्ट व सडेतोड उद्गारांतील भावार्थ असा कीं, ह्या शहरावर महाराष्ट्रीयांचा हक्क प्रस्थापित होत असला तरी महाराष्ट्रीयांना इतर भाषिक गटांची सहानुभूति गमावून चालणार नाहीं. मुंबई जर एकभाषिक गटाची राजधानी बनली तर ह्या शहराचें महत्त्व कमी होईल, ह्या उद्गारामध्यें वास्तवता कमी असली तरी गर्भित धमकी आहे हें विसरतां येत नाहीं. महत्त्व कमी होईल ह्याचा अर्थ महत्त्व कमी केलें जाईल असा आहे. ह्या परिस्थितीमध्यें कमिशनसमोर कैफियत सादर करतांना संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारांनीं बिगरमहाराष्ट्रीय गटांपैकीं सर्व गटांचा नसला तरी कांहीं गटांचा आपल्या मागणीस पाठिंबा आहे असें दाखवावयास हवें होतें. कमिशनचा अहवाल प्रसिद्ध करण्यापूर्वी हें व्हावयास हवें होतें. आणि असा पाठिंबा मिळविणें अशक्य कोटींतील गोष्ट नव्हती. मुंबई स्वतंत्र रहावी, किमानपक्षीं ती महाराष्ट्रांत जाऊं नये हा गुजराती समाजाचा आग्रह होता. पण शेकडों मैलांवरून आलेल्या इतर भाषिक गटांचा ह्या आग्रहाला हार्दिक पाठिंबा होता असें समजण्याचें काय कारण ? ते महाराष्ट्राच्या बाजूला नव्हते, कारण महाराष्ट्रीय त्यांच्या बाजूला कधीं फिरकले नाहींत. महाराष्ट्रीय मुंबई महाराष्ट्रांत असावी असा आग्रह धरतील ह्यांत नवल नाहीं. त्यासाठीं शिवाजीपार्कवर तीन तीन लाख लोकांच्या प्रचंड सभा भरविण्याची खास गरज नाहीं. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचें तें एक गृहीतकृत्यच होतें. परंतु इतर भाषिक गट सर्वच्या सर्व महाराष्ट्राच्या मागणीला विरोधी आहेत हें जें स्वतंत्र मुंबईवाद्यांनीं गृहीत धरलें होतें, तें गृहीतकृत्य खोटें पाडण्याची जबाबदारी महाराष्ट्रीयांवर होती. कारण ह्या शहराचें आर्थिक व सांस्कृतिक जीवन आज तरी महाराष्ट्रीयांच्या हातीं नाहीं. केवळ राजकीय दांडगाई करून मुंबई शहरासारख्या अखिल भारतीय महत्त्वाच्या शहरासंबंधींचा वाद निकालांत निघणार नाहीं. बंदर, औद्योगिक केंद्र, संपत्तीचें केंद्र, वाहतुकीचें केंद्र ह्या दृष्टीनेंच केवळ ह्या शहराला महत्त्व नाहीं. ह्या शहराला आंतरराष्ट्रीय महत्त्व आहे. हें शहर मिळविण्यासाठीं संख्याबळ तोटकें पडतें. राजकीय मुत्सद्देगिरीही त्यासाठीं अवश्य हवी.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंधळ्या पुरस्कर्त्यांना माझें हें मत रुचणार नाहीं; पण त्यामुळें सत्य लपलें जाणार नाहीं. ह्या शहराचें महत्त्व कमी होईल ह्या वाक्यांत अपमानाचा जो गर्भित अर्थ आहे तो महाराष्ट्रीय मनाला चीड आणणारा आहे हें मी समजूं शकतों. कोणत्याही एका समाजाचा, अमुक एका शहराचा कारभार पाहाण्यास तुम्ही नालायक आहांत, असा अधिक्षेप करणें बरोबर नाहीं. त्याचे परिणाम फार भयंकर होतात आणि तसेच ते झालेही. जखमा अद्यापि बुजावयाच्या आहेत. तथापि ह्या शहरांत इतर भाषिक गटांशीं सहकार्य करूनच ह्या शहरांत राहावयाचें आहे, हें सत्य ओळखूनच महाराष्ट्रीयांना वागावें लागेल. ह्या महत्त्वाच्या विविध जीवनक्षेत्रांमध्यें महाराष्ट्रीयांचा प्रभाव फार कमी झालेला आहे हें सत्य महाराष्ट्रीयांना ओळखावें लागेल. अल्पसंख्य गटाप्रमाणेंच महाराष्ट्रीय ह्या शहरांत वागतात आणि त्यांचा राजकीय संसारही त्याच स्वरूपाचा.

## केवळ यांत्रिक गति

हें शहर मुळांतच बहुभाषिक आहे, अनेक संस्कृतींचा येथें संगम झालेला आहे आणि त्यामुळें मुंबईकर हा मानवतेचा कांहीं औरच नमुना आहे, हें जें कांहीं राजकीय गूढ काव्य आपण ऐकतों त्यांत मला तरी फारसें तथ्य वाटत नाहीं. व्यापारउदीम करणारीं जीं शहरें असतात तीं शहरें विश्वकुटुंबवादी संस्कृतीचीं माहेरघरें असतात असें तत्त्व ग्रीक संस्कृतीवरून आपण उचललें आहे. पण ज्यावेळीं लोकराज्यांचा विस्तारच शहराएवढा होता त्यावेळचें अथेन्स शहर आणि एक मोठ्या घटकराज्याचा एक लहान भाग म्हणून ओळखलें जाणारें मुंबई शहर ह्यांत फार अंतर आहे. दिगंतर आहे तसेंच कालाचेंही अंतर आहे. अथेन्स व्यापाराबद्दल प्रसिद्ध होतें, तसेंच तत्त्वजिज्ञासा व तत्त्वचिकित्सा ह्याबद्दल प्रसिद्ध होतें. मुंबई शहर शेअरबाजाराबद्दल प्रसिद्ध आहे. व्यापाराबद्दल प्रसिद्ध आहे. पण ह्या शहरांत कशाचा अभाव असेल तर तो नेमका संस्कृतिसंगमाचा. येथें बाजारभाव आहेत, पण तत्त्वचर्चेला भाव नाहीं. येथें देशोदेशींचे पाहुणे येतात, मेजवान्या झडतात आणि झोडल्या जातात, खूप परस्परप्रशंसा होते, पण अगदीं अल्पसंख्य उच्चभ्रू लोकांपलीकडे ह्या विचारविनिमयाचा परिघ पोहोचूं शकत नाहीं. येथें पाहुण्यांच्या सन्मानार्थ उद्यानभोजनें होतात आणि त्यासाठीं निवडक समाज जमतो. पण सॉक्रेटिसाच्या तत्त्वचर्चेंत दिसून येणारें खुलें वातावरण येथें आढळून येत नाहीं. ह्या शहराचे कप्पे पडले आहेत. बंद गाळ्यामध्यें राहणारा असा ह्या शहरांतील समाज आहे. ह्या बहुढंगी समाजाचें एकत्र येण्याचें ठिकाण म्हणजे लोकल गाड्या, बस, आणि ट्राम. जेव्हां केव्हां राष्ट्रीय आंदोलनासारखीं झंझावाती आंदोलनें निर्माण होतील तेव्हांच लक्षावधि लोक एकत्र जमण्याचें दृश्य दृष्टीस पडेल. भावनेच्या हेलकाव्यानें हलणारा समाज हा कांहीं संस्कृतिसंगम साधणारा समाज नव्हे. वेगानें धावणारा, घाईनें पळणारा आणि विचार करावयास उसंत नसलेला असा हा समाज आहे. ह्या समाजांत यांत्रिक गति आहे, पण वैचारिक प्रगति नाहीं. ह्या शहरांतील नागरिकाचा पोषाख अद्ययावत् असेल, पाश्चात्य रीतिभाती तो मोठ्या तत्परतेनें पाळीत असेल, त्यानें शिष्टसंमत आदरसत्काराचे नियम अवगत केले असतील, पण संस्कृतिसंगम साधण्यासाठीं लागणारी निवांत वेळ त्याजपाशीं नाहीं किंवा तितकी कुवतही राहिलेली नाहीं. म्हणून मुंबईत आल्यावर माणसाचा कायाकल्प होतो व त्यांतून एक नवा मानव निर्माण होतो ह्या दंतकथेवर विश्वास बसणें कठीण आहे.

## एक विचारार्ह आक्षेप

एकभाषिक राज्यांत मुंबईचा समावेश झाला तर ह्या शहरांतील अल्पसंख्य समाजाची कुचंबणा होईल, असा आणखी एक आक्षेप स्वतंत्र मुंबईवादी लोकांनीं घेतलेला आहे. मुंबई संयुक्त महाराष्ट्राची राजधानी झाली तर ह्या शहराची सरकारी भाषा

मराठी होणार. शिक्षण, विद्यापीठ, न्यायालय इत्यादि विविध क्षेत्रामध्यें मराठीचा वरचष्मा होणार. आणि उद्योग, व्यापार, शेअरबाजार, कॉटन एक्स्चेंज् बँका इत्यादि वेगवेगळ्या क्षेत्रांमध्यें अन्यभाषिकांना हुसकावून लावण्याची खटपट होणार अशा स्वरूपाचा हा आक्षेप आहे. ह्यामध्यें भाषिक तत्त्वावर आक्षेप आहे आणि भयगंडही आहे. पण दोन्ही परस्परावलंबी आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनींदेखील ह्या आक्षेपाची गंभीरपणें दखल घ्यावयास हवी होती. ज्या अन्यभाषिकांना महाराष्ट्रीयांच्या वर्चस्वाची भीति वाटत होती त्यांनींदेखील राज्यघटनेनें इतकें संरक्षण दिलें असतां भय बाळगण्याचें काय कारण, असा विचार करावयास हवा होता. सध्यांदेखील जकात, प्राप्तिकर, पोर्ट ट्रस्ट इत्यादि ह्या शहरांतील पुष्कळ बाबी मध्यवर्ति सरकारच्या ताब्यांत आहेत. आणि मुंबईसारखें शहर एका घटकराज्याची राजधानी बनलें तरी ह्या शहराचें महत्त्व ज्यायोगें कमी होईल किंवा ह्या शहरांतील अल्पसंख्य भाषिकगटांच्या हितसंबंधाला ज्यायोगें बाध येईल अशी एखादी गोष्ट घटकराज्य करूं लागल्यास, मध्यवर्ति सरकारला त्याबाबत दक्षता बाळगावी लागली असती.

## भावार्थाला प्राधान्य

तथापि भीतीला अजिबात जागाच नाहीं असें कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं. संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते जी भूमिका स्वीकारतात त्यावर इतरांची प्रतिक्रिया बऱ्याच प्रमाणांत अवलंबून आहे. एकभाषिक राज्याच्या पुरस्कारामध्यें कोणता धोका आहे हें डॉ. आंबेडकरांसारख्या कट्टर पुरस्कर्त्यांनींही मान्य केलें होतें. एकभाषिकत्व व एक-राष्ट्रीयत्व ह्यामध्यें अंतर फार कमी असतें. आणि एकभाषिक राज्याच्या तत्त्वाला एक-राष्ट्राच्या मागणीचें स्वरूप आल्यास त्यामध्यें राष्ट्रवादाची आक्रमक वृत्ति प्रकट झाल्या-शिवायरा हणार नाहीं. घटनेनें संरक्षण दिलें असलें तरी घटकराज्यांना स्वायत्तताही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर दिली गेली आहे, ही गोष्ट घटकराज्यांच्या कक्षेंत येणाऱ्या विषयांची यादी पाहिल्यास लक्षांत येण्यासारखी आहे. अल्पसंख्यांना घटनेनें संरक्षण दिलें असलें तरी घटना माणसेंच राबवीत असतात. राज्य करणारांच्या मनांत आलें तर कोणताही कायदा दप्तरांत धूळ खात पडूं शकतो ह्याचीं कितीतरी उदाहरणें देतां येतील. तेव्हां एकभाषिक राज्यांत जो भाषिक गट अधिकारारूढ असेल तो इतरांचें सहकार्य किती प्रमाणांत संपादन करूं शकतो, ह्यालाच खरें महत्त्व आहे. कायद्याच्या वाच्यार्थापेक्षां भावार्थालाच केव्हांही झालें तरी प्राधान्य असतें.

## बाजू कमकुवत केली

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा भर सहकार्यावर होता काय? माझ्या दृष्टीनें ही मागणी न्यायाच्या तत्त्वांवर आधारलेली होती. जें आमचें आहे तें आम्हांस न्यायानें

मिळालें पाहिजे असें त्या मागणीचें स्वरूप होतें. परंतु मुंबई शहराबाबत केवळ न्याय-अन्याय एवढीच भूमिका स्वीकारून भागेल असें मला वाटत नाहीं. न्यायानें मुंबई शहर महाराष्ट्राला मिळालें पाहिजे असें म्हणणारांनीं ह्या शहरांत राहाणाऱ्या इतर गटांनाही न्यायानें वागविलें जाईल इतका विश्वास बाकीच्या अल्पसंख्य भाषिकांच्या मनांत निर्माण करावयास हवा होता. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत वर्गयुद्धाचें तत्त्व शिरलें. मुंबईचा लढा हा भांडवलशाहीविरुद्ध श्रमजीवि जनता असा लढा आहे असें सांगण्यांत आलें. श्री. काकासाहेब गाडगीळ मंत्रिपदावर असतांना त्यांच्या एका भाषणाचा वृत्तांत हिंदुस्थान टाइम्स ह्या पत्रांत प्रसिद्ध झालेला होता. त्यांतील महत्त्वाचा भाग येथें उद्धृत करतों:—

"If Bombay is made the capital of Maharashtra, we shall see that the rich as a class are wiped out. To back them up is to be disloyal to what is being said in the preamble of the constitution."

भांडवलशाही वि. समाजवाद हा वाद एका भाषिक राज्यापुरता मर्यादित नाहीं. आणि संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य स्थापन झालें असतें तरी त्या महाराष्ट्रांत भांडवलदार वर्ग औषधाला शिल्लक राहिला नसता अशीहि गोष्ट नव्हती. देशांत समाजवाद प्रस्थापित करण्याचें धोरण हें अखिल भारतीय धोरण आहे. भाषिक राज्यनिर्मितीशीं त्याचा संबंध नाहीं. एकभाषिक राज्यें प्रस्थापित झालीं म्हणजे भांडवलशाही आपोआप नष्ट होते असें कोणीही सिद्ध करूं शकणार नाहीं. असें असतांना वर्गयुद्धाच्या तत्त्वाची भाषिक राज्याच्या मागणीशीं सांगड घालून संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनीं आपली बाजू कमकुवत करून घेतली आहे.

## अनिष्ट कलाटणी

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या संदर्भांत ह्या वर्गयुद्धाच्या तत्त्वाचा अर्थ काय होतो, ह्याचा आपण कधीं विचार केला आहे काय? मुंबई गुजरातच्या संपत्तीनें जशी निर्माण झाली तशीच ती महाराष्ट्राच्या श्रमानें झाली ही भाषा ह्या चळवळींत आपण वारंवार ऐकली आहे. मुंबई महाराष्ट्राला मिळूं न देण्याचा डाव धनिक गुजरातनें टाकलेला आहे असा ह्याचा अर्थ होतो. अशाप्रकारें भाषिक राज्याच्या प्रश्नामध्यें वर्गयुद्धाचें तत्त्व मिसळतांना लोकांच्या मनांत द्वेषभावना निर्माण होण्यास मदत होते हें आपण ओळखलें पाहिजे. वर्गयुद्धाचा पाया द्वेषभावनेखेरीज दुसरा नाहीं. भाषिक राज्याची मागणी म्हणजे इतर भाषिकांचा द्वेष नव्हे. आपणांस न्याय मिळत नाहीं ह्याबद्दल असमाधान निर्माण व्हावें हें अगदीं स्वाभाविक आहे. पण ह्या अन्यायाबद्दल अमुक एक वर्ग जबाबदार आहे असें एकदा मानलें कीं भाषिक राज्याच्या संदर्भांत तो वर्ग म्हणजे तो भाषिक गट असा त्याचा अर्थ होतो. सर्वसामान्य गुजराती

जनता अशा रीतीनें द्वेषाचा विषय बनणें ह्यादेखील एक अन्यायच आहे. वर्गयुद्धाच्या तत्त्वानें अशाप्रकारें आंधळ्या द्वेषाची भावना निर्माण केल्यानंतर अन्य भाषिक गटांत भीतीची भावना निर्माण होणें स्वाभाविक असतें. माझ्या मतानें मुंबईच्या वादाला ही अनिष्ठ कलाटणी मिळालेली आहे आणि ती थांबविली जाणें इष्ट आहे.

## सत्तावादाचा प्रभाव

मुंबईच्या प्रश्नावर महाराष्ट्रावर जो अन्याय झालेला आहे तो सत्तावादी राजकारणामुळें झालेला आहे. त्याला गेल्या पंचवीस तीस वर्षांचा राजकीय इतिहास जबाबदार आहे. मुंबईसारखें महत्त्वाचें शहर महाराष्ट्राशीं संलग्न होण्यानें अखिल भारतीय राजकारणांत महाराष्ट्राचें वजन वाढण्याचा संभव आहे. लोकमान्यांच्या ह्यातीपर्यंत या शहराचा महाराष्ट्राशीं तसा जिव्हाळ्याचा संबंध होता. हा संबंध राजकीय, बौद्धिक व सांस्कृतिक अशा विविध स्वरूपांनीं आलेला होता. ह्या शहराचा तोपर्यंतचा इतिहास तपासला तर आपणांस ह्या विधानाची सत्यता पटेल. १९२० नंतर देशांत गांधीयुग सुरू झालें, महाराष्ट्रांतील बुद्धिमान् वर्ग राजकारणापासून दूर राहिला आणि या शहराची महाराष्ट्रापासून फारकत झाली. ह्या शहराची एक वेगळी प्रदेश कॅांग्रेस स्थापन झाली म्हणून मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी पडली असें नाहीं. गांधीयुगांत गुजरातला महत्त्व आलें. आणि गुजराती नेत्यांनीं मुंबई आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा जसा प्रयत्न केला तसाच महाराष्ट्रीय नेत्यांनीं ह्या शहरापासून दूर राहाण्याचा अदूरदर्शीपणा दाखविला. महाराष्ट्रांतील सर्व पक्षाच्या नेत्यांनीं हें शहर महाराष्ट्राचा एक अविभाज्य घटक आहे असें आपल्या धोरणानें व कृतीनें कधींही सिद्ध केलें नाहीं. तीस वर्षेंपर्यंत महाराष्ट्र या शहराबावत उदासीन राहिला. दरम्यान अनेक घटना घडल्या आणि सर्व प्रकारच्या राजकीय आंदोलनांत ह्या शहराचा महाराष्ट्राशीं कधींही जिव्हाळ्याचा संबंध आला नाहीं. आतां खडबडून जागे होऊन काय उपयोग ? सत्तावादी राजकारणानें ह्या शहराला वेगळें ठेविलें आहे. सामान्य गुजराती जनतेला ह्या सत्तावादी राजकारणांत गोविणें चूक होय. त्यामुळें महाराष्ट्र व गुजरात ह्या दोन समाजांत अकारण तेढ मात्र वाढण्याचा संभव आहे. आणि अशी तेढ वाढली तर महाराष्ट्राला मुंबई न मिळूं देण्याची राजकीयदृष्ट्या जागृत राजकारण्यांची जी धडपड चालू आहे तिला व्यापक स्वरूप प्राप्त होऊन, हा प्रश्न अधिकच अवघड होऊन बसेल. आज मुंबईचा प्रश्न असा अवघड झालेला आहे.

## मुत्सद्देगिरीचा अभाव

मुंबई महाराष्ट्रांत समाविष्ट झाली असती तर ह्या शहराचें मोठें नुकसान झालें असतें, असें मला प्रामाणिकपणानें वाटत नाहीं. ह्या शहरांतील धनिकवर्गानें व गुजराती समाजांतील राजकीय धुरीणांनीं ह्या शहराविषयीं हेका धरला म्हणून धनिक गुजराती व श्रमिक महाराष्ट्र असें ह्या वादाला अनिष्ट वळण लागलें. त्याची तार्किक

परिणति गुजराती समाज व महाराष्ट्रीय समाज यामध्यें तेढ निर्माण होण्यांत झाली. वास्तविक असें व्हावयास नको होतें. त्यामुळें जखम लवकर भरून येणार नाहीं. उद्यां संयुक्त महाराष्ट्र निर्माण झालाच तर आतां मात्र ह्या शहरांतील भांडवल दुसरीकडे जाण्याचा संभव आहे. वास्तविक खुद्द महाराष्ट्रांतील व्यापार व उद्योग कितीतरी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रीयेतरांच्या हातीं आहे. कलकत्ता, दिल्ली, मद्रास ह्या शहराचें आर्थिक जीवन त्या त्या भाषिक गटांपेक्षां वेगळ्या लोकांच्या हातीं आहे. तरीदेखील त्या त्या शहरांत अशी भाषिक तेढ आढळून येत नाहीं. ह्या शहरांतच ती तेढ निर्माण व्हावी ह्याला ह्या धनिकवर्गाचें अदूरदर्शित्व हें जितकें कारण आहे, तितकेंच महाराष्ट्राजवळ आढळून आलेला मुत्सद्देगिरीचा अभाव हेंदेखील एक कारण आहे. चळवळ, आंदोलन, सत्याग्रह, मोर्चा हे भाषिक प्रश्नानें निर्माण झालेली तेढ नाहींशी करण्याचे मार्ग नव्हत. महाराष्ट्राला चतुर मुत्सद्यांची व कुशल राजकारणी पुरुषांची गरज आहे. भावना एकसारखी तापत ठेवणारांची नाहीं. हें शहर आपणांस दांडगाईनें जिंकावयाचें नाहीं, तें सौहार्दानें वश करावयाचें आहे. तरच तें जसेंच्या तसें पदरांत पाडण्याची आशा आपणांस बाळगतां येईल.

## मुंबईचें महत्त्व

ह्या शहराच्या सान्निध्यानें महाराष्ट्राचें बौद्धिक जीवन पुनश्च प्रज्वलित होईल असें मला वाटतें. मुंबई हें पश्चिमेचें प्रवेशद्वार आहे. केवळ आयात मालाचें नव्हे, तर नवविचारांचेंही. लोकहितवादी, न्या. रानडे, गोखले, आगरकर, भांडारकर, तेलंग, लो. टिळक ही जी महाराष्ट्रांत एक कर्तबगार व्यक्तींची मालिका होऊन गेली तिला इतर जीं कांहीं अनेक कारणें असतील, त्यांमध्यें महाराष्ट्राचा ह्या शहराशीं आलेला जिव्हाळ्याचा संबंध हेंही एक कारण आहे. १९२० सालापासून महाराष्ट्राचा ह्या शहराशीं असलेला संबंध तुटला आणि महाराष्ट्रांत काँग्रेस जरी प्रबल झाली असली तरी महाराष्ट्राला जातीयवादानें ग्रहण लावलें ही गोष्ट कोणासच नाकारतां यावयाची नाहीं. १९२० पासून दहा वर्षें हा जातीयवाद उघड उघड सत्तावादी होता; तो काँग्रेसमध्यें शिरून राष्ट्रवादाला त्यानें पोखरावयास सुरुवात केली. त्यामुळें महाराष्ट्राचें ह्या शहरावर स्वामित्व म्हणजे जातीयवादाचें स्वामित्व असें समीकरण होऊन बसलें. १९४८ सालच्या दंगलींत मुंबई हें महाराष्ट्रांतील अल्पसंख्यांचें आश्रयस्थान होय असा अल्पसंख्य जमातींचा ग्रह झाला. आणि मग मुंबई दुरावली म्हणून महाराष्ट्रांत जातीयवादाचा जोर झाला. आणि तसा जोर झाला म्हणून मुंबई महाराष्ट्रापासून अधिकच दूर होत गेली ह्या दुष्टचक्राला प्रारंभ झाला. ह्या दुष्टचक्राचा व्यूह भेदावयाचा असेल तर ह्या शहराचा महाराष्ट्राशीं परत जिव्हाळ्याचा संबंध प्रस्थापित होणें जरूर आहे. ह्या शहराच्या सान्निध्यानें महाराष्ट्रांतील जातीयवादाची धार कमी होत जाईल. जबाबदारीच्या जाणिवेनें माणसाला शहाणपणा येत असतो. आपल्या उणीवांची जाणीव होऊन, जुने हेवेदावे विसरावे लागतात आणि ह्या

शहराचें विशाल स्वरूप पाहिल्यावर दृष्टीही विशाल होण्यास मदत होते. परंतु सत्तावादी राजकारणाच्या दृष्टीनें मुंबई महाराष्ट्राशीं एकजीव होण्यापूर्वी महाराष्ट्रीय ह्या शहराशीं प्रथम एकजीव झाले पाहिजेत. आज चित्र कसें दिसतें तें पाहा. पुणें हें महाराष्ट्राचें केंद्र. महाराष्ट्राचें सांस्कृतिक जीवन तेथें सांखळलेलें आहे. आणि मूळ महाराष्ट्राशीं संबंध तुटलेले ह्या शहरांतील महाराष्ट्रीय ह्या शहरांत विदेशी बनलेले आहेत. तेव्हां ह्या शहरांतून महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनाचा उगम झाला पाहिजे आणि ह्या शहरांत तें विलीन झालें पाहिजे. महाराष्ट्रांतून ह्या शहरांत मजूर येतात हा कांहीं महाराष्ट्राचा मानबिंदु नाहीं. तत्वज्ञानी, लेखक, कवि, शास्त्रज्ञ, राजकारणधुरंधर अशा कर्तबगार व्यक्तींचा पुरवठा ह्या शहरांत महाराष्ट्राला होतो हा महाराष्ट्राचा खरा गौरव होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २०५

# महाराष्ट्र-निष्ठा म्हणजे काय ?

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर रा. पु. कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाल्यापासून निवडणुकी होईपर्यंत जें आंदोलन झालें आणि ह्या निवडणुकींत महाराष्ट्रामध्यें जें लोकमत प्रकट झालें त्या सर्वांच्या बुडाशीं संयुक्त महाराष्ट्राची मागणी होती. त्या मागणीचें स्वरूप काय होतें, लोकांच्या भावना इतक्या तीव्र कां बनल्या, अन्याय व अपमान ह्या भावनांचें स्वरूप काय इत्यादि गोष्टीचें मी येथवर विवेचन केलें.

आतां गेल्या वर्ष सव्वा वर्षांत संयुक्त महाराष्ट्र परिषद् व संयुक्त महाराष्ट्र समिति ह्यांनीं जें राजकारण केलें त्या राजकारणाचा विचार करावयाचा आहे. ह्या प्रश्नावर सध्यां महाराष्ट्रीय लोकांच्या भावना किती तीव्र व नाजूक आहेत ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु लोकभावनांना कसें वळण लावलें जात आहे आणि भारतीय लोकशाहीच्या स्थैर्याच्या आणि विकासाच्या दृष्टीनें हें वळण इष्ट आहे कीं नाहीं, ह्या चळवळीचें नेतृत्व कोणत्या स्वरूपाचें आहे, ह्या सर्वांचा निःपक्षपाती विचार झाला पाहिजे, असें मला वाटतें. हा विचार लोकांना एकदम रुचेल असें नाहीं. पण जे विचार लोकांना आवडत नाहींत ते बोलून दाखवावयाचे नाहींत असा सार्वजनिक जीवनांत संकेत पडला, तर लोकशाहीला तो सर्वांत मोठा धोका होय.

## माझी भूमिका

चालू राजकारणाचा विचार करण्यापूर्वी मी माझी स्वतःची भूमिका स्पष्ट करूं इच्छितों. आतांपर्यंतचें विवेचन त्रयस्थाच्या भूमिकेवरून झालें. वास्तविक त्रयस्थाच्या भूमिकेवरून ह्या प्रश्नाची मीमांसा करीत असतांना माझा कलही ह्या विवेचनांत स्पष्ट झालेला आहे. त्रयस्थ म्हणजे रिकाम्या मनाचा गृहस्थ नव्हे. विशेषतः ज्या प्रश्नावर इतक्या तीव्र प्रमाणांत संघर्ष निर्माण होतात त्या प्रश्नाचा विचार करतांना कोणालाही आपलें मन रिकामें, विचारशून्य करतां येणार नाहीं. त्रयस्थ ह्याचा अर्थ इतकाच कीं त्याला दोन्ही बाजूंचा विचार करतां येतो. पक्षाभिनिविष्ट व्यक्तीला हें शक्य होत नाहीं. त्रयस्थाची भूमिका म्हणजे ही भूमिका मी स्वीकारलेली आहे.

मी स्वतः संयुक्त महाराष्ट्रवादी आहे; पण समितीवादी नाहीं. ही माझी भूमिका समितीचा जन्म होण्यापूर्वीपासूनची आहे. फाजलअली कमिशन नेमल्यानंतर जी संयुक्त

महाराष्ट्र परिषद सर्वश्री शंकरराव देव ह्यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झाली तेव्हांपासूनची आहे. १९५४ च्या 'लोकसत्ते' च्या दिवाळी अंकांत याच प्रश्नावर मी एक विस्तृत लेख लिहिला होता. त्या लेखांत मी असें स्पष्ट लिहिलें होतें कीं जुन्या मुंबई राज्यामध्यें जे तीन भाषिक गट एकत्र आले आहेत त्यांमधील परस्परांविषयींचा अविश्वास व संशय लक्षांत घेतल्यास त्या त्या गटांचें वेगळें घटकराज्य होणें इष्ट व अपरिहार्य आहे. हीं वेगळीं घटकराज्यें करतांना मुंबई महाराष्ट्रांत समाविष्ट करणें न्यायाला धरून होईल असेंहि माझें मत मी मांडलें होतें. आणि ही मुंबई स्वतंत्र ठेवण्याचा आग्रह प्रामुख्यानें ह्या शहरांतील धनिकांचा आहे ही गोष्ट लक्षांत घेतल्यास, मुंबई स्वतंत्र ठेवण्याच्या आग्रहामुळें या भागांत वर्गयुद्धाचें रान पेटल्याशिवाय राहाणार नाहीं, असाही इषारा मी त्या लेखांत दिलेला होता. पण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी प्रामुख्यानें घटनात्मक स्वरूपाची असल्यानें आणि कॉंग्रेसपक्षावर ही मागणी मिळवून घेण्याचें उत्तरदायित्व येत असल्याकारणानें, महाराष्ट्र कॉंग्रेसनें संयुक्त महाराष्ट्र परिषद ह्या नांवाखालीं जो सर्व पक्षिय मेळावा तयार केला तसा करण्याची गरज नव्हती असेंही मी त्यावेळीं स्पष्ट मांडलें होतें. ह्याचे दोन परिणाम होतील. महाराष्ट्रांतील कॉंग्रेस कमकुवत होईल हा एक परिणाम अणि ह्या संयुक्तआघाडीचा फायदा घेऊन कम्युनिष्ट आपलें घोडें पुढें दामटतील हा दुसरा परिणाम. आज हे दोन्ही परिणाम आपण पाहात आहोंत. जेव्हां संयुक्त महाराष्ट्राचें आंदोलन नव्हतें तेव्हां ही माझी भूमिका होती आणि आजही तीच कायम आहे. ती भूमिका हीच कीं मी संयुक्त महाराष्ट्रवादी आहें, पण समितीवादी नाहीं.

## निष्ठा नव्हे सोय

आज हें महाद्विभाषिक राज्य अवतरलें आहे. हें महाद्विभाषिक म्हणजे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र + महागुजरात असा द्वंद्व समास आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसनें प्रथम ह्या महाद्विभाषिकाची मागणी केली होती. त्या मागणीला संयुक्त महाराष्ट्र परिषदेंत सामील झालेल्या सर्व पक्षांनीं त्यावेळीं पाठिंबा दिला होता. पण निष्ठा म्हणून महाद्विभाषिक कोणीच मान्य केलें नव्हतें. एकमेकांवर डाव उलटविण्याचा तो एक राजकीय प्रयोग चालू होता. तत्त्वानें राजकारण करण्यापेक्षां डावखोरीचें राजकारण चालू झाल्यानंतर महाद्विभाषिकावर दोघांचाही विश्वास राहिला नाहीं. अशा अविश्वासाच्या वातावरणांत हें महाद्विभाषिक फिरून आलें आहे. हें महाद्विभाषिक यशस्वी करून लोकांचीं मनें वळवूं असें ना. यशवंतराव चव्हाण म्हणतात. मी त्यांना त्यांच्या कार्यांत सुयश चिंतितों. पण त्याबरोबर ह्या महाद्विभाषिकासंबंधीं माझ्या प्रामाणिक शंका आहेत हेंही मी स्पष्ट सांगूं इच्छितों. महाराष्ट्रांतील कॉंग्रेसजनांपैकीं बहुसंख्य कॉंग्रेसजनांनीं हें महाद्विभाषिक निशंःक मनानें स्वीकारलें आहे असें मला वाटत नाहीं. आपलें मन

उघड करून दाखविण्याइतकें धैर्य त्यांच्याजवळ नाहीं. त्यामुळें लोकांचा विश्वास त्यांच्यावर राहिला नाहीं. आतां तरी ही चूक ते सुधारतील अशी मी आशा करतों.

खरें सांगावचें तर महाद्विभाषिक ही कांहीं राजकीय निष्ठा होऊं शकत नाहीं. ज्या मुंबईच्या प्रश्नावर एवढें रण माजलें तो प्रश्न सोडविण्याची एक सोय म्हणून हें महाद्विभाषिक आलेलें आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य झालें तर महाराष्ट्राला जें कांहीं मिळेल असें वाटत होतें तें ह्या द्विभाषिकांतही मिळण्याची शक्यता आहे आणि महागुजरातवाद्यांना मुंबईचा फायदाही मिळणार आहे. सबब दोन्ही गटाच्या मागण्या तत्त्वतः नसल्या तरी वस्तुतः पूर्ण करण्याची सोय ह्या महाद्विभाषिकांत होऊं शकते. ह्या सोयीगैरसोयीच्या विचारानें महाद्विभाषिकाचा फॉर्म्युला श्रेष्ठींनीं पसंत केला असावा. निष्ठेचा प्रश्न निर्माण झाला कीं संयुक्त महाराष्ट्र व महागुजरात ह्या निष्ठा प्रबल ठरतात आणि बाकी सर्व घटकराज्यें भाषिक स्वरूपाचीं असतांना एवढें एकच कां द्विभाषिक करतां हा प्रश्न बिनतोड ठरतो, ह्याची जाणीव आपल्या नेत्यांनाही असावी अशी मी कल्पना करतों. तेव्हां हें महाद्विभाषिक स्वीकारा असें सांगतांना जे कोणी भाषिक निष्ठेपेक्षां द्विभाषिक निष्ठा श्रेष्ठ होय, असें निष्ठेचें तुणतुणें वाजवूं लागतील ते ह्या महाद्विभाषिकाची बाजू कमकुवत करण्याचें अपश्रेय मात्र पदरांत पाडून घेतील. कारण द्विभाषिक निष्ठेचें गुणगान म्हणजे भाषिक निष्ठेची अप्रत्यक्ष निंदा हें समीकरण ठरलेलें आहे. आणि मग स्वतः तीच भाषिक निष्ठा इतरत्र अनुसरतां आणि आमची मात्र त्याच निष्ठेबद्दल निंदा कां करतां, ह्या प्रश्नाला उत्तर मिळूं शकत नाहीं.

## सतीचें वाण

पण सोयीगैरसोयीच्या मुद्यावर ह्या द्विभाषिकाचा विचार करूं लागल्यास अडचणीही तितक्याच तीव्रतेनें जाणवूं लागतात. ६५ टक्के महाराष्ट्रीय, ३५ टक्के गुजराती असा ह्या महाद्विभाषिकाचा हिशोब आहे. दोघांत भेद आहे, एकमेकांविषयीं संशय आहे आणि आपल्याला न्याय्य वांटा मिळाला पाहिजे अशी प्रत्येकाची मागणी आहे. पण ६५ टक्क्यांना जें न्याय्य वाटेल तेंच ३५ टक्क्यांना अन्याय वाटेल ह्याची वाट काय ? उलट ३५ टक्के हे केवळ ३५ टक्के आहेत म्हणून त्यांच्याविषयीं कणव, औदार्य व सहानुभूति दाखविण्याचा प्रयत्न केला तर ६५ टक्के अगोदरच खवळलेले आहेत त्याचें काय करावयाचें ? ६५ टक्क्यांच्या असंतोषाला मागील इतिहासाचा अजिबात आधारच नाहीं असें कांहीं कोणालाच म्हणतां यावयाचें नाहीं. मागील विषमतेची भरपाई करावी असें म्हटलें तर आम्हां अल्पसंख्यावर अन्याय होत आहे ही अल्पसंख्यांची तक्रार ठरलेलीच आहे. अल्पसंख्या हें कित्येक वेळां अल्पसंख्यांचें मोठें राजकीय भांडवल बनतें हा अनुभव नवा नाहीं. सारांश नोकरी, विकासखर्च, पाटबंधारे, रस्ते, कालवे इत्यादि अनेक शासनविषयक व लोककल्याणकारी योजनांमध्ये हा टक्क्याचा हिशे-

मांडून दोन्ही बाजूंचें समाधान करणें महादुष्कर होऊन बसणार आहे. राज्यकारभाराचा व आर्थिक विकासाचा असा हिशोब न मांडावा आणि ज्या विभागाला मदतीची गरज आहे त्याला प्रथम मदत करावी किंवा मागासलेल्या भागाकडे प्रथम लक्ष पुरवावें असें तत्त्व ठरविलें, तर तें तत्त्व सध्यांच्या वातावरणांत दोन्ही बाजूंचें समाधान करूं शकेल असें वाटत नाहीं. ह्या महाद्विभाषिकांत आलेल्या दोन भाषिकांचे हितसंबंध एकरूप झालेले नाहींत, इतकेंच नव्हे तर एकमेकांच्या मनांत एकमेकांविषयीं संशय आहे, हें सत्य आपण प्रथम मान्य केलें पाहिजे. अशा प्रकारें दोन राजकीय गट जेव्हां एकत्र येतात किंवा त्यांना एकत्र आणलें जातें आणि जेव्हां अखिल भारतीय राजकारणांत आपलें कांहीं विशिष्ट स्थान असलें पाहिजे अशी राजकीय अस्मिता दोघांमध्येंही तितक्याच तीव्रतेनें आढळून येते, तेव्हां त्या दोन्ही गटांना समाधान वाटेल आणि दोघांनाही न्याय मिळाला असें वाटेल अशा प्रकारें राज्यकारभाराचा गाडा हाकणें हें एक सतीचें वाण होय. म्हणून हें महाद्विभाषिक ज्या परिस्थितींत येथें आलें त्या परिस्थितीनें ह्या महाद्विभाषिकाविषयीं कांहीं शंका मनांत येतात.

## दोन मार्ग

त्याबरोबर हें महाद्विभाषिक घटनात्मक पद्धतीनें अस्तित्वांत आलें आहे. ह्या घटनेचीही आपण दखल घेतली पाहिजे. आपल्या राज्यघटनेनुसार ह्या देशांतील घटकराज्यें बदलण्याचा वा नवीं निर्माण करण्याचा अंतिम अधिकार लोकसभेला मिळालेला आहे. तेव्हां ज्या कोणास किंवा ज्या कोणत्या पक्षास महाद्विभाषिक बदलून घ्यावयाचें असेल त्याला लोकसभेचा कायदा बदलून घेतला पाहिजे. म्हणजे ह्या देशांतील इतर प्रांतांचा आपणांस पाठिंबा असल्याखेरीज लोकसभेचा कायदा बदलून घेतां येणार नाहीं. ज्या भाषिक गटाला आपणांवर अन्याय झाला असें वाटत असेल त्या गटानें निवडणुकींत कॉंग्रेसविरोधी मतदान केलें तर विशिष्ट विभागांत लोकमत कोणत्या बाजूला आहे ह्याचें स्पष्ट दर्शन होईल हें खरें, पण परिणामकारकता येणार नाहीं. तेव्हां लोकमताचा परिणाम व्हावा असें वाटत असेल तर ह्या विशिष्ट व चमत्कारिक परिस्थितीमधून दोन मार्ग निघतात. संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनीं लोकसभेंत आपलें बहुमत करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे किंवा लोकसभेंतील बहुसंख्य लोकांचा आपल्या मागणीस पाठिंबा मिळवून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे हा एक मार्ग. हा मार्ग वैध स्वरूपाचा आहे आणि जिकिरीचा आहे. शिवाय लोकसभेंत कॉंग्रेसचें बहुमत असल्याकारणानें व पक्ष म्हटला कीं पक्षशिस्तीला प्राधान्य येत असल्याकारणानें तो मार्ग फलदायी ठरण्यांत बऱ्याच अडचणीही आहेत. मग लोकसभेचा कायदा बदलून घेण्याचा दुसरा मार्ग म्हणजे आंदोलनाचा. आंदोलन म्हणजे बाह्य दडपण हें दडपण तार्किकदृष्ट्या बंडाचा उठाव करण्यापर्यंतही जाऊं शकतें. मध्यवर्ति सत्तेकडून न्याय मिळण्याची आशाच नाहीं अशी एकदा एखाद्या समाजांत

ग्रंथ, ठाणें.
दि.

हताशतेची भावना निर्माण झाला कीं ती भावना कोणत्या थरापर्यंत जाईल हें सांगतां येत नाहीं. ह्या भावनेचा फायदा विरुद्ध पक्ष सहज घेऊं शकतात. जो पक्ष अधिकारारूढ असतो त्याला ही परिस्थिति जितकी प्रतिकूल तितकीच विरुद्ध पक्षाला अनुकूल असते. हा विरोधी पक्ष जर लोकशाहीवर निष्ठा ठेवणारा नसला तर सत्ताधारी पक्षाला ज्याप्रमाणें ह्या परिस्थितीचे चटके बसतात. त्याचप्रमाणें लोकशाहीवर गंडांतर येण्याचा संभव असतो.

## आघाडींतील धोका

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानें आज अशी स्थिति निर्माण झालेली आहे. म्हणून मी समितिवादी नाहीं. ह्या प्रश्नावर आपलें कांहींच चालत नाहीं ह्या जाणिवेनें महाराष्ट्रीय जनता हताश झाली आहे, चिडली आणि विरुद्ध बाजूस गेली आहे. लोकांच्या असंतोषाला काँग्रेसनेंच सबळ कारण पुरविलें आहे. पण ह्या असमाधानांतून जो विरोध निर्माण होत आहे तो काँग्रेसला मारक आहे ह्यापेक्षां लोकशाहीला मारक ठरणार आहे, हा विचार अधिक महत्त्वाचा आहे. संसदीय लोकशाहींत विरोध हा हवाच. त्यामुळें ह्या निवडणुकींत काँग्रेसला 'थंपिंग मेजॉरिटी' मिळाली नाहीं ह्याबद्दल काँग्रेसजनांनीं वाईट वाटून घेण्याचें कारण नाहीं. देशांत लोकशाहीच्या स्थैर्यासाठीं विरोधी पक्ष हवा असें पं. नेहरूंपासून सारे घोषणा करीत असतात. ही घोषणा प्रामाणिक असेल तर विधानसभेंत विरोधी बळ वाढलें याबद्दल खंत वाटण्याचें कारण नाहीं. पण चिंता कशाबद्दल करावयाची असेल तर ती लोकशाहीच्या भवितव्याबद्दल. संयुक्त आघाडीच्या राजकारणांत मला तो धोका स्पष्ट दिसतो. तीन वर्षांपूर्वीं हें संयुक्त आघाडीचें राजकारण घाटत होतें त्यावेळीं "...महाराष्ट्रांतील बुद्धिमंतांचे मेंदू सध्यां मॉस्कोची वाटचाल करूं लागले आहेत हें लक्षांत घेतल्यास उद्यांच्या महाराष्ट्र राज्यामध्यें आंध्राप्रमाणेंच बेबंदशाही निर्माण होण्याचा धोका आहे हें स्पष्ट होईल" (लोकसत्ता दिवाळी अंक १९५४ पान १६२) असें मी बजावलें होतें. पांच वर्षांत महाराष्ट्राचा केरळ होण्याची भाषा आज सर्वत्र बोलली जात आहे. आंध्राच्या ठिकाणीं केरळ एवढाच फरक झालेला आहे. पण ह्या माझ्या स्पष्टोक्तीबद्दल माझ्यावर महाराष्ट्रद्रोहित्वाचा आरोप झाला आणि आजही होत आहे. ह्यासाठीं महाराष्ट्रनिष्ठा व महाराष्ट्रद्रोह ह्या कल्पनांची तपासणी करणें जरूर आहे.

## दोन प्रचलित शब्द

आजकाल 'महाराष्ट्रनिष्ठा' व 'महाराष्ट्रद्रोह' हे शब्द सर्वत्र प्रचारांत आलेले आहेत. हे शब्द उगीच प्रचारांत आलेले नाहींत. त्यामागें कांहीं भावनाप्रतीकें असावींत असा तर्क करण्यास जागा आहे. त्यामुळें हे शब्द भावनेला तावडतोब आवाहन करूं शकतात. अमुक अमुक व्यक्ति महाराष्ट्रद्रोही आहे असें सांगितल्याबरोबर त्या व्यक्तीविषयीं मनांत विशिष्ट प्रकारची प्रतिक्रिया निर्माण होते.

त्या व्यक्तीच्या इतरांशीं असलेल्या स्नेहसंबंधांवर, शेजारधर्मावर व इतर समाजिक व्यवहारावर दूरगामी परिणाम होतात. विशिष्ट प्रकारची निष्ठा मानणारे लोक त्या निष्ठेशीं द्रोह करणारांविषयीं सहानुभूति बाळगूं शकत नाहींत; इतकेंच नव्हे तर सहानुभूतीच्या अभावाचें द्वेषांत रूपांतर होत असतें. 'सूर्याजी पिसाळ' 'महाराष्ट्राचे मारेकरी' इत्यादि ऐतिहासिक दाखले दिले जातात आणि त्या व्यक्तीचें व्यक्तिमत्व समाजासमोर अशा स्वरूपांत उभें केलें जातें कीं त्यायोगें ती व्यक्ति व तो समाज यामध्यें एक प्रकारची अभेद्य भिंत निर्माण होत असते, असें म्हटल्यास त्यांत बिलकुल अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या शब्दांचा व्यक्तिमनावर व लोकमतावर इतका परिणाम होत असतो त्या शब्दांची प्रस्तुत विषयाच्या संदर्भांत थोडी छाननी होणें जरूर आहे.

## निष्ठा म्हणजे काय ?

निष्ठा ह्या शब्दाला त्या शब्दाच्या वाच्यार्थापेक्षां एक गंभीर अर्थ आहे. धर्मनिष्ठा, ध्येयनिष्ठा, ईश्वरनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा इत्यादि शब्दप्रयोगावरून ह्या विशिष्ट अर्थाची कल्पना येऊं शकेल. एखादें विशिष्ट तत्त्व, ध्येय वा व्यक्ति ह्यावर आपण जो अनन्यभाव ठेवतों तो भाव म्हणजे निष्ठा होय. अनन्यभाव म्हणजे दुसऱ्या कोणावर व कशावर तशी भक्ति न करणें. आपल्या जीवनांत त्यापेक्षां दुसऱ्या कशालाही थारा न मिळणें हें ह्या निष्ठेचें एक अंग होय. आणि ज्यावर आपण निष्ठा ठेवतो त्या तत्त्वाशीं प्रतारणा होईल असें वर्तन आपल्या हातून घडूं न देणें, हें ह्या निष्ठेचें दुसरें अंग होय. निष्ठेची पहिली कल्पना विधायक आहे. दुसरी निषेधपर आहे. आपण ज्यावर निष्ठा ठेवतो त्यापेक्षां अन्य कशावर भक्ति करूं लागलों तर पहिल्या निष्ठेची उत्कटता कमी होते. दोन ध्येयें व दोन देव एका निष्ठेच्या म्यानांत बसूं शकत नाहींत; किंवा निष्ठेची फाळणी होऊं शकत नाहीं. ह्यापेक्षांही ज्यावर आपण निष्ठा ठेवतों त्याच्याशीं प्रतारणा करणें हा गुन्हा मानला जातो. त्यालाच द्रोह मानतात. धर्मांत द्रोहाला पातक मानतात आणि सामाजिक व्यवहारांत तो गुन्हा समजला जातो. ईश्वरद्रोही हा पापी आहे आणि राष्ट्रद्रोही हा गुन्हेगार आहे. अशाप्रकारें निष्ठा शब्दामध्यें धार्मिक अभिनिवेश असल्याकारणानें 'द्रोहा' बाबत समाजांत सहिष्णुतेची भावना निर्माण होऊं शकत नाहीं. पापी किंवा गुन्हेगार हे उपेक्षणीय नसतात, तर ते दण्डाला पात्र असतात, अशी त्यांच्याबाबत समाजाची प्रतिक्रिया होत असते.

ह्यावरून हें दिसून येईल कीं, आधुनिक जीवनांत ह्या शब्दांचा वापर फार जपून केला पहिजे. या कल्पना मूलतः धार्मिक संकेतांनीं भरलेल्या आहेत. माणसाच्या मनांत त्यामुळें अभिनिवेश उत्पन्न होतो. आणि अभिनिवेश हा विवेकाची नेहमीं सोबत करीलच असें नाहीं. जगाच्या आधुनिक इतिहासांत 'राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रद्रोह' 'क्रांतिनिष्ठा व क्रांतिद्रोह' ह्या शब्दांनीं कोणता धुमाकूळ घातला ह्याचीं उदाहरणें अगदीं ताजीं आहेत. मानवी जीवन निष्ठाशून्य असावें असा ह्याचा अर्थ नव्हे. मी

अश्रद्धावादी नाहीं. पण श्रद्धा व विवेक, निष्ठा व मतभेद ह्यांच्या सीमारेषा कटाक्षानें पाळल्या गेल्या पाहिजेत. विवेकाला बाजूला सारणाऱ्या, मतभेदाला थारा न देणाऱ्या निष्ठेंतून आक्रमक वृत्ति अनेक वेळां प्रकट झालेली आहे आणि ह्या आक्रमणानें प्रत्येक वेळीं लोकशाहीचा बळी घेतलेला आहे. एकाच बाजूंत संपूर्ण सत्य असतें असें नाहीं; किंवा अमुक पंथाच्या, पक्षाच्या वा संघटनेच्या पाठीमागें लक्षावधि लोक जातात म्हणजे तेथें सत्य असतें असेंही नाहीं. महाभारतकारांनीं ह्याविषयीं "**अश्वमेधसहस्त्रं च सत्यं च तुलया धृतं। अश्वमेधसहस्त्राद्धि सत्यं तु परिशिष्यते ॥**" असा सांगितलेला दंडक त्रिकालाबाधित आहे अशी माझी धारणा आहे. म्हणून, जेव्हां आपण महाराष्ट्रनिष्ठा व महाराष्ट्रद्रोह असे शब्द वापरतों तेव्हां ते आपण कोणत्या अर्थानें वापरतों ह्याची तपासणी होणें अत्यावश्यक आहे.

## विधायक अर्थ व मर्यादा

ह्या वादंगामध्यें, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य व्हावें, असें मानणारे अनेक लोक आहेत. रा. पु. कमिशननें हें घटकराज्य निर्माण करण्याची शिफारस केली नाहीं. तेव्हां, महाराष्ट्राला कांहीं केल्या मुंबई मिळू द्यावयाची नाहीं, असा कॉंग्रेसश्रेष्ठींचा यामागें कट आहे, अशी भावना महाराष्ट्रांत सर्वत्र फैलावली गेली. ह्यामधून महराष्ट्रनिष्ठेचा उगम झालेला आहे. संयुक्त महाराष्ट्राला खच्ची करण्याचा हा एक डाव आहे, असें एकदां मानल्यानंतर महाराष्ट्रानें व महाराष्ट्रीयांनीं हा डाव हाणून पाडण्यासाठीं सज्ज झालें पाहिजे असा निष्कर्ष त्यांतून ओघानेंच निघतो. हा डाव हाणून पाडावयाचें म्हणजे काय करावयाचें? कॉंग्रेस महाराष्ट्राचें घटकराज्य होऊं देत नाहीं, सबब कॉंग्रेसला हाणून पाडावयाचें, असें ह्या प्रश्नाचें उत्तर येतें. अशा प्रकारें महाराष्ट्रनिष्ठा म्हणजे एका राजकीय पक्षाला विरोध, असें ह्या निष्ठेचें राजकीय समीकरण आज तरी झालेलें आहे. महाराष्ट्रनिष्ठा व पक्षनिष्ठा ( विरोधी पक्षनिष्ठा ) ह्यांचा अशा रीतीनें अभेद झाल्यानंतर त्यामधून सत्तावादी राजकारणाचा जन्म झाला तर नवल नाहीं. आज नेमकें तेंच घडत आहे. महाराष्ट्रनिष्ठा व विरोधी पक्षांचें राजकारण ह्यांचा आज अभेद झालेला आहे. समितीच्या बाजूनें तुमचें मत असेल तर तुमच्यापाशीं महाराष्ट्रनिष्ठा आहे, नसल्यास नाहीं, ह्या अभेदाला माझा विरोध आहे.

खरोखर महाराष्ट्रनिष्ठेचें स्वरूप काय असलें पाहिजे? माझ्या दृष्टीनें ह्याचें उत्तर देतांना कांहीं गृहीतकृत्यें स्पष्ट केलीं पाहिजेत असें मला वाटतें. भारतांतील प्रत्येक नागरिकाची पहिली निष्ठा भारतीय लोकशाहीवर असली पाहिजे याविषयीं कोणाचा मतभेद होईल असें मला वाटत नाहीं. ह्या लोकशाही निष्ठेशीं जें जें कांहीं विसंगत वा विरोधी असेल तें तें मला निष्ठा म्हणून स्वीकारतां येणार नाहीं. भारतीय लोकशाहीचा महाराष्ट्र हा एक घटकभाग आहे आणि तसाच तो असला पाहिजे. भारतीय समाजाचें विशिष्ट

स्वरूप लक्षांत घेतां, ह्या समाजांतील वेगवेगळ्या भाषिक गटांना स्वायत्तता दिली तर ते लोकशाहीनिष्ठ राहूं शकतील ह्या बुद्धीनें मी संयुक्त महाराष्ट्रवादी आहें. संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य झालें तर त्यामुळें लोकशाहीला कोणत्याही प्रकारचा धोका नाहीं, उलट सुस्थिर होण्यास मदतच होणार आहे, ह्या भावनेनें मी संयुक्त महाराष्ट्रवादी आहें. पण माझी ही निष्ठा राष्ट्रवादी निष्ठा होऊं शकत नाहीं. दुसऱ्या एका राष्ट्राचें महाराष्ट्रावर आक्रमण होत आहे आणि त्यासाठीं गमिनी काव्यानें आपण लढलें पाहिजे, आणि जे माझ्या ह्या मताशीं सहमत होऊं शकत नाहींत ते महाराष्ट्राचे मारेकरी असून ते माझे शत्रू आहेत, हा विचार माझ्या निष्ठेचा भाग होऊं शकत नाहीं. **लोकशाहीमध्यें अन्याय होऊं शकतो; पण आक्रमण असूं शकत नाहीं. महाराष्ट्राला न्याय मिळाला नाहीं हें मी मान्य करूं शकेन; पण महाराष्ट्रावर परकीयांचें आक्रमण होत आहे हें मत मी मान्य करूं शकत नाहीं. कारण महाराष्ट्रावर आक्रमण होत आहे असें मानणें म्हणजे भारतांत लोकशाही नाहीं असें मानण्यासारखेंच आहे. अन्याय दूर करून घेतां येतो; आक्रमणाचा प्रतिकार करावा लागतो. लोकशाही निष्ठेशीं सुसंगत अशा महाराष्ट्रनिष्ठेचें स्वरूप माझ्या मतानें हें असें आहे. त्या निष्ठेला विधायक अर्थ आहे, तसाच तिला लोकशाहीच्या मर्यादा आहेत.**

## असहिष्णुता

म्हणून तुम्ही एका विशिष्ट संघटनेचा अथवा व्यासपीठाचा आश्रय केलात तरच तुमची महाराष्ट्रावरील निष्ठा सिद्ध होईल, हा आग्रह किंवा हा अभिनिवेश लोकशाही निष्ठेशीं सुसंगत नाहीं. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हा मतभेद न होण्यासारखा विषय नाहीं. पण मतभेदाचें पर्यवसान शीर्षभेदांत झालें पाहिजे असली एकांतिक भूमिका ह्या निष्ठेतून निर्माण होत असली, तर ती आक्रमक राष्ट्रवादी निष्ठा आहे असें मानावें लागेल. असल्या महाराष्ट्रनिष्ठेला माझा विरोध आहे. "महाराष्ट्रांत कॉंग्रेस मेली पाहिजे" अशा प्रकारचे उद्गार ह्या असहिष्णु निष्ठेचे द्योतक आहेत. प्रत्येक पक्षाला आपल्या बाजूला बहुमत मिळवून घेण्याचा हक्क आहे. पण त्याचबरोबर प्रत्येक पक्षाला राजकीय जीवन जगण्याचाही हक्क आहे. अमुक पक्षाला नेस्तनाबूद करा, आमचें मत न मानणारे महाराष्ट्राचे शत्रु आहेत, ह्या प्रचारांतून प्रकट होणारी मनोवृत्ति लोकशाही मूल्यें जतन करूं शकणार नाहीं. ही मनोवृत्ति किंवा ही निष्ठा आणि जुनी धर्मप्रसारकांची कडवी धर्मनिष्ठा ह्यांत तत्त्वतः फरक नाहीं. पाक आणि काफीर असा भेद मानणाऱ्या ह्या निष्ठा आहेत. लोकशाहीला ह्या निष्ठा मंजूर नाहींत. कारण मतभेद हा लोकशाहीचा आत्मा होय. मतभेद मारणें म्हणजे लोकशाहीला मारणें होय.

गेल्या वर्षभरांत संयुक्त महाराष्ट्राविषयीं जें आंदोलन झालें त्या आंदोलनांत ही असहिष्णु महाराष्ट्रनिष्ठा मला आढळून आली. ह्या आंदोलनांत मतभेद नव्हते; मतयुद्ध

होतें. दोन बाजू नव्हत्या; दोन छावण्या पडल्या होत्या. केवळ महाराष्ट्र व गुजरात अश दोन छावण्या नसून महाराष्ट्रीयांतही हा शत्रुभाव निर्माण झालेला आहे. किंबहुना, अन्य भाषिकांपेक्षां भिन्न मत बाळगणारा महाराष्ट्रीय हाच तीव्र द्वेषाचा विषय बनला होता आणि आहे. अशी फाळणी होण्याचें कारण असहिष्णु महाराष्ट्रनिष्ठा. म्हणून मी प्रथमच सांगितलें कीं मी संयुक्त महाराष्ट्रवादी आहें ; पण समितीवादी नाहीं.

## रानडे हवेत ; डांगे नकोत

भारतीय लोकशाहीच्या चौकटींत बसणाऱ्या महाराष्ट्रनिष्ठेचें स्वरूप काय असूं शकेल ? ह्या लोकशाहीचा महाराष्ट्र हा एक अविभाज्य घटक आहे हें त्या निष्ठेचें एक अंग होय. विविध भाषिक समाज ज्या भारतीय लोकशाहींत एकत्र आलेले आहेत, त्या लोकशाहीला कर्तबगार नेत्यांची उत्कट गरज आहे हें नव्यानें सांगावयास नको. ह्या लोकशाहीच्या घटकभागांतूनच लोकशाहीला हवें असलेलें नेतृत्व मिळणार हें उघड आहे. भारतीय लोकशाहीची सध्यांची अवस्था लक्षांत घेतल्यास, सर्वच घटक भागांचा विकास सारख्या प्रमाणावर झालेला आहे, असें आढळून येत नाहीं. तेव्हां, जे भाषिक समाज पुढें गेलेले आहेत अशा समाजांतून लोकशाही नेते निर्माण होण्याचा संभव अधिक असतो. महाराष्ट्र हा त्यापैकीं एक घटक भाग आहे अशी माझी श्रद्धा आहे. कारण भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनासाठीं ज्या कांहीं प्रांतांनीं प्रागतिक विचारांची मुहूर्तमेढ रोवली त्यामध्यें महाराष्ट्र अग्रेसर होता, हें सत्य अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचें परिशीलन करणाऱ्या प्रत्येकाला मान्य करावें लागेल. लोकहितवादी, न्या. रानडे, ना. गोखले आगरकर, भांडारकर, लो. टिळक इत्यादि कांहीं नांवें जरी आपण लक्षांत घेतलीं तरी महाराष्ट्राचें भारतीय समाजांतील विशिष्ट स्थान आपल्या लक्षांत येईल. तेव्हां गेल्या पांचपंचवीस वर्षांत महाराष्ट्राची पीछेहाट झाल्यासारखी दिसत असली तरी स्वतंत्र भारताच्या सामाजिक पुनर्घटनेच्या कार्यामध्यें महाराष्ट्राची शक्ति व बुद्धि उपयोगांत आणावीच लागेल. ह्या आधुनिक महाराष्ट्राला मागें रेटण्याचा प्रयत्न कोणीहि करूं शकणार नाहीं.

मी जी महाराष्ट्रनिष्ठा मानतों त्या निष्ठेचा हा जसा आशावादी भाग आहे तसाच आत्मनिरीक्षणाचाही एक भाग आहे. खरोखर आधुनिक भारतामध्यें आरंभीं आरंभीं महाराष्ट्रानें इतकी महनीय कामगिरी बजावली असतांना महाराष्ट्र असा निस्तेज कां झाला, असा प्रश्न ही निष्ठा मनाला विचारीत असते. इतर लोकांनीं महाराष्ट्राला मागें रेटण्याचा खूप प्रयत्न केला. पण महाराष्ट्र मागें कां रेटला जावा ह्या प्रश्नाचें आपणांस अंतर्मुख दृष्टि करूनच उत्तर शोधलें पाहिजे. ह्याचें एक कारण माझ्या मतानें असें कीं महाराष्ट्रांतील बुद्धिवादी वर्गानें राजकारणांत पलायनवादी वृत्ति दाखविली. गांधीयुगांत ह्या बुद्धिवादी लोकांना विचाराला न पटणाऱ्या पुष्कळ गोष्टी होत्या हें मी मान्य करतों. विशेषतः गांधीयुगांतील राजकारणांत आधुनिकतेचाच अभाव होता. विचारवंतांना हें युग मान्य

होईना. परंतु त्याचबरोबर ह्या मध्ययुगीन विचारांशीं मुकाबला करीत राहाणें हेंही त्यांचें कर्तव्य होतें.

ह्या कर्तव्यापासून हा वर्ग पराङ्मुख झाला. त्याचा एक परिणाम म्हणजे राजकारण अगदीं वाच्यार्थानें गण्यागणप्याचें राजकारण बनलें. त्या राजकारणांत संख्या वाढली; गुण कमी झाले. बुद्धिवादी मध्यमवर्ग मार्क्सवादाकडे अकर्षित होऊं लागला हा त्याचा दुसरा परिणाम. कॉंग्रेसनें बहुजनसमाजाचें राजकारण करून लोकशाहीचें विडंबन केलें आणि बुद्धिमंतांनीं मार्क्सवादासारखें लोकशाहीविरोधी तत्त्वज्ञान कवटाळून लोकशाहीकडे पाठ फिरविली. थोडक्यांत महाराष्ट्रांतील पहिल्या पिढीनें जी उदारमतवादी, सहिष्णु, चिकित्सक लोकशाही राजकारणाची परंपरा निर्माण केली, ती अशा प्रकारें गेल्या पंचवीस वर्षांत खंडित झालेली आहे.

उद्यांच्या भारतामध्यें महाराष्ट्राला अग्रेसर स्थान मिळवावयाचें असेल तर त्या महाराष्ट्राला ही परंपरा फिरून जिवंत केली पाहिजे. उदारमतवादी व आधुनिक लोकशाही मूल्यें निर्माण करूं पाहाणाऱ्या रानड्यांच्या, गोखल्यांच्या, आगरकरांच्या व लोकमान्यांच्या महाराष्ट्रावर माझी निष्ठा आहे. लोकशाहीचा खातमा करणारें तत्त्वज्ञान शिरोधार्य मानणाऱ्या डांग्यांच्या महाराष्ट्रावर माझी निष्ठा नाहीं. ह्या अर्थानें मी संयुक्त महाराष्ट्रवादी आहे, पण समितीवादी नाहीं.

## प्रकरण सातवें

# एकजुटीचें वास्तव स्वरूप

रा. पु. कमिशन नेमल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली. येथपासून संयुक्त महाराष्ट्र समितीनें निवडणुका लढवीपर्यंतचा इतिहास अगदीं ताजा आहे. त्या इतिहासाची जंत्री देण्याची गरज नाहीं. त्या इतिहासाचें पृथक्करण करण्याची गरज आहे.

संयुक्त महाराष्ट्र परिषद आणि संयुक्त महाराष्ट्र समिति ह्यांत फरक एवढाच कीं, परिषदेमध्यें कॉंग्रेस सामील झालेली होती आणि समितींत नव्हती. पण परिषद किंवा समिति ह्या नांवावरून संघटनेच्या यथार्थ स्वरूपाचा बोध होत नाहीं. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य निर्माण करण्याची मागणी मान्य करून घेण्यासाठीं महाराष्ट्रांतील सारे पक्ष एकत्र येऊन ही संघटना निर्माण झालेली आहे. कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, जनसंघ, असे अखिल भारतीय राजकीय पक्ष व शेतकरी कामकरी पक्षासारखे प्रांतीय पक्ष ह्या संघटनेचे घटक भाग आहेत. आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, हे जे घटक पक्ष समितींत सामील झाले आहेत त्यांचें पक्ष ह्या नात्यानें स्वतंत्र अस्तित्व कायम आहे. हे पक्ष समितींत संपूर्णतया विलीन झालेले नाहींत. संघटनेच्या ह्या विशिष्ट रचनेमुळें आणखी कांहीं गोष्टी ध्यानांत घ्याव्या लागतात. जे अखिल भारतीय स्वरूपाचे पक्ष आहेत त्यांच्या शाखा समितींत सामील झालेल्या आहेत. तेव्हां ह्या शाखांची अंतिम निष्ठा आपल्या पक्षावर आहे असें म्हटलें तर त्यामध्यें वस्तुस्थितीचा विपर्यास होणार नाहीं. समितीचा एक घटक म्हणून त्यांची समितीवरही निष्ठा आहे. अशा प्रकारची दुहेरी निष्ठा ह्या घटकपक्षांना कशी सांभाळतां येईल ? उद्यां ह्या पक्षांचें धोरण बदललें आणि त्या धोरणाचा समितीच्या राजकारणाशीं विरोध आला तर हे घटकपक्ष कोणतें धोरण अवलंबितील ? पक्षांतून बाहेर पडतील, का समितीला रामराम ठोकतील ? अथवा एखादी ' स्ट्रॅटेजी ' काढतील ? हे प्रश्न मी कित्येक वेळां जाहीर रीतीनें विचारलेले आहेत. पण ' शेषं कोपेन ' ह्यापेक्षां ह्या प्रश्नांना अन्य प्रकारचें उत्तर अद्यापपावेतों मिळालेलें नाहीं.

### संयुक्त आघाडीचा इतिहास

समिति ह्या नांवाखालीं ही जी सर्वपक्षीय एकजूट झाली त्या एकजुटीचा आणखी थोडा सखोल विचार करूं. एका विशिष्ट मागणीवर हे सारे पक्ष एकत्र आलेले

आहेत. अशा रीतीनें विशिष्ट प्रश्नावर सर्व पक्ष एकत्र येण्याच्या अथवा आणण्याच्या राजकारणाला 'संयुक्त आघाडीचें राजकारण' असें म्हणतात! हें संयुक्त आघाडीचें राजकारण प्रथम कोणीं निर्माण केलें, त्याचें स्वरूप काय असतें, व त्याचे परिणाम काय होतात, हा विवेचनाचा एक स्वतंत्र विषय आहे आणि तो पुढें येईलच. सध्यां संयुक्त आघाडी ( united front ) संबंधीं एकदोन सामान्य विचार येथें मांडतों. युरोपांत फासिझमचा प्रतिकार करण्यासाठीं हें संयुक्त आघाडीचें राजकारण जन्म पावलें. कारण फासिझम् हें सर्व डाव्या पक्षांवर समान संकट होतें. फासिझमचा विजय झाल्यास ह्यापैकीं कोणताही पक्ष जगूच शकत नव्हता. म्हणजे प्रत्येक राजकीय पक्षाचें तत्त्वज्ञान, ध्येय व धोरण स्वतंत्र असलें व त्यांत परस्परविरोध असला, तरी फासिझमविरोध त्या सर्व पक्षांच्या तत्त्वज्ञानाशीं सुसंगत अशीच भूमिका होती. आपल्या तात्विक भूमिकेला मुरड घालून ह्या पक्षांना संधिसाधू एकजूट करावी लागली नाहीं. किंबहुना, अशी एकजूट झाली नसती तर सर्वांचेंच आयुष्य संपुष्टांत येण्याचा प्रसंग आला होता. युद्धपूर्व काळामध्यें फासिझमला विरोध करण्यासाठीं युरोपांतील अनेक देशांमध्यें जसें संयुक्त आघाडीच्या राजकारणाचें युग होऊन गेलें, तसेंच युद्धानंतर पूर्व युरोपमध्यें संयुक्त आघाडीचें दुसरें पर्व होऊन गेलें. पण दोन वेळच्या संयुक्त आघाडींत फरक होता. फासिझम ही मानव समाजावरील मोठी आपत्ति होती. त्या फासिझमचा प्रतिकार करण्यासाठीं निर्माण झालेल्या संयुक्त आघाडीमध्यें उदात्त ध्येयवादाची ऊब होती. युद्धोत्तर कालांतील संयुक्त आघाडीच्या राजकारणामध्यें केवळ सत्तावादाची स्पर्धा होती. इतर सर्व पक्षांना असलेला लोकमताचा पाठिंबा आपणांस मिळावा व त्या पक्षांची ताकद कमी होऊन सत्ता आपल्या हातांत यावी, ह्या प्रेरणेनेंच ह्या वेळचें संयुक्त आघाडीचें राजकारण खेळलें जात होतें. लोकांना जें हवें तें देण्याचें अमिष दाखवून अथवा लोकांच्या असंतोषाचा फायदा घेऊन आपल्या पक्षनिष्ठ राजकारणाचें घोडें सतत पुढें दामटण्याचें धोरण ह्या संयुक्त आघाडीमध्यें विशेषत्वानें प्रकट झालें, अशी युद्धोत्तर संयुक्त आघाडीच्या इतिहासाची साक्ष आहे. हा इतिहास लक्षांत घेऊन समितीच्या रूपानें चालू झालेल्या संयुक्त आघाडीच्या राजकारणाचा विचार आपणांस केला पाहिजे.

## कांहीं प्रश्न

मग प्रश्न असा उपस्थित होतो कीं ही जी सर्वपक्षीय एकजूट झालेली आहे तिचें वास्तव स्वरूप काय आहे? दुसऱ्या शब्दांत असें विचारतां येईल कीं, ज्या संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवर हे सारे पक्ष एकत्र आले ती मागणी ह्या पक्षांच्या तात्त्विक भूमिकेचा एक अविभाज्य भाग आहे काय? कीं ज्याअर्थीं संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर महाराष्ट्रांतील लोकमत प्रक्षुब्ध झालें आहे, त्याअर्थीं आपापल्या पक्षाच्या महाराष्ट्र शाखांना आपापली लोकप्रियता वाढविण्यास ही एक नामी संधि आहे, ह्या सत्तावादी राजकार-

णाच्या दृष्टीनें ह्या पक्षशाखा एकत्र आलेल्या आहेत ? हे प्रश्न अवघड व नाजूक आहेत. सध्यां समितीची लोकप्रियता लक्षांत घेतां, हे प्रश्न उपस्थित करणें लोकांना रुचणार नाहीं. परंतु ह्या प्रश्न लोकांना सध्यां काय रुचतें अथवा पचतें असा नाहीं. भावना प्रक्षुब्ध असतांना राजकारणाचे दूरगामी परिणाम आकलन होत नाहींत हें खरें. पण आगामी पांच वर्षांत महाराष्ट्राचा केरळ होणार, अशी भाषा ऐकली कीं, ह्या भागांत कॉंग्रेसचा पराभव झाला ही घटना त्या मानानें कमी महत्त्वाची ठरते आणि महाराष्ट्रांत लोकशाही शक्तींचाही पराभव होणार कीं काय, ह्या गोष्टीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होतें. ह्या विचारानें मीं हे प्रश्न येथें उपस्थित केले आहेत.

## विविध पक्षांच्या भूमिका

ह्या प्रश्नांचें उत्तर शोधण्यासाठीं कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी व जनसंघ ह्या तीन पक्षांचे निवडणूकजाहीरनामे मीं काळजीपूर्वक वाचले. पण त्यांतून होकारार्थी उत्तर मिळूं शकलें नाहीं. जनसंघाला 'संघराज्य' ( Federation ) ही कल्पनाच मान्य नाहीं. राष्ट्रीय एकतेसाठीं जनसंघाला एकसंघ राज्य ( Unitary Government ) हवें आहे. संघराज्याची कल्पनाच अमान्य केल्यानंतर घटकराज्याच्या कल्पनेला व तदनुषंगानें भाषिक राज्याच्या कल्पनेला सुरुंग लागणार हें उघड आहे. प्रजासमाजवाद्यांचा भर लोकशाही समाजवादावर आहे. लोकशाही समाजवाद येण्यासाठीं भाषिक राज्यें येणें अपरिहार्य आहे, अशी भूमिका प्रजासमाजवादी पक्षाची नाहीं. उद्यां ह्या पक्षाच्या हातांत देशाचा राज्यकारभार गेला, आणि समाजवाद प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें भाषिक राज्यें आवश्यक नाहींत असें या पक्षाला वाटलें—आणि तसें वाटणार नाहीं अशी कोणतीही हमी ह्या पक्षाच्या तत्त्वज्ञानांत मिळत नाहीं—तर संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाची आंच या पक्षाला लागेलच याचा काय भरंवसा सांगावा ? कॉंग्रेसशीं ह्या पक्षाचें जें भांडण आहे तें कॉंग्रेसचा समाजवाद नकली आहे ह्या मुद्द्यावर आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर नाहीं. सत्ताधारी कॉंग्रेस व सत्ताधीश समाजवादी ह्यांच्या लोकशाहीच्या कल्पना दोन ध्रुवाइतक्या आत्यंतिक विरोधी आहेत असें नाहीं. कम्युनिस्टांनीं आपल्या जाहीरनाम्यांत संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पाठपुरावा केला आहे; पण त्याबरोबर महागुजरातचाही पाठपुरावा केलेला आहे. आणि मुंबईच्या प्रश्नावर सर्वार्थसाधक मौन धारण केलेलें आहे. तथापि आपण भाषिक गटांचा प्रश्न सोडविण्यांत फार तरबेज आहोंत असा कम्युनिस्टांचा दावा आहे. रशियानें त्या त्या भाषिकांचीं स्वायत्त राज्यें स्थापन केल्याचा निर्वाळा ते नेहमीं देत असतात. ह्या संबंधांत दोन मुख्य गोष्टी आपण लक्षांत घेतल्या पाहिजेत.

ज्या समाजांत एकपक्षीय हुकूमशाही असते तेथें स्वायत्ततेला अर्थ राहत नाहीं. रशियांत आपणांस कोठेंही केरळ आढळणार नाहीं. कारण सत्ता विधिमंडळांत नसून पक्षाच्या हातीं असते. स्वायत्तता विधिमंडळांत व केंद्रीकरण पक्षांत, हें लक्षांत घेतल्या-नंतर, स्वायत्तता एका हातानें द्यावी व दुसऱ्या हातानें काढून घ्यावी, असाच स्वायत्ततेचा प्रकार आढळून येतो. दुसरें असें कीं, हें स्वायत्ततेचें नाटक फायदेशीर ठरेल तेथेंच तें करण्यांत येतें. झेकोस्लोव्हाकियांत इतर पक्षांची शक्ति खिळखिळी करण्यास स्लोव्हाकियाची स्वायत्ततेची मागणी उपयुक्त पडते असें वाटलें कीं त्या मागणीला पाठिंबा द्यावा, आणि सत्तासंपादनाच्या कामांत ती आडवी येते असें दिसतांच ती कापून काढावी, असें जुळेल तें धोरण अवलंबिण्याच्या कामीं कम्युनिस्ट वाकबगार असतात ह्याची साक्ष झेक कम्युनिस्ट पक्षाच्या इतिहासावरून दिसून येईल.

सारांश, संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवर ही जी एकजूट झालेली आहे ती त्या त्या पक्षांच्या तात्त्विक भूमिकेंतून निघालेली नाहीं. संयुक्त महाराष्ट्राची मागणी मिळाली नाहीं तर ह्या पक्षावर फार मोठें गंडांतर येणार होतें अशांतला भाग नव्हता. लोकभावनांचा पक्षनिष्ठ राजकारणाकरितां उपयोग करून घेण्यासाठीं हा सारा उद्योग चालू आहे. चिडले आहेत ते सामान्य लोक चिडले आहेत. महाराष्ट्राचें स्वतंत्र घटकराज्य असावें, महाराष्ट्रीय नेत्यांना अखिल भारतीय राजकारणांत मानाचें स्थान असावें, महा-राष्ट्राला आर्थिक विकासाचा योग्य वांटा मिळावा, ह्या लोकांच्या आशाआकांक्षा आहेत. संयुक्त आघाडींत सामील झालेल्या घटकपक्षांना ह्या लोकभावनांचा फायदा घेऊन पक्षनिष्ठ राजकारणाचें घोडें पुढें दामटावयाचें आहे. आपापल्या पक्षाची लोकप्रियता वाढवावयाची आहे. म्हणून प्रारंभींच संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर व्यक्त झालेल्या लोकभावना आणि समितीचें राजकारण ह्यांत मीं फरक केला होता. त्या फरकाचें स्वरूप हें असें आहे.

## सुशिक्षितांना आवाहन

संयुक्त आघाडीचें राजकारण हें कम्युनिस्टांचें राजकारण आहे. केवळ हिंदी कम्युनिस्टांचेंच हें राजकारण आहे असें नाहीं. जगांतील सर्व कम्युनिस्ट पक्षाचें हेंच धोरण आहे. कोणत्याहि देशांतील कम्युनिस्ट पक्ष आपापलें स्वतंत्र असें धोरण बांधूं शकत नाहीं, ही गोष्ट जागतिक कम्युनिस्ट संघटनेचा गेल्या तीस वर्षांचा इतिहास वाचणाऱ्याच्या सहज लक्षांत येईल. फासिझमचा उदय झाल्यापासून कोमिंटर्न ह्या जागतिक संघटनेनें संयुक्त आघाडीचा पाठ सर्व पक्षांना दिलेला होता. सारे कम्युनिस्ट पक्ष आजतागायत तो अत्यंत श्रद्धाळू वृत्तीनें अमलांत आणीत आहेत. ह्या संयुक्त आघाडीला कोणतेंही निमित्त पुरतें. फासिझमविरोध, राष्ट्रीय एकजूट किंवा संयुक्त महाराष्ट्र कांहींही असो, त्यांचा पवित्रा ठरलेला आहे. हिटलरचा जोर असतांना ह्या

राजकारणानें फळ धरलें नाहीं. पण युद्धानंतर रशिया प्रबळ झाल्यानंतर ह्या राजकारणानें मागील अपयशाची सव्याज भरपाई केली आहे, असें पूर्व यूरोपच्या इतिहासावरून स्पष्टपणें दिसून येतें. तेव्हां संयुक्त महाराष्ट्राच्या न्याय्य मागणीला डावलल्यामुळें जे सुशिक्षित व विचारी लोक चिडल्यासारखे झालेले आहेत, ' कोणी वाटेल तो निवडून येऊं दे पण कॉंग्रेस मात्र नको ' अशी ज्यांची प्रतिक्रिया झालेली आहे, त्या सुशिक्षितांना, ह्या संयुक्त आघाडीच्या राजकारणाचे परिणाम काय होतील, ह्याचा विचार करण्याचें मी अवाहन करतों. महाराष्ट्रांत कॉंग्रेसविरोधी जोरदार प्रतिक्रिया निर्माण झालेली असली तरी महाराष्ट्रांतील बुद्धिमान व सुशिक्षित वर्गाची श्रद्धा लोकशाही महाराष्ट्रावर आहे, कम्युनिस्ट महाराष्ट्रावर नाहीं, अशी माझी श्रद्धा आहे. ह्यासाठीं व्यक्ति व पंथ ह्यांना क्षणभर बाजूला सारून ह्या राजकारणाचे दूरगामी परिणाम काय होऊं शकतील ह्याचा विवेकवादी महाराष्ट्रानें विचार करण्याची वेळ आलेली आहे. वस्तुस्थितीचें एक तर्कशास्त्र असतें. आपण कोणत्याही हेतूनें एका दिशेनें पहिलें पाऊल टाकलें कीं ती दिशा कायम असेपर्यंत पुढचीं पावलें त्याच दिशेनें जाणार, हें ठरलेलें असतें. भारवीचे ' अविवेकः परमापदां पदं ' हे उद्‌गार ह्या ठिकाणीं किती सार्थ आहेत ! त्या दिशेची कल्पना यावी म्हणून संयुक्त आघाडीच्या राजकारणाचा थोडा इतिहास मी येथें देणार आहें.

## कम्युनिस्ट सर्व पक्षांना खाऊन सत्ताधारी झाले !

इतर देशांतील इतिहास देतांना, त्या देशांतील परिस्थिति व भारतांतील परिस्थिति ह्यांमध्यें बराच फरक आहे, ह्याची मला जाणीव आहे. तसेंच मी घबराटवादी नाहीं. महाराष्ट्रांत समितीला विजय मिळाला आहे, साम्यवाद्यांना नाहीं, हें मी मान्य करतों आणि समितीचें रूपांतर साम्यवादी पक्षांत करण्यास कम्युनिस्टांना बराच रस्ता कापावा लागेल हेंही खरें आहे.

पण इतर देशांतही सर्वपक्षीय एकजुटींत कम्युनिस्ट असेच अल्पसंख्य होते आणि त्यांच्या विशिष्ट कार्यपद्धतीमुळें अखेर त्या सर्व पक्षांना खाऊन कम्युनिस्ट सत्ताधारी बनले हा परिणामही आपण ध्यानांत घेतला पाहिजे. रुमानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया पोलंड, हंगेरी, ह्या देशांत केवळ संयुक्त आघाडीच्या राजकारणामुळें कम्युनिष्टांनीं सत्ता संपादन केली असें घडलें नाहीं. रशियाचें राजकीय व लष्करी पाठबळ ह्या घटकाचा त्यांत फार मोठा वांटा होता. फ्रान्स, इटाली व ग्रीस ह्या देशांत कम्युनिस्टांना यश मिळालें नाहीं ह्याचें कारणही रशियन मदतीचा अभाव हेंच द्यावें लागेल. तथापि, संयुक्त आघाडीचें राजकरण सत्तासंपादनाच्य कामीं बरेंच उपयोगी पडलें ह्यांत कांहींच शंका नाहीं. भारतामध्यें कम्युनिस्ट त्या दृष्टीनें थोडे दुबळे आहेत. परंतु संयुक्त आघाडीचें

राजकारण खेळून आपलीं कांहीं राखीव केंद्रें निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे हें केरळच्या उदाहरणावरून स्पष्ट होण्यासारखें आहे. आणि काँग्रेसला विरोध करणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या व्यासपीठावरून केरळमधील कम्युनिस्टांच्या विजयाचा गौरव होणें हा कांहीं योगायोग मानतां येत नाहीं. एका विशिष्ट दिशेनें कम्युनिस्ट पक्ष पावलें टाकीत आहे असा ह्या सर्व घटनांचा अर्थ आहे.

## संयुक्त आघाडीचे दोन प्रकार

समितीमध्यें इतर घटक पक्ष कोणत्याही हेतूनें सामील झालेले असोत, कम्युनिस्ट पक्ष ह्या समितींत केवळ संयुक्त महाराष्ट्राच्या पोटतिडीकीनें सामील झाला आहे असें नाहीं. कम्युनिस्टांच्या जागतिक संघटनेचा ( मग ती कोमिन्टर्न असो वा कोमिनफॉर्म असो ) भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा जोंपर्यंत घटक भाग आहे आणि त्या संघटनेचे निर्णय व धोरण हा पक्ष जोंपर्यंत शिरोधार्य मानतो, तोंपर्यंत ह्या पक्षाची अंतिम निष्ठा या देशांतील संयुक्त महाराष्ट्रासारख्या केवळ एका विभागीय प्रश्नावर असेल असें मानतां येत नाहीं. आणि संयुक्त महाराष्ट्रसमितीसारखें संयुक्त आघाडीचें राजकारण कम्युनिस्ट पक्ष नव्यानेंच खेळत नाहीं. १९२१ पासून जागतिक कम्युनिस्ट संघटनेनें ' संयुक्त आघाडी ' हा आपल्या राजकीय डावपेंचाचा एक भाग केला आहे आणि सारे कम्युनिस्ट पक्ष अत्यंत विश्वासूपणें व प्रामाणिकपणें तो डाव खेळत आले आहेत. संयुक्त आघाडी म्हणजे कम्युनिस्टांचें राजकारण हे शब्दप्रयोग आतां समानार्थी झाले आहेत. ह्या संयुक्त आघाडीचे दोन प्रकार आहेत. 'खालून संयुक्त आघाडी' आणि 'वरून संयुक्त आघाडी' इतर राजकीय पक्षांशीं दोस्ती न करतां बिगरकम्युनिस्ट कामगार, किसान व मध्यमवर्ग यांच्यांशीं साक्षात् एकजूट करणें ह्याला खालून निर्माण झालेली आघाडी असें म्हणता येईल आणि त्या त्या पक्षाच्या पुढाऱ्यांशीं एकजूट करणें ही वरून आलेली आघाडी होय. पहिल्या प्रकारच्या आघाडींत इतर डाव्या गटाच्या पुढाऱ्यांवर हल्ला चढवितां येतो. दुसऱ्या प्रकारच्या आघाडींत अधिक मुत्सद्देगिरी आहे. ह्या आघाडींत दुसऱ्या पक्षांच्या पुढाऱ्यांशीं हस्तांदोलन करीत करीत त्यांचे अनुयायी कशा प्रकारें फुटतील ह्याची सल्लामसलत योजावी लागते.

"The comintern recommended a policy of 'United Front' with non-communist workers' organisations. This has since become a welknown communist tactic. It has two variations—'United front from below' and 'United front from above.' The first is openly directed against socialist leaders, and aims at winning the socialist masses away from them. It combines general arguments for workers' unity with violent abuse of socialist politicians. The second tactic is more subtle. It ostensilby includes co-operation not only with the socia-

list masses but also with the socialist leaders. It does not openly denounce the leaders to their followers. Its aim, however, is to gain portions of influence within the united front, in order at a later stage to undermine the authority of the socialist leaders and tear their followers away from them." (From Lenin to Malenkov, Page 100 ).

## जर्मनीचें उदाहरण

१९२१ सालापासून हिटलरचा उदय होईपर्यंत सर्व कम्युनिस्ट पहिल्या प्रकारच्या आघाडीचें राजकारण खेळले. लोकशाही समाजवादी, समाजवादी, रॅडिकल, पॉप्युलिस्ट इत्यादि जे डावे पक्ष होते, त्या पक्षांमागें असलेल्या जनतेला साक्षात् आवाहन करावें आणि ह्या पक्षांच्या पुढाऱ्यांची यथेच्छ निंदा करावी असा त्याकाळीं कम्युनिस्टांचा खाक्या होता. शिवीकोशांत कम्युनिस्ट कोणाला हार जाणार नाहींत ही गोष्ट 'प्रतिगामी' तिक्रांतिकारक' 'भांडवलशाहीचे हस्तक' 'साम्राज्याचे बगलबच्चे' 'सोशल् फासिस्ट' इत्यादि शेलक्यां व ठेवणींतील विशेषणें ऐकलीं तरी पटण्यासारखें आहे. परंतु अशा रीतीनें पुढाऱ्यांना बाजूस सारून अनुयायांना आपल्या बाजूस आणण्याचें राजकारण कम्युनिस्टांना फलदायी ठरलें नाहीं, इतकेंच नव्हे तर कोमिंटर्ननें दिलेला आदेश इतक्या अंध विश्वासानें अंमलांत आणण्यामध्ये कम्युनिस्टांनीं हिटलरला रान मोकळें करून देण्याचा मूर्खपणाचा कळस केला. जर्मनीमध्यें नात्सी सामर्थ्यसंपन्न होत आहे हें उघड दिसत असूनही कम्युनिस्टांचा सर्व रोख 'समाजवाद्यांविरुद्ध' होता. त्यांना नात्सीपेक्षां समाजवादी अधिक क्रांतिद्रोही वाटत होते.

"It was in Germany that communist imbecility reached its peak. During the last years of the Weirman Republic, while Hitler's Nazis were becoming a power in hand, communist hatred was directed at the Social-Fascists. " ( From Lenin to Malenkov, Page 109 ).

आपलें नाक कापून दुसऱ्याला अपशकुन करण्याचा ह्या आत्मघातकी राजकारणाचा परिणाम कम्युनिस्टांना तर भोंवलाच, पण लोकशाही शक्तींनाही भोंवला. त्यांच्या अदूरदर्शी व अवास्तव धोरणाचें स्वरूप १९२१ ते १९३५ ह्या दरम्यान भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राजकारणांतही आढळून येतें. कॉंग्रेस ही भांडवलदारांची संस्था असून भारतांत कामगारक्रांति झाली पाहिजे, ह्या अवास्तव घोषणा त्यावेळीं कम्युनिस्ट करीत होते. ह्या धोरणाचा परिणाम कम्युनिस्ट पक्षाची सर्वत्र पीछेहाट होण्यांत झाली असल्यास नवल नाहीं.

## तीन अवस्था

एका सर्वंकष हुकुमशाहीचा भस्मासूर कम्युनिस्टांच्याच टाळूवर हात ठेवूं लागल्यानंतर कम्युनिस्ट जागे झाले आणि खालच्या आघाडीचें राजकारण सोडून त्यांनीं

वरच्या आघाडीचें राजकारण खेळण्यास सुरूवात केली. ह्या दुसऱ्या संयुक्त आघाडीच्या स्थूल मानानें तीन अवस्था दिसतात. हिटलरचा उदय झाल्यापासून दुसरें महायुद्ध सुरूं होईपर्यंत पहिली अवस्था, युद्धकालीन अवस्था व युद्धोत्तरकालीन अवस्था असे हे तीन टप्पे आहेत. ' जनता आघाडी ' ( Popular front ) ' मुक्ति आघाडी ' ( Liberation front ) आणि ' राष्ट्रीय आघाडी '( National front ) अशीं ह्या तीन कालखंडांतील आघाड्यांना तीन वेगवेगळीं नांवेंही मिळालीं आहेत. हिटलर मुसोलिनी ह्यांचा उदय झाल्यानंतर फासिझमची लाट थोपवून धरण्यासाठीं फ्रान्स, स्पेन व पूर्व यूरोप येथें जनताआघाडी निर्माण झाली. युद्धामध्यें हिटलरनें सारा यूरोप पादाक्रांत केला व रशियावर हल्ला केला, तेव्हां त्याचा प्रतिकार करण्यासाठीं ' मुक्ति आघाडी ' स्थापन झाली आणि युद्ध संपण्याच्या सुमारास युरोपांतील मुक्त राष्ट्रांमध्यें कम्युनिस्ट राजवट स्थापन करण्याची पहिली पायरी म्हणून राष्ट्रीय आघाडी निर्माण झाली, ह्यांपैकीं जनताआघाडी व मुक्तिआघाडी ह्यांच्या कालखंडांत जनतेचें ह्या आघाडीला उत्स्फूर्त सहकार्य मिळालें असें दिसून येतें. ह्याचें मुख्य कारण युरोपांतील जनतेला फासिझमच्या प्रतिकाराची तळमळ होती हेंच द्यावें लागेल. किंबहुना लोकांनीं सर्व डाव्या पक्षावर आघाडीचें राजकारण लादलें असें म्हटलें तर त्यांत बिलकुल अतिशयोक्ति होणार नाहीं. ' आपापसांत काय भांडत बसलांत, एक व्हा ' असे लोकांचेंच सर्व पक्षावर दडपण येऊं लागलें होतें. पण राष्ट्रीय आघाडीची तशी स्थिति नव्हती. १९४५ सालानंतर हिटलरच्या टांचेखालून एकेक देश जसजसा मुक्त होऊं लागला तसतसा तो देश आपल्या प्रभुत्वाखालीं यावा असें रशियाचें धोरण बनत गेलें, आणि हें धोरण यशस्वी करण्याच्या हेतूनें त्या त्या देशांतील कम्युनिस्टांनीं राष्ट्रीय आघाडीचें तोरण बांधलें असें युद्धोत्तरकालीन आघाडीचें स्वरूप होतें. युरोपांतील राष्ट्रांचें सोव्हिएटीकरण हा त्या आघाडीचा प्रमुख हेतु होता आणि त्या त्या देशांतील कम्युनिस्ट सत्तापिपासू बनलेले होते.

## अपयशाचें कारण

फासिझमला प्रतिकार करण्याच्या उद्देशानें फ्रान्स, स्पेन व पूर्व यूरोपांतील राष्ट्रें ह्याठिकाणी जी जनता आघाडी निर्माण झालेली होती तिचा फायदा कम्युनिस्टांना मिळाला ह्यांत कांहींच शंका नाहीं. १९३६ च्या मेमध्यें फ्रान्समध्यें ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकांमध्यें कम्युनिस्टांना पूर्वीपेक्षां जवळजवळ दुप्पट मतें मिळालीं. स्पेनमध्येंही तोच प्रकार घडून आला. स्पेनमध्यें क्रांतिकारक उठाव होण्यापूर्वी कम्युनिस्टांना फारच थोडा पाठिंबा होता. पण रशियानें स्पेनच्या यादवींत क्रांतिकारकांना पाठिंबा दिल्याकारणानें आणि गनिमीकाव्याचें युद्ध हिरीरीनें खेळण्यांत कम्युनिस्ट वाकबगार असल्याकारणानें स्पेनमध्यें कम्युनिस्टांचें राजकीय महत्त्व वाढलें. बाल्कन

राष्ट्रामध्येंही कम्युनिस्ट पक्षाची ताकद व अनुयायांची संख्या थोड्याबहुत प्रमाणांत वाढल्याचें आढळून येतें. युगोस्लाव्हियांत कम्युनिस्ट पक्ष त्याकाळीं बेकायदा होता. तथापि, विद्यार्थी व पदवीधर ह्यांचा पाठिंबा मिळविण्यांत त्यानें यश संपादन केलें. बल्गेरिया व झेकोस्लोव्हाकिया येथेंही कम्युनिस्टांना ह्या आघाडीच्या राजकारणानें बरेच अनुयायी मिळवितां आले. तथापि, युद्धपूर्व काळामध्यें.एकंदरीनें विचार केला तर कम्युनिस्टांना ह्या आघाडीच्या राजकारणांत यश आलें नाहीं, असें आढळून येतें. ह्याचीं कारणें दोन. इंग्लंड–अमेरिका इत्यादि बलाढ्य राष्ट्रांनीं फासिझमच्या आक्रमणाकडे दुर्लक्ष केलें हें एक कारण. स्पेनच्या कायदेशीर प्रजासत्ताक राज्याला शस्त्रास्त्रांचा पुरवठा न होऊं देण्याइतपत इंग्लंड व फ्रान्स ह्यांनीं अवलंबिलेलें तटस्थतेचें धोरण आणि झेकोस्लोव्हाकिया गिळंकृत केल्यानंतरही झालेला म्यूनिक करार हीं ह्याचीं ठळक उदाहरणें होत.पण त्याचबरोबर ही आघाडी अंतर्गत मतभेदांनीं दुबळी झालेली होती. कम्युनिस्ट आणि भागीदार ह्यांना एकमेकांविषयीं संशय वाटत होता आणि इतर पक्षांना आंतून सुरुंग लावण्याचा कम्युनिस्टांचा स्वभाव गेलेला नव्हता, हेंही ह्या अपयशाचें दुसरें कारण हिशोबांत धरावें लागेल. एकजूट करतांना कांहीं शिष्टसंमत मर्यादा पाळाव्या लागतात हा राजकीय प्रामाणिकपणा कम्युनिस्टांच्या शब्दकोशांत नाहीं.

" The truth is that the communists themselves were principally to blame. They were determined to enjoy both the pleasures of leadership and the pleasures of opposition. They could not bring themselves to cease their demagogic agitation against the socialists and demo. crats whom they were supposed to support. They never gave up their aim of winning the socialist and democratic masses away from their leaders. Though appearing in public as allies and colleagues of these leaders, they took every opportunity to undermine their authority...Certainly there was nothing discreet about the methods of the communist agitators in Western Europe during the popular Front period.The socialist and democratic leaders soon became aware of the communists' disloyal behaviour, which inevitably diminished their enthusiasm for the popular Front and weakened the common resistance to fascism and to the enemies of the soviet Union.:' ( From Lenin to Malenkov, Page 179 )

## शौर्याचें रहस्य

युद्धपूर्व काळांतील जनता आघाडीची ही स्थिति झाली. युद्ध सुरू झालें. त्या वेळीं जर्मनी व रशिया ह्यांच्यांत अनाक्रमणाचा करार झालेला होता. त्याबरोबर तावडतोब जनताआघाडी बंद झाली. इतकेंच नव्हे तर पराजयवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून,

फ्रेंच कम्युनिस्टांनीं हिटलरच्या विजयाची पूर्वतयारीच केली असें म्हणावयास हरकत नाहीं. जे कम्युनिस्ट फासिस्ट विरोधी होते ते एका क्षणांत फासिझमला अनुकूल बनले. मानवी स्वातंत्र्याचा संहार करणाऱ्या एका रानटी शक्तीचें दलितोद्धाराचें कंकण बांधलेला एक राजकीय पक्ष स्वागत करूं शकतो, हें दृश्यच मुळीं घृणास्पद होतें. पण हिटलरनें रशियावर स्वारी करतांक्षणीं हीही भूमिका पालटली. परत कम्युनिस्ट फासिस्टविरोधी बनले आणि प्रतिकार-आघाडींत सामील झाले. पण ह्या आघाडींत तरी त्यांनीं आपला मूळचा स्वभाव सोडला होता काय ? मुळींच नाहीं. फासिझमला लष्करी प्रतिकार करण्यासाठीं निर्माण झालेल्या ह्या आघाडींत अनेक लोकशाही शक्ति काम करीत होत्या. कम्युनिस्ट मूळचे कडवे. त्यांनीं ह्या आघाडींत सामील झाल्यानंतर कल्पनातीत शौर्य दाखविलें आणि त्यांच्या पूर्वीच्या धोरणामुळें त्यांच्यावर आलेला ठपका त्यांनीं धुऊन काढला, पण त्याचबरोबर ह्या आघाडींत काम करीत असतांना नियुक्त प्रदेशांतील सत्ता आपल्या हातांत कशी राहील अथवा येईल ह्या एकाच उद्देशानें ते हें शौर्य दाखवीत होते, ही गोष्ट फ्रान्स, इटाली व बाल्कन राष्ट्रें ह्या राष्ट्रांतील प्रतिकार चळवळीचे सूक्ष्म परीक्षण केल्यावर स्पष्टपणें आढळून येतें.

" The Communists used the resistance to get powar into their hands. They realised that patriotic slogans in time of national apprehension would win them more popular support than their revolutionary slogans had ever brought them in time of peace. When liberation came, they hoped to establish their own dictatorship, and if not, then at least to play a far greater part in their country's politics than before the enemy invasion. Key military and civil ports in their areas liberated by the resisters must be held by the communists. The soldiers of the resistance must, when possible, be indoctrinated with the basic slogan of the communist party. The party must strengthen itself by recruiting into its ranks as many as possible of the new officers and new civil administrators thrown up by the war itself."
(From Lenin to Malenkov; Page 211)

प्रकरण आठवें

# राष्ट्रीय-आघाड्यांचीं लाल कारस्थानें

युद्धोत्तर कालानंतर कम्युनिस्टांनीं राष्ट्रीय आघाडीच्या नांवाखालीं जें राजकारण केलें तें सत्तावादी राजकारण होतें. वास्तविक कम्युनिस्टांच्या राजकारणाचा 'सत्तासंपादन' हाच आत्मा होय. 'प्रत्येक क्रांतीमध्यें मूलभूत प्रश्न सत्तेचा असतो' असें लेनिननें सांगितलें होतें; आणि समाजाची पुनर्घटना होण्यापूर्वीं व होण्यासाठीं राजकीय सत्ता प्रथम हस्तगत करावी लागते ही मार्क्सवादाची शिकवण लक्षांत घेतल्यास, कम्युनिस्टांचें राजकारण सत्ताप्रधान असणें स्वाभाविक आहे.

परंतु ह्या महायुद्धानंतर विशेषतः पूर्व युरोपांत कम्युनिस्टांनीं राष्ट्रीय आघाडीच्या नांवाखालीं जें राजकारण केलें, तें उघड्यानागड्या सत्तास्पर्धेचें राजकारण होतें. क्रांतीची मूळ कल्पना सत्ता काबीज करण्याची असली तरी क्रांति घडवून आणणाऱ्या पक्षाला जनतेचा एकमुखी व उत्स्फूर्त पाठिंबा असतो असें गृहीत धरलें आहे. आणि हें गृहीत कृत्य हेंच क्रांतीचें नैतिक समर्थन होय. पूर्व युरोपांत जें घडलें तें असें घडलें नाहीं. पूर्व युरोपांतील राष्ट्रांमध्यें कम्युनिस्टांना बहुमताचा पाठिंबा नव्हता. समाजवादी, शेतकरी पक्ष, रॅडिकल इत्यादि कम्युनिस्टविरोधी पक्षांमागेंच बहुसंख्य जनता होती. आणि राष्ट्रीय आघाडी निर्माण करून ह्या पक्षांची खच्ची करावी व सत्ता आपल्या हातांत घ्यावी हें कम्युनिस्टांना साधावयाचें होतें. तेव्हां पूर्व युरोपांत जें घडलें त्याला क्रांति असें नांव देतां येणार नाहीं. सत्ता संपादन करण्याचें कारस्थान ( Coup d etat ) हेंच त्याला अन्वर्थक नांव होय.

## कारस्थान हेंच नांव अन्वर्थक !

कारस्थान असें नांव देण्यास आणखी एक कारण आहे. ह्या सर्व देशांत कम्युनिस्ट पक्षाला सत्ता हस्तगत करतां आली ह्याचें कारण सोव्हिएट रशियाचें ह्या कम्युनिस्ट पक्षांना पाठबळ होतें. स्थानिक जनतेच्या पाठिंब्यावर कम्युनिस्टांना जेथें सत्ता मिळविणें शक्य नव्हतें, तेथें रशियानें त्या राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हस्तक्षेपही केलेला आहे. पोलंडमध्यें राजकीय पक्ष आपणास अनुकूल असावा म्हणून पोलिश समाजवादी पक्षांतील स्वतंत्र वृतीच्या व्यक्तींची हकालपट्टी करण्यांत आली. आणि इतकेंही करून विरोध नष्ट होईना म्हणून रशियाला प्रत्यक्ष हस्तक्षेप करावा

लागला. पूर्व जर्मनींतील समाजवादी व कम्युनिस्ट पक्षांचें विलीनीकरण उरकून घेण्याचा विधि मास्कोंतच झाला आणि मग तें विलीनीकरण जर्मन जनतेवर लादण्यांत आलें. हंगेरींत युद्धपूर्व समाजवादी पक्षाच्या पूर्वीच्या पुढाऱ्यांची हकालपट्टी करण्यांत आली आणि स्वतंत्र वृत्तीच्या बॅन व ॲना केथली ह्या दोघांना हाकलून एक पक्ष तयार करण्यांत आला. झेकोस्लोव्हाकियांत गोटवॉल्डच्या हातांत सत्ता यावी म्हणून रशियन प्रतिनिधि झोरिन स्वतः हजर होता आणि त्याचवेळीं रशियन सैन्य झेकोस्लोव्हाकियाच्या सरहद्दीवर जमा झालें होतें. सारांश, राष्ट्रीय आघाडीच्या राजकारणांतूनही लोकांचा हार्दिक पाठिंबा मिळवून कम्युनिस्टांना सत्ता हस्तगत करून घेतां आली नाहीं. रशियाच्या राजकीय, आर्थिक वा लष्करी दडपणाचा भाग ह्यांत बराच होता. ज्या देशांत रशियाचे हात पोहोचूं शकले नाहींत त्या देशामध्यें कम्युनिस्टांना विरोधी पक्ष ह्या भूमिकेवरच संतुष्ट राहावें लागलें. ही गोष्ट फ्रान्स, इटाली व स्पेन येथील कम्युनिस्ट पक्षांच्या इतिहासावरून सिद्ध होईल. तेव्हां सत्ता संपादन करण्यामध्यें नैतिकता कीं अनैतिकता हा प्रश्नच राहिला नाहीं. सबळानें दुर्बळाचा पाडाव करावा व तो कोणत्याही मार्गानें व जमेल त्या उपायांनीं करावा, असें कणिकनीतीचें स्वरूप त्याला प्राप्त झालें आहे. तसें नसतें, ज्याला बहुमताचा पाठिंबा आहे त्यानें सनदशीर मार्गानें सरकार चालवावें हा लोकशाही दंडक स्वीकारला असता, तर आज ज्या देशांत कम्युनिस्टाची राजवट युद्धोत्तर कालांत स्थापन झालेली आपणांस दिसते, त्यांपैकीं एकाही देशांत ती दिसली नसती. म्हणून कम्युनिस्टांच्या सत्तासंपादनाच्या प्रयत्नाला कारस्थान हेंच नांव अन्वर्थक ठरेल.

## राष्ट्रीय आघाडीचें राजकारण

राष्ट्रीय आघाडीच्या राजकारणाची तयारी 'मुक्तिआघाडी' सुरू झाल्यापासूनच सुरू झालेली होती. जी प्रतिकारसेना तयार करण्यांत आली त्या सेनेचा वापर रशियावरील जर्मन सैन्याचें दडपण कमी करण्यासाठीं पुष्कळ वेळां करण्यांत आला. अर्थात् ह्या प्रतिकारसेनेची प्राणहानीही बरीच झाली. पण अशावेळीं कम्युनिस्टेतरांची प्रतिकारसेना पुढें घालून आपल्या मार्गातील अडथळे अनायासें दूर करण्याचे कम्युनिस्टांकडून प्रयत्न झाले जसजसे प्रदेश विमुक्त होत गेले, तसतसे त्या विमुक्त प्रदेशांत हंगामी सरकार स्थापन करून त्यांतील मोक्याच्या जागा कम्युनिस्टांनीं पटकावल्या आणि नंतर आपल्या बाजूला बहुमत मिळविण्याचे त्यांनीं प्रयत्न केले. हें बहुमत मिळविण्याचें एक साधन म्हणून राष्ट्रीय आघाडीचा कम्युनिस्टांनीं उपयोग करून घेतलेला आहे. पोलंड, हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया, झेकोस्लाव्हाकिया ह्यांपैकीं एकाही देशांत युद्ध संपल्यानंतर कम्युनिस्ट बहुमतात नव्हते आणि सनदशीर मार्गानेंच त्यांनीं राजकारण करण्याचें ठरविलें असतें, तर बहुमत मिळण्याची त्यांना आशाही नव्हती. समाजवादी, शेतकरी पक्ष, सोशल डेमोक्रॅट इत्यादि पक्षांशीं उघडउघड विरोध करून, त्यांना मिळालेलें पाठबळ आपल्याकडे

ओढून घेण्याच्या कामांत त्यांना यश मिळालें नसतें. त्यासाठीं 'राष्ट्रीय आघाडी' च्या राजकारणाचा त्यांना उपयोग करावा लागला. ह्या आघाडींतही ठकबाजी, दमदाटी, बेकायदा हडेलहप्पी ह्या वाम मार्गांचा त्यांनीं सरसहा वापर केलेला आहे. ह्या राष्ट्रीय आघाडींत इतर राजकीय पक्षांना नामोहरम करण्यासाठीं कोणतें तंत्र कमुनिस्टांनीं स्वीकारलें ह्याचें उघड उघड समर्थन हंगेरीचा उपपंतप्रधान राकोसी ह्यानें केलेलें आहे. १९५२ च्या फेब्रुआरीमध्यें हंगेरींतील कामगारपक्षाच्या बौद्धिक शिबिरामध्यें राकोसीनें जें व्याख्यान दिलें त्या व्याख्यानांत कम्युनिस्टांचें तंत्र, मंत्र व उपद्व्याप ह्यावर विदारक प्रकाश टाकलेला आहे. राकोसीनें जें वेगवेगळ्या पक्षांचें बळ दिलें आहे त्यावरून हंगेरींत १९४५ सालीं छोट्या जमीनमालक पक्षाला ५६ टक्के व कम्युनिस्टांना १७ टक्के मतें मिळाल्याचें आढळून येतें. अवघ्या दोन वर्षांत कम्युनिस्टांनीं आपल्या हातांत सत्ता घेतली. हा चमत्कार कसा काय घडून आला ?

## राकोसीची विदारक कबुली

राकोसी असें स्पष्ट सांगतो कीं, संयुक्त आघाडीचें संयुक्त मंत्रिमंडळ बनवितांना कम्युनिस्टांनीं जर कोणती दक्षता घेतली असेल तर ती पोलिसखातें (आपल्या येथील गृहखातें) आपल्या ताब्यांत ठेवण्याची. पोलिसखातें कम्युनिस्टांच्या हातांतील एक प्रभावी शस्त्र आहे, असें कोणताही आडपडदा न ठेवतां त्यानें सांगितलें आहे. ("There was a single position, the control of which was claimed by our party from the first minute, and where it was not inclined to consider any distribution of posts or any appointments according to the proportionate strength of the parties in coalition. This was the State Security Authority. We held this organisation firmly in our hands from the first day of its establishment. We made sure it remained a reliable and sharp weapon in the fight for the People's democracy." How we took over Hungary, page 16)

ह्या खात्याच्या जोडीलाच प्रसिद्धखातेंही आपल्या ताब्यांत घेण्याचा त्यांनीं इतर देशांत प्रयत्न केला. पोलिसखातें ताब्यांत आल्यानंतर कम्युनिस्ट काय करूं शकतील ह्याची कल्पना सुबुद्ध वाचकाला सहज येऊं शकेल. पोलिस दलांत कम्युनिस्टांचा भरणा करणें, जे अधिकारी कम्युनिस्टांना विरोध करतील त्यांची उचलबांगडी करणें, विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना व पुढाऱ्यांना अटक करणें, खोटे पुरावे तयार करून त्यांच्यावर खटले भरणें, लोकांत दहशत निर्माण करणें इत्यादि अनेक प्रकार कम्युनिस्टांनीं हंगेरीमध्यें केले. त्यानंतर एक सुप्रीम इकॉनॉमिक् कौन्सिल स्थापून आर्थिक जीवनाच्या महत्त्वाच्या जागा काबीज केल्या. इतकेंही करून उद्दिष्ट साध्य होईना म्हणून एक

'राजकीय' कटाचा बनावट खटला तयार केला आणि त्याचे धागेदोरे एक मंत्र्यापर्यंत आणि शेतकरी पक्षाच्या सरचिटणीसापर्यंत जातात असा पुरावा तयार करून, स्मॉल होल्डर्स पक्षाचा सरचिटणीस बेला कोव्हॅक्स ह्याला कैद करण्यांत आली. ह्या वाममार्गाची मजल येथपर्यंत गेली कीं, स्मॉलहोल्डर्स पक्षाचा मुख्य प्रधान फेरेन्स नागी हाही ह्या कटांत सामील असल्याचें भासविण्यांत आलें, आणि नागीला स्वित्झर्लंडमध्येंच राहावें लागलें. सारांश, राष्ट्रीय आघाडींत शिरून इतर पक्षांची शक्ति खच्ची करण्याचें, त्यांच्या पुढाऱ्यांना गिरफदार व हद्दपार करण्याचें धोरण कम्युनिस्टांनीं हंगेरींत स्वीकारलें होतें आणि कोणत्याही घटनात्मक मार्गाचा अवलंब न करतां, विरोधी पक्ष दुबळे झाल्याची खात्री पटल्यानंतर, कम्युनिस्टांनीं सत्ता काबीज केली, असा हंगेरींतील राष्ट्रीय आघाडीचा इतिहास आहे. आणि राकोसीसारख्या जबाबदार कम्युनिस्ट पुढाऱ्यानें ह्याची स्वमुखानें प्रांजल कबुली देऊन टाकली आहे.

## बल्गेरियांतही तेंच

राष्ट्रीय आघाडी स्थापून कम्युनिस्टांनीं हंगेरींत जे मार्ग अनुसरले त्याचीच आवृत्ति बल्गेरियांत केली. बल्गेरियांत राष्ट्रीय आघाडी स्थापन करून कम्युतिस्टांनीं जें सरकार स्थापन केलें तें बाह्यतः संयुक्त सरकार होतें. कम्युनिस्ट, शेतकरी पक्ष, समाजवादी, रॅडिकल आणि स्वतंत्र डावे अशांचें तें सरकार होतें. पण हंगेरीप्रमाणेंच पोलिस व न्याय ह्या मोक्याच्या जागा त्यांनीं आपल्याकडे ठेविल्या. पोलिसमंत्री युगाव्हनें लगेच 'जनता सेना' 'लाल सेना' व रशियांतील गुप्त पोलिसदलाच्या धर्तीवर 'गुप्तपोलिस दल' निर्माण करून धरपकड व खून ह्यांचें सत्र आरंभिलें. त्याचबरोबर १९४४ मध्यें एक कायदा पास करून घेऊन त्यानुसार "लोकन्यायालयें" स्थापन करण्यांत आलीं. ह्या लोकन्यायालयांत केवळ नात्सीशीं सहकार्य करणाऱ्या लोकांनाच शिक्षा झाल्या असें नाहीं, तर कित्येक प्रमुख राजकीय नेते, अधिकारी, न्यायाधीश, शिक्षक, पत्रकार, व्यापारी, धर्मोपदेशक ह्यांना ह्या न्यायालयासमोर खेंचण्यांत आलें. कम्युनिस्टांनीं दिलेल्या माहितीनुसार सहा महिन्यांत ह्या लोकन्यायालयांमध्यें ११६६७ लोकांवर खटले भरण्यांत आले आणि त्यांपैकीं २८५० लोकांना फांशी देण्यांत आले. १९४५ च्या मे महिन्यापर्यंत इतर सर्व पक्षांचा खातमा करण्यांत आला होता. ह्याच वर्षीच्या ऑगस्टमध्यें राष्ट्रीय मंत्रिमंडळाचा उपाध्यक्ष निकोला पेटकॉव्ह ह्यानें कम्युनिस्टांशीं सहकार्य करणें अशक्य आहे म्हणून राजीनामा दिला. ऑगस्ट २८ ला निवडणुका होत्या. विरोधी पक्षाच्या मार्गांत अनंत अडथळे आणण्यांत आलें. धरपकड, दमदाटी, सभेंत हुल्लडबाजी ह्या सर्व सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करण्यांत आला आणि विरोधी पक्षांनीं कंटाळून निवडणुकींतून अंग काढून घेतलें. आणि एकच पक्ष असलेली राष्ट्रीय आघाडी विजयी झाली. बल्गेरियांत

ह्यानंतर ज्या घडामोडी झाल्या; अनेक नामवंत पुढाऱ्यांचें छळ, हद्दपारी, फांशी इत्यादि जे प्रकार झाले; त्यांची यादी देण्याचें हें स्थळ नव्हे. राष्ट्रीय आघाडी स्थापून त्या आघाडींत सामील झालेल्या इतर पक्षांचा कम्युनिस्ट कसा नाश करतात ह्याची वर दिलेल्या माहितीवरून योग्य कल्पना येण्यास हरकत नाहीं.

## राष्ट्रीय आघाडींतून 'लाल म्यूनिक'

झेकोस्लोव्हाकियांतील राष्ट्रीय आघाडीची शोककथा ह्याच नमुन्याची असली तरी राजकीय दृष्ट्या महत्त्वाची आहे. नॅशनल सोशॅलिस्ट, सोशल डेमोक्रॅट, कम्युनिस्ट, पॉप्युलिस्ट इत्यादि अनेक पक्षांचें सरकार बनलें असलें, तरी कम्युनिस्ट पक्षाचा सूत्रधार गोटवॉल्ड हा पोलिसमंत्री व मुख्यमंत्री होता. तथापि, झेकोस्लोव्हाकियांत लोकशाही-परंपरा बद्धमूल झालेल्या होत्या व त्या लोकशाहीला बेनेस व मसारिक ह्यांच्यासारखे नेते लाभले होते. तेव्हां झेकोस्लोव्हाकियांत केवळ झेक कम्युनिस्ट पक्षाला बहुमत आपल्या बाजूला करून घेणें ही गोष्ट सोपी नव्हती. ही गोष्ट ओळखूनच स्टालिननें झेक राष्ट्रीय सरकारला मार्शल योजनेमध्यें भाग घेण्यास बंदी केली. दरम्यान झेक कम्युनिस्ट पक्षानें सोशल डेमोक्रॅट पक्षांतील फीरलिजरचा लहान गट आपल्या बाजूला मिळविला. गोटवॉल्डनें त्याचबरोबर झेक व स्लोव्हाक ह्यांच्यामधील राष्ट्रीय वैमनस्य वाढविण्याचाही प्रयत्न करून पाहिला. पोलिसखातें ताब्यांत असल्याकारणानें पोलिसदलाची आपल्या पक्षाच्या अनुकूल अशी रचना त्यानें केली आणि विरुद्ध पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांच्या धरपकडीचें सत्र सुरू केलें. प्रसिद्धिखातेंही कम्युनिस्टांच्या ताब्यांत असल्याकारणानें इतर पक्षांची बदनामी करण्याचा सपाटा सुरूं केला. त्याचबरोबर नॅशनल सोशॅलिस्ट पक्षाच्या कांहीं मंत्र्यांचा खून करण्याचाही प्रयत्न करण्यांत आला. त्याबरोबर न्यायखातें कम्युनिस्टांच्या ताब्यांत नसल्याकारणानें ह्या सर्व प्रकाराची चौकशी पोलिसखात्यानें करावी आणि न्यायखात्याला अहवाल सादर करावा, असा ठराव त्या खात्याच्या मंत्र्यांनीं मंत्रिमंडळांत आणला व तो मंत्रिमंडळाच्या बैठकींत संमतही झाला. संयुक्त मंत्रिमंडळ व लोकमत आपल्या बाजूस येणें कठीण आहे आणि १९४८ च्या फेब्रुआरीअखेर होणाऱ्या निवडणुकींत आपणांस बहुमत मिळण्याची शक्यता नाहीं असें दिसून आल्यानंतर, निवडणुका होण्यापूर्वी सत्ता काबीज करण्याचें कारस्थान कम्युनिस्टांनीं रचलें. रशियाचा पाठिंबा व मंत्रिमंडळांत कम्युनिस्टांची दांडगाई ह्या कारणांमुळें आपण ह्या संयुक्त मंत्रिमंडळांत ह्यापुढें राहिल्यास लोकांची दिशाभूल होईल व कम्युनिस्टांच्या कारवायांचें स्वरूप उघड होणार नाहीं ह्या हेतूनें बारा मंत्र्यांनीं राजीनामे देण्याचें ठरविलें. हे राजीनामे दिल्यानंतर झेकोस्लोव्हाकियाचे अध्यक्ष डॉ. बेनेस ह्यांनीं अशी स्पष्ट भूमिका घेतली कीं गोटवॉल्डनें जीं नांवें सुचविलीं त्या लोकांचें मंत्रिमंडळ बनविण्यास

मी संमति देणार नाहीं. ज्या पक्षांच्या मंत्र्यांनीं राजीनामे दिले त्या पक्षांशीं तडजोड करून गोटवॉल्ड सर्वपक्षीय मंत्रिमंडळ बनवील तरच मी त्याला संमति देईन.

" I won't be an accomplice of the Communists " हे डॉ. बेनेस ह्यांचे बाणेदार उद्गार आहेत. अर्थात कम्युनिस्टांचा ह्यापुढचा मार्ग स्पष्ट होता. लोकमताला कौल लावून सत्ता हस्तगत करण्यापेक्षां सत्ता प्रथम हस्तगत करून मगच लोकमताला कौल लावावा हाच तो मार्ग होय. रशियन लष्कराच्या मदतीनें झेक कम्युनिस्टांनीं तेंच केलें. डॉ. बेनेस ह्यांची नव्या मंत्रिमंडळाला कशी संमति मिळविली गेली, हें अद्यापि एक गूढच राहिलें आहे.

(' We were never to see Benes again; never again did we receive any message from him. To this moment we have never been able to find out what happened in the Hradcany during that fatal morning of February 1948; and no explanation which has seemed valid to us has ever been given on that subject. " Czechoslovakia enslaver, Page 294 )

पण झेकोस्लोव्हाकियांत कम्युनिस्टांच्या तथाकथित क्रांतीची, मसारिकची आत्महत्या व डॉ. बेनेस ह्यांचा वनवास हीं दोन विषारी फळें आहेत. ज्या राष्ट्रीय आघाडींतून आपल्या देशांत लोकशाही बद्धमूल होईल अशी झेक जनतेची अपेक्षा होती त्या राष्ट्रीय आघाडींतून अखेर ' लाल म्यूनिक ' झेक जनतेच्या नशिबीं आलें.

## कम्युनिस्टांचा प्रकृतिधर्म

संयुक्त आघाडीच्या नांवाखालीं कम्युनिस्ट आपल्या पक्षीय राजकारणाचें घोडें पुढें कसें दामटतात, इतर पक्षांत फोडाफोड करण्याचें त्यांचें तंत्र कोणत्या स्वरूपाचें आहे इत्यादि गोष्टींची यथार्थ कल्पना यावी म्हणून ह्या युद्धानंतर कम्युनिस्टांनीं ज्या देशांत संयुक्त आघाडीचें राजकारण केलें, त्या देशांतील राजकारणाचा गोषवारा मी थोडक्यांत दिला आहे.

जागतिक राजकारणांतील संयुक्त आघाडीच्या ह्या इतिहासाची येथें समितीच्या राजकारणांत तंतोतंत पुनरावृत्ति होईल असें मला म्हणावयाचें नाहीं. पण कम्युनिस्टांचा राजकीय प्रकृतिधर्म कशा प्रकारचा आहे ह्याची ह्या इतिहासावरून कल्पना यावयास हरकत नाहीं. **कम्युनिस्ट हा प्रथम कम्युनिस्ट असतो आणि मग तो इतर कांहीं बनतो. आणि ती जी कांही अन्य उपाधी तो स्वीकारील, तीदेखील त्याच्या पक्षाला उपकारक ठरण्याचा संभव असेल तरच तो स्वीकारील, एरव्हीं नाहीं. दुसरी गोष्ट, भारतीय कम्युनिस्ट हे प्रामुख्यानें कम्युनिस्ट आहेत, नंतर ते भारतीय आहेत.** समाजवादी पक्षही

आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहेत. परंतु देशोदेशींच्या समाजवादी पक्षांचें कम्युनिस्टांइतकें केंद्रीकरण झालेलें नाहीं. एक जागतिक केंद्र, एक श्रद्धास्थान व एक आदेश हीं जीं जुन्या धर्मपंथाचीं लक्षणें आहेत तीं कम्युनिस्टांखेरीज इतर कोणात्याही आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान स्वीकारणाऱ्या पक्षाजवळ आढळत नाहींत. म्हणून जगांतील इतर देशांत कम्युनिस्टांनीं स्थापन केलेल्या व नंतर नष्ट केलेल्या संयुक्त आघाडीचा दाखला आपणांस ह्या देशांतही विशेषेंकरून विचारांत घेतला पाहिजे. पूर्व युरोपप्रमाणें ह्या देशांत कम्युनिस्ट सत्तेच्या समीप आलेले नाहींत आणि रशियाचें राजनैतिक बळ त्यांना येथें तितक्या प्रमाणांत कामीं पडेल असेंही नाहीं. त्यामुळें समितीच्या राजकारणामध्यें कम्युनिस्टांना पूर्व युरोपसारखा रुद्रावतार धारण करतां येईल किंवा इतर पक्षांवर त्या प्रमाणांत प्रखर हल्ले चढवितां येतील, असा संभव कमी दिसतो. परंतु समितीच्या राजकारणांत मोक्याच्या जागा स्वतःच्या हातीं ठेवण्यासाठीं त्यांची एकसारखी धडपड चालू असणार अथवा राहाणार ही गोष्ट निर्विवाद होय.

## कम्युनिस्टांच्या प्रभुत्वाचा परिघ वाढला

मुंबई विधानसभेंत विरोधी पक्षांचें पक्षवार बल विचारांत घेतलें तर ह्या संयुक्त आघाडीचा कम्युनिस्टांना फायदा घेतां येईल काय आणि घेतां आल्यास तो किती प्रमाणांत घेतां येईल ह्याचा थोडाबहुत उलगडा होऊं शकेल. पक्षवार बल पुढीलप्रमाणें आहे. प्रजासमाजवादी ३६, शेतकरी कामकरी पक्ष ३१, कम्युनिस्ट १८, जनसंघ ४, हिंदुसभा १, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन १५ आणि स्वतंत्र ५५. एकूण १५९ जागांपैकीं ५५ स्वतंत्र उमेदवार वगळले तर उरलेल्या १०४ सभासदांपैकीं समाजवादी व जनसंघ मिळून ४० सभासद होतात आणि शेतकरी कामकरी, शेड्यूल्ड कास्ट व कम्युनिस्ट ह्यांची संख्या ६४ भरते. शे. का. प. व शे. का. फे. हे आज स्वतंत्र पक्ष आहेत; पण ह्या पक्षांशीं आपलेच घनिष्ठ संबंध प्रस्थापित होतील अशी कम्युनिस्ट मनाशीं आशा बाळगून आहेत आणि ह्या दोन पक्षांची सध्यांचीं धोरणें व तोरणें पाहातां ती आशा अगदींच अस्थानीं नाहीं, हें सत्य लपविण्यांत हंशील नाहीं. उरलेले स्वतंत्र सभासद हें तर मोकळें मैदानच आहे आणि ह्या मैदानांत राजकीय मर्दुमकी गाजविण्यामध्यें आपण कोणाला हार जाणार नाहीं, असा कम्युनिस्टांना आत्मविश्वास वाटत असला पाहिजे. निःपक्षपाती दृष्टीनें विचार करतां सध्यां समितीच्या राजकारणांत कम्युनिस्टांचें पारडें जड आहे, हें कोणासही आढळून येईल. कम्युनिस्टांची संख्या कमी असली तरी केवळ संख्येवर बलाबल ठरवितां येणार नाहीं. त्यांच्या प्रभुत्वाचा परिघ वाढला आहे कीं नाहीं हाही विचार लक्षांत घ्यावयास हवा. आणि तो विचार लक्षांत घेतला तर परिघ वाढला आहे अशी जाणीव झाल्याशिवाय राहात नाहीं.

ह्या सर्व स्वतंत्र पक्षांचें अस्तित्व नष्ट करून समितीचा एक स्वतंत्र राजकीय पक्ष बनवावा असा बूट अलीकडे निघाला आहे. विधानसभा व लोकसभा ह्यांतील सभासदांचें एक नियामक मंडळ, समितीचें स्वतंत्र सभासदत्व, घटनासमितीची नेमणूक अशीं कांहीं पावलें त्या दिशेनें पडूं लागलीं आहेत. **पण समितीचा स्वतंत्र पक्ष काढण्याची ही कल्पना कम्युनिस्टांच्या जितकी पथ्यावर पडेल तितकी इतर पक्षांना मानवणार नाहीं. किंबहुना, इतर सर्व पक्षांचें विलीनीकरण करण्यासाठीं पूर्व जर्मनी व पूर्व यूरोप येथील कम्युनिस्टांना जी यातायात करावी लागली, ती यातायात न करतां विनासायास विलीनीकरणाचें फळ पदरांत पडत असेल, तर तें गमावण्याइतकें कम्युनिस्ट खासच मूर्ख नाहींत. कारण सर्व पक्षांच्या ह्या विलीनीकरणामध्यें कम्युनिस्ट सामील झाले तरी ते स्वत: विलीन होत नाहींत, इतरांना स्वत:मध्यें विलीन करून घेतात हा इतर ठिकाणचा अनुभव दुर्लक्ष करण्यासारखा नाहीं.** कम्युनिस्टांच्या राजकारणामध्यें संयुक्त महाराष्ट्र ही एक नैमित्तिक उपाधी आहे. इतरांशीं एकरूप होतांना आपलें 'कम्युनिस्टत्व' ते कधींही सोडीत नाहींत. इतर पक्षाशीं सख्य करतांना त्या पक्षाचें बळ कमी कसें करतां येईल एवढी एकच दृष्टि ते बाळगतात. साधनशुचिता त्यांच्या गांवीं नाहीं. त्यांच्या तत्त्वज्ञानानें त्यांच्या ठिकाणीं जो धर्मवेडेपणा निर्माण केलेला आहे त्यामुळें ते दीर्घकाळपर्यंत वाट पाहूं शकतात, झगडूं शकतात आणि अपयश आलें तरी नामोहरम होत नाहींत. ह्या सर्व कारणांनीं समितींत सर्व पक्षांचें विलीनीकरण झालें तर तें त्यांना हवें आहे. प्रजासमाजवादी, जनसंघ, संयुक्त महाराष्ट्रवादी कॉंग्रेसजन, ह्या पक्षांना ह्या विलीनीकरणाचा कोणत्याही प्रकारें फायदा मिळणार नाहीं.

## अंतर्गत विभागलेला विरोध

समितीला ह्यापुढें घटनात्मक विरोधी पक्षाची भूमिका करावी लागणार आहे. संसदीय लोकशाही आपणांस जोंपर्यंत राबवावयाची आहे तोंपर्यंत अधिकारारूढ पक्षाला तितकाच प्रबळ विरोधीपक्ष हवा. त्या दृष्टीनें विरोधकांची संख्या वाढली ही एक आशादायक गोष्ट सत्ताधारी पक्षानें मानली पाहिजे. एक गामा कल्लू व दुसरे बालामृताच्या जाहिरातींतील काडी पेहेलवान, ही पक्षविभागणी लोकशाहीच्या स्थैर्याला उपयुक्त नाहीं. पण लोकशाही–स्थैर्याच्याच दृष्टीनें विचार केला तर आजच्या विरोधी बाजूचें संख्याबळ वाढूनही त्याबद्दल आशा बाळगतां येत नाहीं. कारण हा अंतर्गत विभागलेला विरोध आहे. महागुजरात जनता परिषदेची भूमिका आतां स्पष्ट झालेली आहे आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या समितीशीं परिषदेचा मुख्य मुद्द्याबाबतच मतभेद होण्याचा संभव वाढला आहे. त्यामुळें आमनेसामने लढाई विधिमंडळांत खेळत असतांना पिछाडीला किंवा बाजूला झुंबड उडणें विरोधी पक्षाला फायदेशीर ठरणार नाहीं. म्हणजेच विरोधकाचा आवाजही एकमुखी असावा लागतो. त्यांचीं मनें व धोरणें वेगळीं असलीं तर तें

वेगळेपणही स्पष्ट व्हावें लागतें. समितीच्या वैध राजकारणांत हें दौर्बल्य जाणवणार आहे. एकजूट विशिष्ट प्रयोजनानें होत असते आणि तें प्रयोजन केवळ निवडणूक लढण्यापुरतें असून चालत नाहीं, सनदशीर राजकारणालाही तें लागूं पडलें पाहिजे. संयुक्त महाराष्ट्र समितीची निर्मिती विरोधांत झाली आहे आणि तो विरोध एका विशिष्ट मागणीपुरता आहे. विधिमंडळाचें क्षेत्र त्यापेक्षां व्यापक आहे. त्या व्यापक क्षेत्राला व्यापणारा समितीचा विरोध नाहीं. ज्या एका मुद्द्यापुरता विरोध आहे तेथेंदेखील समिति व जनता परिषद ह्यांचें पटेलच असें नाहीं.

## भावना-प्रक्षोभाचें साधन

समितीचे उमेदवार विधानसभेंत तर निवडून आले. त्यांचा पुढील कार्यक्रम काय राहील ह्याविषयीं समितीचेच नेते अंधारांत चांचपडत असावेत असें वाटतें. समाजवाद, श्रमदान, खेडेगांवांची सुधारणा अशा अनेक कथा आज सांगितल्या जात आहेत. पण मुद्दा आहे संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा. त्या अभिवचनावर समिति निवडून आलेली आहे. विधानसभेच्या आवारापुरतेंच समितीकरण मर्यादित राहिलें तर समितीला विरोधी भाषणें करण्यापलीकडे कांहींही करतां येण्याजोगें नाहीं. समितीचें बळ त्यामुळें कमी होण्याचा संभव आहे. ज्या भावनाप्रक्षोभाच्या सामर्थ्यावर हा विजय मिळाला तो भावनाप्रक्षोभ घटनात्मक राजकारणानें सतत टिकणार नाहीं. मग भावना तापत ठेवण्याची कोशीस करणें भाग पडेल. जखम बरी होण्यापेक्षां ती एकसारखी वाहात कशी राहील, हा राजकारणाचा मध्यबिंदु केल्याखेरीज समितीला आपलें राजकीय प्रभुत्व टिकविणें कठीण जाणार आहे. आणि ह्या कलेंत कम्युनिस्टांचा हात धरणारा कोणी नाहीं. भावनाप्रक्षोभांत इतर पक्ष वाहून जाण्याचा संभव आहे. कम्युनिस्टांचें तसें नाहीं. नाणावलेला सर्जन जितक्या निर्विकारतेनें म्हणजेच निर्दयतेनें शस्त्रक्रिया करतो तितक्या निर्विकारतेनें कम्युनिस्ट लोकभावनाशीं समरस न होतां, त्या तापवूं शकतात. ह्या दृष्टीनेंही विलीनीकरण त्यांच्या पथ्यावरच पडणार आहे. **भावनाप्रक्षोभ एका विशिष्ट उष्णतामानावर सतत टिकला तर जो कोणी समितीमधून बाहेर पडेल तो राजकीयदृष्ट्या नाश पावेल हें त्यांनीं पक्कें हेरलें आहे आणि आपणांस नको असलेल्या लोकांना आंतून चिमटे काढून किंवा वेळ आलीच तर धक्के मारून बाहेर कसें ढकलावें, ही कलाही त्यांना चांगलीच अवगत आहे. ' आशा कालवतीं दद्यात् कालं विघ्नेन योजयेत् ' ह्या कणिकनीतींत त्यांचा हात धरणारा कोणी नाहीं.**

## लोकशाहीचें मर्मस्थान

आज केरळांतील विजयामुळें कम्युनिस्टांच्या आशा प्रज्वलित झालेल्या आहेत. संख्येनें कमी असलों तरी देशासमोर कॉंग्रेस कीं कम्युनिस्ट असाच सवाल निर्माण

करण्याइतपत आपलें सामर्थ्य वाढल्याचा अहंकार त्यांच्या ठिकाणीं निर्माण झालेला आहे. समितीच्या राजकारणांत त्यांनीं काय मिळविलें ? महाराष्ट्रांतील सुशिक्षित मध्यम-वर्गाची सहानुभूति. इतके दिवस त्यांना ही सहानुभूति मिळत नव्हती. ह्या निवडणुकींत मीं असें पाहिलें आहे कीं कम्युनिझमचा कट्टर द्वेष करणारे हिंदुत्वनिष्ठही कम्युनिस्टां-बद्दल गौरवोद्गार काढूं लागले आहेत. ह्या उद्गारामागें आत्यंतिक निराशा असेल, अविवेक असेल किंवा आत्यंतिक चीड असेल. कोणत्याही कारणानें असो, सुशिक्षितांची लोकशाहीवरील श्रद्धा अशा प्रकारें डळमळीत व्हावी हें लक्षण कांहीं ठीक नाहीं. ह्यांत कम्युनिस्टांचा विजय असेल, पण लोकशाहीचा नाश ठेवलेला आहे. मार्क्सनें ' लंपन् प्रॉलिटारियट् ' असा एक वर्ग कल्पिला होता. महाराष्ट्रांतील सुशिक्षितांची सध्यांची मनःस्थिति लक्षांत घेतल्यास त्यांच्यासाठीं ' लंपन् इंटेलिजेन्शिया ' असा एक नवा वर्ग निर्माण करावा लागेल. लोकशाहीचें हें मर्मस्थान आणि कम्युनिस्टांचें तेंच बलस्थान. समितीचें राजकारण कम्युनिस्टांच्या फायद्याचें ठरणार आहे तें ह्या अर्थानें.

भाषावार राज्यरचनेच्या प्रश्नानें देशामध्यें आणि विशेषतः महाराष्ट्रामध्यें अस्थिर राजकारण निर्माण केलें आहे. आर्थिक विकास, सामाजिक सुधारणा, सांस्कृतिक प्रगति ह्या ज्या राजकारणांतील स्थिर प्रेरणा त्यांचें महत्त्व कमी झालें असून, भावनाप्रक्षोभाचे राजकारणाला हेलकावे बसत आहेत. स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वी हें राजकारण ठीक होतें. रान पेटविणें किंवा उठविणें ह्याखेरीज लोक कांहीं करूं शकत नव्हतें. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, घटनात्मक राजकारणाचीं चौकट तयार झाल्यानंतर, राजकारण ह्यापेक्षां अधिक प्रौढ व्हावयास हवें होतें. भाषिक प्रश्नानें निर्माण झालेला त्वेष व द्वेष आपल्या राजकारणांचा लंबक परत पूर्वस्थळावर नेऊं पाहात आहेत. म्हणून समितीच्या राजकीय भूमिकेशीं मी समरस होऊं शकत नाहीं. अन्याय झाला तर दूर करून घेण्यासाठीं प्रयत्न करावा हें ठीक आहे. परंतु ह्या प्रयत्ना-मधून द्वेष व असहिष्णुता हींच रत्नें बाहेर पडूं लागलीं आणि लोकशाही मूल्यांना स्थान उरलें नाहीं तर अन्याय दूर किती प्रमाणांत होऊं शकेल ह्याविषयीं साशंकता निर्माण होतेंच होतें, पण त्यांतून अराजकता निर्माण होण्याचाही धोका असतो. आणि ह्या अराज-काचा फायदा घेणाऱ्या विध्वंसक शक्ति टपून बसलेल्या आहेत. भाषिक प्रश्नांत जसा एक स्थिर विचार आहे, तसाच दाहक विखारही आहे. अन्यायाचा प्रतिकार करण्याची भावना समाजांत नेहमीं असावी लागते. पण लोकशाही समाजांत त्या प्रतिकाराला कांहीं वैध मर्यादाही पडतात आणि त्या मर्यादा उल्लंघून प्रतिकार होऊं लागला, तर समाजांत अराजकता निर्माण होण्याचा धोका असतो.

## प्रकरण नववें

# उपसंहार : ध्येय-सिद्धीचा मार्ग

कोणतेंही घटकराज्य एकदम आभाळांतून पडत नाहीं. गत इतिहासांत त्याची पूर्वतयारी होत असते. मुंबईची तयारी मात्र ह्याच्या उलट दिशेनें होत गेली. लोकमान्य असेपर्यंत ह्या शहराचे महाराष्ट्राशीं राजकीय संबंध फार जिव्हाळयाचे होते ह्यांत कांहींच शंका नाहीं.

लोकमान्यांचा चौपाटीवरील पुतळा ह्याची एक सनातन साक्ष आहे. पण लोकमान्यांच्या पश्चात् हें शहर महाराष्ट्रापासून वेगळें पडत होतें किंवा वेगळें पाडलें जात होतें ही गोष्टही तितकीच सत्य आहे. ह्या शहरांत होणारी महाराष्ट्रीय कामगारांची आवकजावक ही कांहीं महाराष्ट्राशीं ह्या शहराचा राजकीय संबंध असल्याची खूण नाहीं. ह्या शहराचा महाराष्ट्राशीं वैचारिक संबंध किती राहिला, ह्या शहराच्या आंतरराष्ट्रीय व औद्योगिक जीवनामध्यें महाराष्ट्रीयांना कोणतें स्थान होतें, ह्या शहराच्या राजकीय जीवनावर महाराष्ट्रीयांनीं आपली छाप पाडली काय, ह्या प्रश्नांचीं जीं कांहीं उत्तरें येतील त्यावर मुंबई महाराष्ट्राला मिळविण्यासाठीं महाराष्ट्रानें कोणते प्रयत्न केले, ह्या प्रश्नाचें उत्तर अवलंबून राहील. आणि तीं उत्तरें फारशीं आशादायक येणार नाहींत. महाराष्ट्रांतील नेत्यांनीं आपण होऊन, अक्कलहुशारीनें व राजीखुषीनें परवापर्यंत ठाण्याची सरहद्द मान्य केली होती. त्यांच्या राजकीय प्रभुत्वाचा पसारा पुणें ते ठाणें येथपर्यंतच पसरलेला होता. मुंबईत आले कीं आपण एखाद्या परक्या प्रांतांत आलों आहोंत, ह्या भावनेनेंच ते ह्या शहरांत वागत असत. ह्या शहरावर आपली बौद्धिक छाप पाडण्याइतकी त्यांच्या अंगांत कुवतही नसेल. पण परिणाम झाला तो हा कीं व्यवहारतः मुंबई महाराष्ट्रापासून दुरावली. महाराष्ट्रीयांनीं आपण होऊन ही चूक केलेली आहे.

### महाराष्ट्रीयांचें अदूरदर्शित्व

ह्या शहरांतील महाराष्ट्रीयांची तरी काय स्थिति आहे ? महाराष्ट्रीय एवढ्या मोठ्या संख्येनें ह्या शहरांत वास्तव्य करीत असतांना, ह्या शहरांतील बौद्धिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनामध्यें व संस्थांमध्यें त्यांना कांहीं महत्त्वाचें स्थान प्राप्त करून घेतां आलें काय ? नाहीं असेंच ह्या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागतें. ह्या शहरांतही महाराष्ट्रीयांच्या राजकीय व सामाजिक संस्था आहेत. पण एखाद्या अल्पसंख्य जमातीप्रमाणें त्या केवळ

महाराष्ट्रीयांपुरत्याच मर्यादित आहेत. त्या पलीकडे महाराष्ट्रीयांनीं आपली झेंप टाकलीच नाहीं. ह्या शहरांतील विद्यापीठ, नगरपालिका, रॉयल एशियाटिक सोसायटीसारख्या मान्यवर संस्था इत्यादिकांमध्यें महाराष्ट्रीय नेतृत्वाची चमक दिसून आली नाहीं. ह्या शहराला जें एक आंतरराष्ट्रीय जीवन प्राप्त झालें आहे त्यांतही महाराष्ट्रीय पुढाकार घेतात असें आढळून येत नाहीं. ह्या शहरांत जे महाराष्ट्रीयेतर सुविद्य व पुढारलेले समाज आहेत त्या समाजांशीं महाराष्ट्रीयांचें वैचारिक दळणवळण आहे, असेंही आढळून येत नाहीं. सारांश, हें शहर महाराष्ट्राचें आहे ही गोष्ट नजरेंत भरण्यासाठीं, भौगोलिक कारणाखेरीज ज्या कांहीं इतर गोष्टी आवश्यक आहेत त्यापैकीं एकाही गोष्टीकडे ह्या शहरांतील महाराष्ट्रीयांनीं अथवा महाराष्ट्रीय नेत्यांनीं दूरदर्शित्वानें नजर पुरविली नाहीं, हें सत्य प्रांजलपणें आपण मान्य करावयास हवें.

ह्या शहरांतील महाराष्ट्रीय समाजामध्यें प्रामुख्यानें कामगार व कचेरींत काम करणाऱ्या लोकांचा भरणा आहे. कामगार वर्ग आतांपर्यंत लाल निशाणाखालींच वावरत होता. त्याचें राजकीय क्षेत्र अगदीं स्वतंत्र होतें. महाराष्ट्रांतील कामगारांच्या राजकारणाशींही ते समरस झाले नव्हते. उरला महाराष्ट्रीय सुशिक्षितांचा वर्ग. ह्या शहरांतील ह्या वर्गानें नोकऱ्या संपादन करण्यापलीकडे ह्या शहराच्या सार्वजनिक जीवनामध्यें कोणत्याही प्रकारची भर घातलेली नाहीं. ह्या शहरांतील महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गामध्यें कांहीं लोक सुस्थितींत आहेत ही गोष्ट खरी आहे. पण आर्थिक सुस्थिति आणि वैचारिक नेतृत्व ह्यामध्यें समप्रमाण असतेंच असें नाहीं. ऐन उमेदीचीं पंचवीस तीस वर्षें नोकरी करावी आणि सेवानिवृत्तीचा काळ आला कीं पुणें मुक्कामीं बंगला बांधून ऊर्वरित काळ घालवावा, असल्या उपऱ्या मनोवृत्तीनें राहाणारे लोक ह्या नगरीवर महाराष्ट्रीयत्वाचा झेंडा कसा फडकविणार ? ह्या शहरांतील महाराष्ट्रीय बुद्धिमंतांचा वर्ग अशा रीतीनें ह्या शहरांत राहून ह्या शहराच्या जीवनापासून अलग पडलेला आहे. संयुक्त महाराष्ट्राची घोषणा करणारांनीं ह्याही गोष्टीची दखल घेतली पाहिजे. ह्या शहरांत महाराष्ट्रीयांच्या अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्था आहेत. शिक्षक, डॉक्टर, वकील, प्राध्यापक, साहित्यिक व कलावंतही बहुत आहेत. पण स्वतःच्या संकुचित घरकुलांतून बाहेर पडून ह्या नगरीच्या व्यापक जीवनाशीं ते समरस झाले आहेत, असें दृश्य दिसत नाहीं.

## मुत्सद्देगिरीचा अभाव

ह्यासाठीं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र सिद्ध व्हावा एतदर्थ रा. पु. कमिशन नेमलें गेलें त्या वेळीं महाराष्ट्रीयांनीं प्रयत्न करावयास हवा होता. महाराष्ट्रीय नेत्यांनीं त्या वेळीं संयुक्त महाराष्ट्र परिषद् स्थापन केली. पण ह्या शहरांतील बिगर महाराष्ट्रीय

समाजांतील मान्यवर नेत्यांची सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न केला नाहीं. वास्तविक अशी सहानुभूति मिळविणें कठीण होतें काय? मुळींच नाहीं. परंतु महाराष्ट्रीयांनीं महाराष्ट्रीयांना, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, असें सांगून उपयोग काय? तें तर महाराष्ट्रीयांनीं गृहीतच धरलेलें आहे. कमिशनसमोर ह्या शहरांतील बिगर-महाराष्ट्रीय समाज मुंबई महाराष्ट्रांत सामील होण्यास अनुकूल नाहीं, हें जें दाखविण्यांत आलें तें खोडून काढण्याचा प्रयत्न महाराष्ट्रीय नेत्यांनीं त्या वेळीं करावयास हवा होता. विदर्भ, मराठवाडा ह्यांचा महाराष्ट्राशीं संयोग व्हावा ह्यासाठीं जितकीं खटपट करणें आवश्यक होतें, त्यापेक्षां मुंबई महाराष्ट्राशीं संलग्न व्हावी ह्यासाठीं खटपट करणें आवश्यक होतें. महाराष्ट्रांत मुंबईचा समावेश होऊं नये ह्यासाठीं कमिशनसमोर मुंबई स्वतंत्र असावी ह्या मताचा गट कोणत्या प्रकारें बाजू सजवील हें ओळखून, ह्या शहरांतील व शहराबाहेरचे महाराष्ट्रीयच नव्हेत, तर महाराष्ट्रीयेतर समाजही आपल्या बाजूस आहे, असें सिद्ध करण्याची जबाबदारी परिषदेच्या नेत्यांवर होती. ह्यामुळें संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कैफियतीला जितकें वजन प्राप्त झालें असतें त्यापेक्षां परिषदेबरोबर बिगर महाराष्ट्रीय समाजाचीं सम्मतिदर्शक कैफियत सादर केली गेली असती तर तिला अधिक वजन प्राप्त झालें असतें. त्याऐवजीं धनिक वि. श्रमिक, भांडवलदार वि. कामगार असें वर्गलढ्याचें शिंग फुंकून, परिषदेनें महाराष्ट्रीयेतर समाज आपल्यापासून आणखी दोन हात दूर सारला. मुत्सद्देगिरीच्या अभावीं महाराष्ट्राला हार खावी लागली. अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ राजकीय दांडगाई करून निर्णय बदलतां येणार नाहीं, हें महाराष्ट्रांतील सुशिक्षितांनीं ओळखण्याची गरज आहे.

## प्रथम संकेतानें मुंबई मिळवा

तेव्हां मला असें वाटतें कीं संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य व्हावें असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं लोकशाही मार्गानींच प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. श्री. डांगे ह्यांनीं लोकसभेंत वापरलेली धमकीची भाषा हा संयुक्त महाराष्ट्र सिद्ध करण्याचा मार्ग नव्हे. महाराष्ट्रीय जनता ह्या मार्गानें गेली तर संयुक्त महाराष्ट्र सिद्ध होईल कीं नाहीं हें अनिर्णीतच राहील, पण त्या मार्गामुळें लोकशाही मूल्यें मात्र पार नष्ट होतील. होय, महाराष्ट्रावर अन्याय झालेला आहे हें तर खरेंच. पण हा अन्याय नाहींसा करण्यासाठीं अन्याय्य मार्गानें जाण्यांत आपण काय साधणार? महाराष्ट्राला विधायक दिशेनें कांहीं प्रयत्नही करावे लागतील. उदाहरणार्थ, अद्यापि महाराष्ट्रीयांचें मुंबई हें मुख्य केंद्र बनलेलें नाहीं. परवाचें साहित्यसंमेलन घ्या. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर तें संमेलन गाजलें असें संमेलनाभिमानी लोक म्हणतात. परंतु मराठी साहित्य परिषदेचा मुक्काम अद्यापि पुणें

शहरांतून हलत नाहीं किंवा ह्या शहराच्या व्यापक जीवनाशीं समरस होण्याइतकी झेंपही ह्या परिषदेच्या सूत्रचालकांपाशीं नाहीं. श्री. डांगे हे कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी आहेत. ह्या शहराच्या बौद्धिक व सांस्कृतिक जीवनावर त्यांची छाप कधींही पडलेली नाहीं. एस्. एम्. जोशी ह्यांचा तळ पुणें मुक्कामींच आहे. अशा प्रकारें इतस्ततः सैरावैरा धावून ह्या शहरावर आपला हक्क प्रस्थापित होणार नाहीं. हें शहर भावी संयुक्त महाराष्ट्राची राजधानी अशी आपली श्रद्धा आहे ना ? मग ह्या शहरांतच आपल्या सर्व प्रकारच्या सार्वजनिक जीवनाचें केंद्रस्थान निर्माण करण्याची जबाबदारी आपणावर येऊन पडते कीं नाहीं ? कायद्यानें मुंबई मिळण्यापूर्वी संकेतानें आपण प्रथम मुंबई मिळविली पाहिजे. संकेत सिद्ध झाला कीं कायदा आपोआप मागें येत असतो. मी असें मानणारा आहे कीं अखिल भारतीय राजकारणांतील विशिष्ट गटांनीं आपले हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठीं मुंबई स्वतंत्र राखण्याची खटपट केली हें जितकें खरें आहे, तितकेंच महाराष्ट्राच्या नेत्यांनीं ह्या शहराविषयीं अनास्था व औदासीन्य दाखविलें हेंही खरें आहे. अखिल भारतीय नेत्यांना मुंबई महाराष्ट्राला द्यावी असें वाटलें नाहीं, असा आरोप करणारांनीं, महाराष्ट्राला मुंबई दिलीच पाहिजे असें त्या नेत्यांना वाटण्याइतपत महाराष्ट्रीय नेत्यांनीं आपली छाप पाडली नाहीं, ही सत्याची दुसरी बाजूही प्रांजलपणें मान्य करावयास हवी.

## ध्येयसिद्धीचा मार्ग

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा अशा सारासार पद्धतीनें विचार केला असतां महाराष्ट्राचें मागणें मिळवूं इच्छिणारांनीं कोणता मार्ग अवलंबावा हेंही आपोआप स्पष्ट होतें. पण सूत्ररूपानें त्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करतों :–

( १ ) समितीच्या निशाणाखालीं जो विरोधी गट तयार झालेला आहे तो जर लोकशाही पद्धतीचा विरोध करील तर त्या विरोधाचें स्वागतच होईल. विधानसभेंत होणारा विरोध लोकशाही विरोध व कम्युनिस्ट छापाचा विरोध (Democratic opposition and Communist opposition) असा दोन प्रकारचा असूं शकतो. कम्युनिस्ट छाप विरोध कसा असेल ह्याची कल्पना श्री. डांगे ह्यांनीं लोकसभेंत जें रणशिंग फुंकलें त्यावरून येऊं शकेल. संसदीय व संसदविरोधी असें परस्परविरोधी दोन्ही मार्ग अवलंबिण्याचा हा कम्युनिस्टी खाक्या त्या पक्षाला खोगीरभरती करण्यास उपयोगी पडेल. पण लोकांच्या भावना भडकवून संसदीय लोकशाही मात्र त्यामुळें सुस्थिर होणार नाहीं. ह्याच्या उलट अधिकारारूढ पक्षाच्या ध्येय, धोरण व कार्यक्रमावर विधायक टीका करून त्या पक्षाला आपलें म्हणणें मान्य करावयास लावणें हा लोकशाही स्वरूपाचा विरोधही समितीला करतां येण्यासारखा आहे. विरोधकांचें संख्याबळ वाढलें ह्याचा

अर्थ सत्ताधारी पक्षावर अंकुश प्रभावी रीतीनें लावण्याची सोय झाली असा मी तरी करतों. 'थंपिंग मेजॉरिटी' असतांना मागील विधानसभेंत सत्ताधारी पक्षाजवळ जी बेगुमानी व अल्पसंतुष्टता होती ती ह्या खेपेस बऱ्याच प्रमाणांत कमी होईल, असें मानावयास हरकत नाहीं. परंतु त्याबरोबर समितीचा विरोधही लोकशाहीच्या चाकोरींतून गेला पाहिजे. विधानसभेचे सभागृह म्हणजे शिवाजी पार्कवरील सभा नव्हे ह्या जाणीवेनें विरोधक सरकारी धोरणांतील उणीवा व नेणीवा दाखविण्याचा प्रयत्न करतील तर महाराष्ट्रांत तरी सत्ताधारी पक्षाच्या तोडीचा विरोध निर्माण झाला असें मानतां येईल. समितीची खरी कसोटी विधानसभेंत आहे, विधानसभेबाहेर नाहीं. कायदा बदलून घेण्यांत आहे, कायदा मोडण्यांत नाहीं. जें महाद्विभाषिक जन्मास आलें तें कायदेशीररीत्या किती कृत्रिम स्वरूपाचें आहे असें सिद्ध करून दाखविण्यांत आहे, द्विभाषिक मोडलें पाहिजे अशा वल्गना करण्यांत नाहीं. कारण दोन भाषिक गटांत वैर निर्माण करणें हें विरोधाचें कार्य नाहीं. विरोधकांना लोकशाही हवी असेल तर दोन भाषिक गटांना आतां आपण सुखसमाधानानें एकमेकांचा निरोप घेतलेला बरा असें पटविणें, हेंच त्यांचें मुख्य कार्य असलें पाहिजे.

( २ ) पण हा निर्णय बदलून घेण्याचें मुख्य क्षेत्र म्हणजे लोकसभा. संयुक्त महाराष्ट्राच्या तिकिटावर निवडून गेलेले खासदार तेथें काय करूं शकतील ? इतर प्रांतांच्या प्रतिनिधींची सहानुभूति मिळविणें हेंच त्यांचें मुख्य कार्य राहील. श्री. डांगे ह्यांनीं दाखविलेली वीरश्री तेथें उपयोगी पडणार नाहीं. लोकसभेंतील विरोधक समंजस विरोध करतील तर महाराष्ट्राला इतर प्रांतांची सहानुभूति मिळविणें जड जाईल असें मला वाटत नाहीं. पण उठतां बसतां, संयुक्त महाराष्ट्राचें घटक राज्य निर्माण करा, नाहींतर लढा करूं, असा एकसारखा ठोका मारीत बसण्यानें सहानुभूति गमावण्याचा मात्र प्रसंग येईल. बाकीच्या लोकांना असें दिसलें पाहिजे कीं संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचें निमित्त करून एका विशिष्ट पक्षाचें घोडें पुढें दामटण्याचा हा एक डाव खेळला जात नसून, खरोखरीच महाराष्ट्राच्या न्याय्य आकांक्षा सफल करण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

## लोकमान्यांचा दंडक

( ३ ) संसदेच्या अंतर्गत हा प्रयत्न चालू असतांना महाराष्ट्रीयांनीं ह्या शहराच्या बौद्धिक जीवनांत पुढाकार घेण्याची खटपट केली पाहिजे. संप, मोर्चा, हरताळ हे हें शहर मिळविण्याचे मार्ग नव्हेत, हें मी फिरून एकवार ठामपणें सांगूं इच्छितों. आपली मनीषा फलद्रूप होण्यासाठीं आपलें व्यक्तिमत्वही तितकेंच उंचावलें गेलें पाहिजे. संकल्पाचें सिद्धींत रूपांतर करण्यापूर्वी संकल्प करणारानें संकल्प करण्याइतके आपण मोठे आहोंत

ना, ह्याचाही तलास घेतला पाहिजे. हा मार्ग दांडगाईचा नाहीं, चिकाटीचा आहे. ही जवळची पाऊलवाट नाहीं. ह्याला फार काळ सतत परिश्रम करीत राहाण्याची गरज आहे.

समितीच्या निशाणाखालीं गोळा झालेले विरोधक ही जबाबदारी पार पाडूं शकतील काय? मला शंका वाटते. महाद्विभाषिकाचा कारभार यशस्वी होण्याबाबत माझ्या जशा शंका आहेत, त्यापेक्षांही समितीच्या एकमुखी व लोकशाही विरोधाबद्दल अधिक मूलगामी शंका आहेत. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर आज काँग्रेस व समिती ह्यांमध्यें जो विरोध निर्माण झालेला आहे त्याला वैरभावाचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. लोकशाही विरोध व राजकीय शत्रुत्व ह्यांत महदंतर आहे. सत्ताधारी पक्षाच्या प्रामाणिक हेतूवर घाणेरडे आरोप करून सवंग लोकप्रियता संपादन करणें ह्याला लोकशाही विरोध म्हणत नाहींत. सत्ताधारी पक्षाच्या धोरणांत तार्किक विसंगति असेल, अथवा धोरण व वास्तवता ह्यांची फारकत झाली असेल, तर ती दाखविणें ह्याला लोकशाही विरोध म्हणतात. द्विभाषिक यशस्वी करूं अथवा महाराष्ट्र यशस्वी करूं ह्यांत एक प्रकारची सात्विक शर्यत सुरूं झाली आहे असें आपण कां मानूं नये? महाद्विभाषिकाचें पोट फाडून संयुक्त महाराष्ट्र आपणांस बाहेर काढावयाचा नाहीं. त्याचें सुईणपण करून तो मिळवावयाचा आहे. महाद्विभाषिकावर शस्त्रक्रिया करण्याचा हा प्रश्न नाहीं. संयुक्त महाराष्ट्राच्या कदाचित् ह्या प्रसूतिवेदना ठरण्याचाही संभव आहे. पण त्यासाठीं हातांत पडलें तें घ्यावें व पुढच्यासाठीं प्रयत्न करीत राहावें, हा लोकमान्यांनीं घालून दिलेला दंडक आपण मान्य केला पाहिजे.

## डोक्यांत राख घालणें अमान्य

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधीं मला जें सांगावयाचें होतें तें सांगून झालें. संयुक्त महाराष्ट्राचें घटक राज्य बनविण्यानें ह्या देशांत फार मोठा घोटाळा झाला असता, देशांत फुटीर वृत्ति बळावली असती किंवा राष्ट्रीय ऐक्याला तडा गेला असता ह्या ज्या कांहीं दंतकथा प्रसृत झाल्या होत्या त्यामध्यें तथ्यांश नाहीं.

संयुक्त महाराष्ट्राचें घटकराज्य बनविलें गेलें असतें तर महाराष्ट्रांतील सुशिक्षित मध्यमवर्गाचें सहकार्य मिळवितां आलें असतें. भाषावाद ह्या नांवाचा एक नवा वाद कल्पून हा जो गदारोळ माजविण्यांत आला, तो सावज नसतांना रान उठविण्याच्या धर्तीचा होता. भाषिक गटाला आपलें वेगळें घटकराज्य असावें असें वाटणें ह्यांत अस्वाभाविक असें काय आहे? आणि ह्यांत देशविघातक अशी कोणती प्रवृत्ति आहे? ह्यासाठीं संयुक्त महाराष्ट्राच्या न्याय्य मागणीचा मी पुरस्कार केलेला आहे. परंतु संयुक्त महाराष्ट्र मिळत नाहीं म्हणून डोक्यांत राख घालण्याचें जें समितीचें राजकारण आहे तें मला मान्य नाहीं. ह्यामध्यें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रेमापेक्षां स्वपक्षाचें राजकारण पुढें नेण्याचाच प्रकार आढळून येतो.

## विकतचें भांडण

वास्तविक ह्या महाद्विभाषिकामध्यें संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करणारांची काय तक्रार आहे ? त्यांना जो मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हवा होता तो ह्या महाद्विभाषिकांत आहे. ह्यांत नाहीं फक्त बेळगांव, निपाणी, कारवार हा भाग. पण तोही येण्याची खटपट चालू आहे. ह्या महाद्विभाषिकांत महाराष्ट्रीय बहुसंख्य आहेत. पूर्वीच्या त्रैभाषिक राज्यांत गुजराथच्या वर्चस्वाची जी भीति वाटत होती ती ह्या द्विभाषिकांत राहाण्याचें कारण नाहीं. तथापि, ही भीति अजूनही वाटत असेल तर आपल्या नालायकीची आपण ही अप्रत्यक्ष कबुलीच देत आहोंत. महाराष्ट्रीयांनीं हा न्यूनगंड बाळगण्याचें कारण नाहीं. प्रारंभीं ह्याच महाद्विभाषिकाला सर्व पक्षांनीं सम्मति दिली होती. आज बाकीचे पक्ष ह्या महाद्विभाषिकाला विरोध करीत आहेत. कारण तसा विरोध ते न करतील तर त्यांना राजकीय अस्तित्वच राहाणार नाहीं. म्हणून ते विरोध करीत आहेत. सारांश, समितीचा विरोध अतिशय कृत्रिम स्वरूपाचा आहे. ह्या द्विभाषिकामध्यें तसा विरोध करण्यासारखी महाराष्ट्रीयांना जागा नाहीं. ह्या राज्यांत गुजराथी-भाषिक अल्पसंख्य असल्यामुळें विरोध करण्यास कारण कोणापाशीं असेल तर तें महागुजराथच्या पुरस्कर्त्यांपाशीं आहे. बहुसंख्य व अल्पसंख्य ह्यामध्यें भीति कोणाला वाटत असेल तर ती अल्पसंख्यांना वाटते. मग महागुजराथच्या पुरस्कर्त्यांना वेगळें व्हावें असें वाटत असेल तर त्यांचें भांडण त्यांना भांडूं द्या. समितीनें हें विकतचें भांडण कां घ्यावें हें मला समजत नाहीं. कारण महागुजराथचे पुरस्कर्ते वेगळे होण्याची मागणी करतील तर त्यांना मुंबईच्या प्रश्नावर बोलण्याचा अधिकार राहाणार नाहीं. पण आपली कांहीं हानि नसतांना आपणच जर वेगळे होण्याची मागणी मागूं लागलों, तर परत ज्या बिंदूपासून ह्या दुष्टचक्राच्या आवर्तनाला प्रारंभ झाला त्याच बिंदूपाशीं आपण येऊन पोहोंचतों असें होईल.

## धंदेवाइक राजकारण

पण लोकभावना तापवून लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झाल्यानंतर, एकदम खालीं येणें कोणत्याही राजकीय गटाला परवडत नाहीं. भारतीय राजकारणाची ही एक शोकांतिका आहे. ह्या राजकारणांत विचारापेक्षां भावनेला महत्त्व जास्त. चळवळ, ओरडा, सत्याग्रह, मोर्चा ह्या मार्गांनीं लोकांचें मन आकर्षून घेण्यामध्यें फारशी खटपट करावी लागत नाहीं. वादानें प्रतिपक्षाचा पाडाव करण्यापेक्षां शिवीगाळ करून रान उठविण्याचा मार्गच आपण पसंत केला आहे. त्यामुळें लोकभावना शिगेला पोहोंचल्यानंतर आतां समितीला अथवा समितीच्या घटक पक्षांना माघार घेणेंही जड जात आहे. प्रतिपक्षाचें जें चांगलें आहे तें चांगलें म्हणणें पक्षप्रतिष्ठेच्या चौकटींत बसत नाहीं. ह्यासाठीं द्विभाषिक राबविणाऱ्या कॉंग्रेस पक्षावर अप्रामाणिक हेतूचे आरोप केले जातात. कारण भावना

सतत तापत ठेवल्याखेरीज समितीचें राजकारण एक क्षणभरही चालणार नाहीं. जखम बरी होण्यापेक्षां जखम एकसारखी वाहात ठेवण्यामध्यें राजकारण्यांचें फावत असतें. त्याशिवाय रोगी आपल्या दवाखान्यांत येणार नाहीं. राजकारणांत हा जो धंदेवाईक दृष्टिकोण शिरलेला आहे, त्यामुळें राजकीय प्रश्न सोडविणें कठीण होऊन बसतें. वास्तविक समितीला आपल्या राजकारणाचें तारूं विधायक मार्गानें नेणें शक्य आहे. परंतु तो मार्ग श्रेयस्कर असला तरी लाभदायक नाहीं. म्हणून 'कॉंग्रेस मेली पाहिजे' असल्या आत्यंतिक घोषणा केल्या जातात. संसदीय लोकशाहींत ही घोषणा बसते काय? मुळींच नाहीं. कारण संसदीय लोकशाहीला दोन पक्ष नेहमीं लागत असतात. एकाच पक्षाला सतत 'थंपिंग मेजॉरिटि' मिळत राहाणें हें संसदीय लोकशाहीला जितकें घातक, त्यापेक्षां सारे विरोधी पक्ष मरून अथवा मारून एकच पक्ष शिल्लक राहाणें हें अधिक घातक आहे. ही कम्युनिस्ट छापाची घोषणा आहे आणि म्हणून समितीच्या राजकारणावर कम्युनिस्टांचा प्रभाव पडत चालला आहे, असा माझा आक्षेप आहे.

## हिंदी कीं इंग्रजी?

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर हा जो भावनातिरेक झालेला आहे त्यामागें उपराष्ट्राची भावना आहेच. आणि ही भावना बळावत गेली तर भारतीय ऐक्याला त्यामध्यें निश्चित धोका आहे. भाषिक राज्य व भाषिक राष्ट्र ह्या दोन कल्पनांमध्यें अंतर फार थोडें आहे. ह्यासाठीं वेगवेगळ्या भाषिक राज्यमध्यें एकसूत्रीपणा आणण्यासाठीं कांहींतरी उपाय योजणें आवश्यक आहे. त्यासाठीं संघराज्याची एक भाषा असावी आणि ती हिंदी असावी अशी डॉ. आंबेडकरांनीं आपल्या ग्रंथांत सूचना केली आहे. मला संघराज्याची भाषा एक असावी ही अर्धी सूचना मान्य आहे; पण हिंदी ऐवजीं इंग्रजी ही ती भाषा असावी, अशी माझी त्यांत दुरुस्ती आहे. ह्याचें कारण असें कीं, उत्तर भारत वि. दक्षिण भारत हा जो सुप्त विरोध आज आढळून येत आहे, तो हिंदी राज्यभाषा केल्यानें अधिक तीव्र होत जाईल. दुसरें हिंदी प्रगल्भ भाषा नाहीं. तिच्यापेक्षां कित्येक इतर प्रांतभाषा अधिक समृद्ध आहेत. ह्या सर्व भाषिक गटांना एकत्र आणावयाचें असेल तर जी कोणती एक भाषा आपण ठरवूं, ती ह्या सर्व प्रांतभाषांपेक्षां अधिक प्रगल्भ व अधिक समृद्ध असेल तरच त्या भाषेचें नेतृत्व इतर भाषिक मान्य करतील. कायदा, न्यायनिवाडे, संसदीय कामकाज, सरकारी फतवे, ज्ञान, विज्ञान इत्यादि अनेक महत्त्वाचे व्यवहार ह्या राज्यभाषेतून चालणार. हे व्यवहार चालविण्यासाठीं आपण नवीच भाषा निर्माण करूं असा विश्वकर्म्याचा आव राज्यकर्त्यांनीं आणूं नये. संकेत, परंपरा, शब्दसमृद्धि, अर्थगांभीर्य हे सर्व जादुगाराप्रमाणें एका क्षणांत बदलतां येत नाहींत. कांहीं वेळा तर ह्या सर्वांच्या अनुरोधानेंच

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे

भाषेबद्दल निर्णय घ्यावा लागतो. हिंदी वि. इंग्रजी ह्या वादामध्यें असाच संवादी निर्णय घ्यावा लागेल. त्यामध्यें असंबद्ध अथवा अप्रस्तुत कारणें दाखवून चालणार नाहीं.

## इंग्रजांनीं केलेला कायापालट

इंग्रजीबद्दलची माझी सूचना कित्येक देशाभिमान्यांना पटणार नाहीं. क्वचित् ते कोपाविष्टही होतील. परंतु इंग्रजी सामाज्याचे जे कांहीं भलेबुरे परिणाम भारतीय समाजावर झालेले आहेत त्यांचें यथायोग्य मूल्यमापन करण्याची वेळ आतां आलेली आहे असें मला वाटतें. इंग्रजी साम्राज्य व पाश्चात्य विद्या ह्यामध्यें देशाभिमानाची भावना आपणांस फरक करूं देत नसेल तर तो देशाभिमान आपणांस योग्य मार्गदर्शन करण्यास असमर्थ आहे असेंच म्हणावें लागेल. इंग्रजी साम्राज्य ही आर्थिक पायावर उभी राहिलेली एक राज्यपद्धति होती. भारतीय समाजावर तिचे निश्चितपणें वाईट परिणाम झालेले आहेत. पण कोणतीही आपत्ति संमिश्र स्वरूपाची असते. इंग्रजी साम्राज्यानें ह्या देशाचें ज्याप्रमाणें आर्थिक शोषण केलें, त्याचप्रमाणें ह्या देशाची जुनी संकुचित समाजव्यवस्था खिळखिळी करून टाकली. इंग्रजांनीं हें स्थित्यंतर जाणूनबुजून केलें नसेल. आपल्या स्वार्थासाठीं त्यांना हे सामाजिक बदल करावे लागले असतील. अगतिकत्वानें त्यांना पाश्चात्य शिक्षणाच्या संस्था निर्माण काराव्या लागल्या असतील. पण हें सर्व मान्य करूनही, ह्या देशांत ह्यापूर्वीही अनेक साम्राज्यें होऊन गेलीं असतांही आधुनिक भारताच्या पुनरुज्जीवनासाठीं भारतीय समाजांत जें सामाजिक स्थित्यंतर घडून येणें आवश्यक होतें तें इंग्रजी अमदनीनें घडवून आणलें हें सत्य आपणांस मान्य केलेंच पाहिजे.

("England, it is true, in causing a social revolution in Hindustan was actuated only by the vilest interests, and was stupid in her manner of enforcing them. But that is not the question. The question is, can mankind fulfill its destiny without a fundamental revolution in the social state of Asia? If not, whatever may have been the crime of England, she was the unconscious tool of history in bringing about that revolution." Marx and Engles on India, Page 22 ).

तेव्हां युरोपच्या नवविद्येशीं आपला जो संबंध आला आहे तो गमावून आधुनिक भारताचें पुनरुत्थापन होणें सर्वथैव अशक्य होय. इंग्रजी भाषा व पाश्चात्य विद्या कोणत्या मार्गानें ह्या देशांत आली हा प्रश्न येथें गौण ठरतो. त्या भाषेनें आमच्या जीवनाला आधुनिकत्व प्राप्त करून दिलेलें आहे कीं नाहीं, हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि त्या भाषेनें आधुनिक भारताच्या जीवनांत फार मोठा बदल घडवून

आणलेला आहे, हेंच त्या प्रश्नाचें एकमेव उत्तर आहे. इंग्रजी भाषा, इंग्रजी वाङ्मय, पाश्चात्य ज्ञानें व विज्ञानें, इंग्रजी कायदा व शासनतंत्र इत्यादि::अनेकविध प्रकारांनीं भारतीय समाजाला आधुनिक वळण लावलेलें आहे आणि आजही ह्या सर्वांचा विच्छेद करून भारताला ह्या आधुनिक जगांत क्षणमात्र वावरतां येणार नाहीं. पाश्चात्य विद्या व इंग्रजी भाषा ह्यांचें शिकण ह्या देशांत प्रथम सुरू करतांना, पार्लमेंटमध्यें. मेकॉलेनें जे उद्गार काढले त्यांत दर्पोक्ति असली तरी सत्याचा बराच अंश आहे.

( "It may be that the public mind of India may expand under our system until it has outgrown that system, that by good government we may educate our subjects into a capacity for better government, that having become instructed in European language, they may, in some future age, demand European institutions. Whether such a day will ever come I know not. Whenever it comes it will be the proudest day in English History......The sceptre may pass away from us. Victory may be inconstant to our aims. But there are triumphs which are followed by no reverse. " Extract from the speech by Lord Macaulay in the House of Commons ).

भारतीय लोकशाही, कायदा, आर्थिक व्यवहार, व्यापारउदीम, विज्ञान, तत्त्वज्ञान, कला, साहित्य ह्या सर्व जीवन-क्षेत्रांवर इंग्रजी भाषेनें इतका सखोल ठसा उमटविला आहे कीं, आम्हीं मन्वादिकांचे वंशज आहोंत असा अभिमान मिरवीत असलों तरी आपला बौद्धिक पेहेराव पाहिल्यानंतर खुद्द मनु हे लोक आपले वंशज आहेत असें मानावयास तयार होईल कीं काय, ह्याबद्दल शंका वाटते.

समाजांतील सुशिक्षितांनीं मिथ्या देशाभिमानाला बळी न पडतां, ह्या देशांतील वेगवेगळ्या भाषिक गटांमध्यें वैचारिक दळणवळण कायम राखण्यास इंग्रजीखेरीज अन्य भाषा सोयीची नाहीं हें सत्य मान्य केलें पाहिजे. देशाभिमानाचें व राज्यकर्त्यांच्या छंदांचें दडपण दूर सारून सत्य सांगण्याइतकें धैर्य त्यांनीं ह्या वेळीं दाखविलें पाहिजे. आज ह्या स्वतंत्र भारतांत जे आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक व्यवहार चालू आहेत त्यामध्यें इंग्रजी भाषा व विद्या ह्यांचा प्रभाव पदोपदीं आढळून येतो. असें असतांना, इंग्रजी भाषेची जरुरी नाहीं असें मानणें, हा निव्वळ दंभ आहे. समाजांतील विचारवंतांनीं ह्या दंभाला बळी पडतां कामा नये. इंग्रजी भाषेची हकालपट्टी करण्याचें जें धोरण सध्यांच्या राज्यकर्त्यांनीं आंखलें आहे, त्याचे तरुण पिढीवर काय परिणाम झाले आहेत, हें आपण प्रत्यक्ष पाहात आहोंतच. ह्या तरुण पिढीला केवळ इंग्रजी भाषेचेंच अपुरें ज्ञान आहे असें नाहीं. ज्ञानाबद्दल वाढती अनास्था व आधुनिक दृष्टीचा अभावही ह्या पिढींत

आढळून येतो. इंग्रजी भाषा ह्या देशांतून संपूर्णपणें गेली तर महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बंगाल, कर्नाटक, तामीळ ह्या भिन्न भाषिक गटांतील दळणवळण कायमचें तुटल्याखेरीज राहाणार नाहीं. म्हणून ह्या देशाच्या राजकीय व्यवहाराची भाषा इंग्रजीच राहाणें श्रेयस्कर होय.

### पटणार नाहीं पण —

भाषिक राज्यांच्या मागणींत असलेला धोका टाळण्यासाठीं वर सांगितलेला उपाय जर मान्य झाला, तर ह्या देशाच्या एकतेला तडा जाईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. तेव्हां काल्पनिक भीतीमुळें लोकांच्या आशा-आकांक्षा न डावलतां, ह्या देशाच्या सर्वश्रेष्ठ नेत्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या समस्येचा विचार करावा, असें मी त्यांना अखेरीस आवाहन करीत आहें. हें करीत असतांना महाराष्ट्रीयांनीं आपणावर येऊन पडलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवणें अगत्याचें आहे. इंग्रजी अमदानीनंतर भारताच्या नवजीवनामध्यें महाराष्ट्रानें महनीय कामगिरी बजावलेली आहे. लोकहितवादींपासून लोकमान्यापर्यंत महाराष्ट्रांत जी एक दिग्गजासारखी पिढी होऊन गेली ती पिढी केवळ नव्या महाराष्ट्राचीच उद्गात्री होती असें नाहीं, ती आधुनिक भारताची शिल्पकर्त्री पिढी होती. पण समितीच्या व्यासपीठावर केवळ आरडाओरडा करणाऱ्या नेत्यांना आधुनिक महाराष्ट्र निर्माण करणाऱ्या ह्या पिढीचे आपण वारसदार आहोंत असा हक्क सांगतां येईल काय ? मी जें समितीचें राजकारण पाहात आहे त्यावरून तसा हक्क सांगतां येणार नाहीं, असें मी निश्चितपणें म्हणूं शकतों. भावनातिरेकाच्या ह्या दूषित वातावरणांत माझें मत आज रुचणार नाहीं. परंतु भारतीय लोकशाहीच्या चौकटींत बसणारा नवा महाराष्ट्र आपणांस निर्माण करावयाचा असेल तर, त्या महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं समितीचे मार्ग खास उपयोगी पडणार नाहींत. हें मत समितीला सम्मत होणार नाहीं आणि द्विभाषिका-विषयींचें माझें मत राज्यकर्त्यांना रुचणार नाहीं. पण कोणत्याही बाजूचा अभिनिवेश न बाळगतां सत्य सांगणाराची स्थिति नेहमीं अशीच होत असते. म्हणूनच एक सुभाषित-कार सांगतो :—

बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मयदूषिताः ।
अबोधोपहताश्चान्ये जीर्णमंगे सुभाषितम् ॥

REFBK-0009275

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८.२०५
शाखा
क्रमांक